साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........०१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....०१

# वऱ्हाडसमाचार.

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 a
Six monthly......... 3 ............... 8 a
Single copy ................................ 4 a

Advertisemen
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 a

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 4 APRIL 1898 NO 13

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख ४ माहे एप्रील सन १८९८ इ० अंक १३

### NOTICE

The following is a draft of rules which the Municipal Committee of Akola proposes to make under section 116 (j) of the Berar Municipal Law 1886 and it is published for general information as required by section 150 (i) of the Law.

The said draft will be taken into consideration after the 30th April 1898.

Dated Akola 29th March 1898 } K. G. Damle Secretary Municipal Committee Akola.

Rules

i Cart drivers shall as an invariable rule keep to the left while driving.

ii Signboards shall be posted at conspicuous places with instructions relating to rule 1 above.

iii In the first half of the night i. e. upto 12 midnight on all days whenever it is dark every cart plying within Municipal Limits must have at least one lighted lamp attached to it at a prominent part.

iv. Persons infringing rules 1 and 3 may be dealt with under section 138 of the Berar Municipal Law.

## जाहिरात

सन १८८६ सालचे वऱ्हाड मुनिसिपल कायद्याचे कलम ११६ [१] (जे) अन्वये अकोले मुनिसिपाल कमिटीनें केलेले नियमाचा मसुदा सदर्हू कायद्याचें कलम १५० (१) प्रमाणें सर्वांचे माहिती करितां प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

सदर्हू नियमांचा तारीख ३० एप्रील सन १८९८ इसवी नंतर कमिटी विचार करील.

आकोला } K. G. Damle
२८।३।९८ } सेक्रेटरी मुनसिपाल कमेटी अकोला.

नियम

१ गाडी हांकणारे लोकांनीं नेहमी आपले डावे बाजूनें गाडी हाकावी.

२ सदर्हू नियम १ यांत सांगितल्या नियमाच्या फळ्या निरनिराळया रस्त्याच्या प्रसिद्ध ठिकाणीं लाविल्या जातील.

३ पहिले रात्रीं ह्मणजे रात्रौ १२ वाजे पर्यंत जेव्हां अंधारी रात्र असेल तेव्हां मुनिसिपाल कमिटीचे हद्दींत वागणाऱ्या गाड्यांस लाविलेला कंदिल असावा.

४ सदर्हू नियमा पैकी नियम १ व ३ जे मोडतील त्याचे संबंधी मुनिसिपाल कायदा कलम १३८ प्रमाणें व्यवस्था केली जाईल.

---

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध १३ शके १८१९

गेल्या वर्षाचा दुष्परिणाम अद्याप कायमच आहे. दुष्काळ, प्लेग, धरणीकंप, व सरहद्दीवरील लढाई यानीं या देशाची दैना करून सोडली आहे. ९ कोट २८ लक्ष ३१ हजार रुपये गेल्या वर्षीं तूट पडली. गुदस्ता दुष्काळासाठीं व लढाईसाठीं झाला तो खर्च असा:—

| | |
|---|---|
| दुष्काळ. | ५,३९,१८,००० |
| लढाई. | ३,८२,३५,००० |

सर वेस्टलांड ह्मणतात कीं दुष्काळ पडला नसता तर तूट न पडतां लढाईचा खर्च उत्पन्नांतच भागला असतां परंतु हा कोटिक्रम अगदीं चुकीचा आहे. इंडिया सरकारा पाशीं एक वर्षाच्या दुष्काळासाठीं सिध्दता नसावी आणि दुष्काळ पडला होता ह्मणून इंडिया सरकारानें ओरड करावी ही गोष्ट मोठी लाजिरवाणी होय. खऱ्या मुत्सद्दीपणाचीं हीं चिन्हें नाहींत.

सर वेस्टलांड यानीं एक वीस वर्षाचा हिशोब तयार केला आहे. त्यांत इंडियाची सांपत्तिक स्थिती चांगली असल्या विषयीं खात्री करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे पण तो मोठा भ्रामक आहे. १८७८ पासून सालोसाल उत्पन्न वाढत आहे ही गोष्ट बाजूला ठेऊन सरासरीनें नित्याच्या खर्चापेक्षां उत्पन्न सालोसाल जास्त आहे असें दाखविण्याची मोठी युक्ति लढविण्यांत आली आहे. नित्याचे साधारण खर्च ह्मटले ह्मणजे त्यांत मोठमोठ्या लढाया, सरहद्दीची तटबंदी, दुष्काळ, आणि सरकारी भांडवलाच्या रेलवे या बाबदींतल्या खर्चाचा समावेश केलेला नाहीं.

गेल्या वीस वर्षांतल्या जमेंतून असा साधारण खर्च वजा केले असता बाकी शिल्लक ५०,९८,८२,९४० रुपये निघतात. अशा कागदी गारुडानें सत्यनिष्ठ मुत्सद्याला आनंद वाटणार नाहीं. सालोसाल जें उत्पन्न वाढत गेलें त्या उत्पन्नाच्या वाढीचा कांहीं विचार करण्यांत आला नाहीं इतकेंच नाहीं तर दरसाल करांचा बोजा वाढत असून नवीन कर बसविले नाहींत असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

---

मद्रास युनिव्हरसिटीच्या पदवीदानाचा समारंभ गेल्या २५वे तारखेस झाला. त्यावेळीं नवीन पदवीवाल्यास उपदेशपर चार हिताच्या गोष्टी सांगण्याचा बहुमान सर्जन लेफटनंट कर्नल डब्ल्यू जी किंग यांस दिला होता. या गृहस्थाचें संभाषण सविस्तर व मुद्देसुद असून यांत पुष्कळ गोष्टीचा गोषवारा सांगितला आहे. ते ह्मणाले कीं:—

नवीन पदव्या ज्यांस देण्यांत आल्या त्यांत विश्वविद्यालयांतील दीक्षा चांगली मिळाली असून उत्तम उत्तम तत्वांचा संग्रह त्यांनीं चांगला केला आहे. जगांतील विद्वान मंडळीच्या पंक्तीला बसण्याचा परवाना त्यांस मिळाला आहे. त्यांनीं आपला पुढील आयुष्यक्रम या उच्च स्थितीला अनुरूप असा ठेविला पाहिजे. मद्रासच्या ३॥ कोट प्रजेच्या भावी आशांचा मूलकंद ह्मणजे ही नवी पदवीधर मंडळी होय. त्यांनीं पाठशालांतून चांगला ज्ञानसंग्रह केला आहे, त्यांचा गत आयुष्यक्रम वर्णनीय तऱ्हेनें गेला आहे, आणि त्यांच्या अंगीं एका प्रकारची दांडगी कार्यशक्ती आली आहे तेव्हां अशा या विद्वान तरुण मंडळीचा भावी आयुष्यक्रम मातृभूमीस सुखकर कल्याणप्रद, व उन्नतीकारक होईल असा सर्वजणांस पक्का भरंवसा आहे.

कायद्याच्या परीक्षेत पसार झालेल्या गृहस्थांस उद्देशून डाक्टर किंग बोलले कीं गरिबांवर जुलूम होऊं न देण्यासाठीं व धनलोभ्याच्या कारेबाजपणांतून श्रीमंतास सोडविण्यासाठीं न्यायाच्या दरबारीं लढण्याचा अधिकार 'बी एल.' ही पदवी देते. ही वकिली करितांना तुह्मी आपली कतबगारी दाखवाल, कधींकधीं निर्लोभता धराल पण सदोदित आपल्या धंद्याचा बहुमान कायम चालवाल त्या बरोबर तुमच्या देशाची संतुष्टता व भरभराटी आणि ब्रिटिश सरकारचा चिरस्थायीपणा हीं अनुषंगानेंच लाभतील. वकिलीचा धंदा फार चांगला आहे पण तुह्मासही ही गोष्ट कळविली पाहिजे कीं सध्यां या धंद्यांत कांहीं राम राहिला नाहीं. आतां गरज नाहीं इतके वकील पुष्कळ झाले आहेत. या धंद्यांत द्रव्यदृष्टी विशेष असते ह्मणून त्यांत स्पर्धा व वरचढ मोठी आहे. आपापली बहादरी होण्यासाठीं वकिलीच्या धंद्याची नीती सोडूं नका. स्वतांकडे पक्षकारांचीं कामें यावीं ह्मणून जे योग्य व राजमान्य मार्ग आहेत त्यांचें अवलंबन करा पण भलता मार्ग स्वीकारूं नका पुष्कळ शतकांच्या अनुभवानें हे मार्ग ठरविलेले आहेत तेव्हां ते सद्बुद्धीनें चालवून आपल्या स्वतांचा व युनिव्हरसिटीचा लौकिक कायम ठेवा.

डाक्टरीची पदवी मिळालेल्या गृहस्थांस ते ह्मणाले कीं डाक्टरीच्या धंद्यांत पैसा फारसा मिळत नाहीं पण परोपकार करण्याचे प्रसंग पुष्कळ येतात. श्रमाच्या मानानें पोटापुरतें वेतन मिळतें. तथापि वैद्यकीच्या धंद्यांतलें माविण्य त्यांतील वेतनावर नाहीं. वैद्यक्रियेंत व शस्त्रक्रियेंत तुह्मी निपुण होण्याच्या मार्गांत आहा. तुमच्या अंगीं चांगली अवधारणाशक्ती आलेली आहे, आपल्या बंधुवर्गावर उपकार करण्याला, त्यांचें दुःख दूर करण्याला, व ईश्वराच्या कृपेनें जीव वांचविण्याला तुह्मी आपलें तनुमन अर्पण करा.

सृष्टीतले चमत्कार आणि तिच्यांतील वस्तुमात्रांचे विलक्षण गुणधर्म चौकसपणानें समजून घेणें, आपल्या ज्ञानाची किल्ली सृष्टीला लावणें, कोणत्याहीं स्नायूचे धर्म ओळखणें, रोगाचीं चिन्हें समजणें इत्यादि गोष्टी तुमच्या हातच्या आहेत. या गोष्टी उत्तम प्रकारें हस्तंगत होतील असा असा अव्याहत व्यासंग ठेवा. 'एसक्युलेपिअस' नांवाचा ग्रीक पुराणांतला वैद्यकज्ञानाचा मूळ देव होऊन गेला. त्याच्या देवालयाच्या अजरामर इमारतीला एखादी वीट तुमच्या ज्ञानभांडारातली लागेल असा दृढ निश्चय मनीं बागवा भूतदयेचा कित्ता पुढें ठेविला ह्मणजे वैद्यकीच्या धंद्यांत तुह्माला तुमच्या जीवाची देखील पर्वा वाटणार नाहीं. रोगग्रस्तांचें दुःख हरण करणें या सारखा दुसरा पुण्यमार्ग नाहीं आणि या उपकृतीमध्यें जो परम आनंद आहे तो आनंद अप्रतिम व अभंग आहे.

वैद्यकाचें ज्ञान आजकालचें आहे असें समजूं नका. जगाच्या आरंभा पासूनच या विद्येचा मूळ पाया घालण्यांत आला. प्राचीन काळचे ग्रंथ अवलोकनांत आणा. पूर्वींच्या वैद्यकांत असलेल्या गोष्टी शास्त्रीय कसास लावा, आणि जगांत वैद्यक ज्ञानाचें एकच भांडागार आहे अशा समजुतीनें हा ज्ञानसंग्रह उत्तरोत्तर वृद्धिंगत करा. हिंदु वैद्यक, युरोपियन वैद्यक असे भिन्न भिन्न प्रकार समजूं नका. जगाचा ज्ञानसंग्रह एकच आहे त्याचे घटकावयव ह्मणजे निरनिराळ्या राष्ट्रांतली ही विद्या होय. या सर्व विद्यांची संमेलनक्रिया ह्मणजे वैद्यकज्ञानाची अभिवृद्धि होय. हिंदु वैद्यकांत देवी काढण्याची क्रिया वर्णन केलेली संस्कृत ग्रंथांतून आढळते. धन्वंतरी लिहितात कीं गाईच्या स्तनावरील किंवा मनुष्याच्या हातावरील लस घेऊन कोचीदार शस्त्रानें दुसऱ्या मनुष्याच्या बाहूंत घाला आणि त्या ठिकाणच्या रक्तांत ती लस मिसळूं द्यावी. त्या नंतर देवीचा सौम्य ताप येईल. × × × लशीनें देवीचा आजार अगदीं क्षुल्लक येतो. अशा देवी काढण्या पासून दोन तीन दिवस ताप येऊन नंतर प्रकृती आपोआप चांगली होते. देवी काढण्याची युक्ती इतकी जुनी असून अलिकडेच तिची उपयुक्तता सर्वजणांस चांगली समजली आहे. शरिराची रचना पूर्वींच्या हिंदु वैद्यांस चांगली अवगत होती असें दिसतें. तथापि नाका-

डोळ्याचे वैद्य ह्मणून फेरी करणाऱ्या अज्ञानी व आडनावी वैद्यांस फार दूर ठेविलें पाहिजे. वैद्यकीच्या ज्ञानावर सर्व जगाची सारखी मालकी आहे. ही गोष्ट एका चमत्कारिक रोगचिकित्सेवरून चांगली शाबीत होते. वैद्या विषयीं कृतज्ञता फार क्षणभंगूर असते हा एक रोगच आहे याच्या चिकित्से संबंधानें 'चरका' मध्यें लिहिलें आहे कीं दुःख किंवा रोग असतो तोपर्यंत मनुष्य देवाच्या व वैद्याच्या भजनीं असतो, पण दुःख किंवा रोग सरला ह्मणजे सर्व उपकार मनुष्य विसरतो. तथापि चरकांत वैद्याची समजूत मोठी नामी केली आहे ती अशी कीं अशा अकृतज्ञ रोग्यांचें पुण्य वैद्याला लाभतें.

इंजिनिअरींग शाखेकडील पदवीधरांस उद्देशून डाक्टर किंग बोलले कीं इंजिनिअराच्या महत्वाकांक्षेला सीमाच नाहीं. वेळ व पैसा या दोन गोष्टी अनुकूल असल्या ह्मणजे एंजिनिअर काय काय ह्मणून करणार नाहीं! तुह्मी उंच उंच घरें उचलता, पर्वत हालविता, पर्वताच्या खोऱ्यांमधून पाणी काढतां, परस्परांस ठार मारण्याच्या शास्त्रीय युक्त्या लढविता, पृथ्वीच्या या टांकावर उभे राहून दुसऱ्या टोंकाशीं बोलता, मोठमोठे समुद्र जोडता, हवेवर व पाण्यावर आपलें साम्राज्य स्थापिता या व अशा अनेक गोष्टी करून दाखवून तुह्मी सर्व जगाला चकित करितां. असा वर्णनीय धंदा तुमचा आहे. मोठमोठ्यां गोदी, पाटाच्या पाण्याचीं कामें, मनोरे वगैरे बांधण्याचीं कामें तुह्मास शिकविलीं आहेत. सरकारी चाकरींत कांहीं अर्थ नाहीं व वर्षांचीं वर्षे तुह्मास एकच काम चालवावें लागतें. तर सरकारि चाकरीचा नाद सोडून तुह्मी आपलें बुद्धिकौशल्य खर्च करा आणि आपल्या सतत प्रयत्नानें एक निराळीच कार्यशाखा चालूं करा.

मद्रासचा एकंदर जनसमूह फार गरीब आहे असें ह्मणतात तें अक्षरशः खरें नाहीं. शेतीच्या धंद्यांत सर्वच जनसमूह शिरल्यामुळें त्या धंद्यांत फायदा राहिला नाहीं. शिवाय शेतीचें उत्पन्न पावसाळ्यावर अवलंबून असतें. एकसाल अवर्षण झालें कीं सर्व लोक उपाशी मरूं लागतात व सार्वजनिक फंडावर त्या लोकांची प्राणधारणा चालवावी लागते. डाक्टर किंग ह्मणतात कीं जनसमूह दरिद्र आहे याला कारण जमिनी सुपीक नाहींत किंवा सरकारी सारा भारि आहे असें नाहीं तर शेतीचा धंदा करणारे लोक इतके पुष्कळ आहेत कीं पीकाला धक्का बसणारी एखादी गोष्ट घडली तर लागलीच त्याचा परिणाम लोकांवर चोहीकडे घडतो. एखाद्या कारखान्यांतल्या प्रमाणें शेतीच्या कारखान्यांतील सर्व मजूरदारांचा धंदा बंद पाडण्याची स्थिती एकदम प्राप्त होते. शेतकरी लोकांस इतर धंदा माहित नसतो. यूरोपांतला प्रकार निराळा आहे. ज्याच्या अंगांत लढाईची धमक असेल तो लष्करांत किंवा आरमारावर चाकरी धरतो, तो मोठमोठ्या गिरणींत किंवा कारखान्यांत नोकरी पाहतो, वेळच बेतली तर देशत्याग करितो व दुसरी कालनी स्थापण्याच्या मार्गाला लागतो. या उदाहरणा वरून लक्ष्यांत येईल कीं शेतीच्या धंद्यांत फायदा नाहीं असें नाहीं. चिनी मातींचीं भांडीं करण्याचा सर्वांनीं धंदा आरंभला आणि ती मातीच मिळेनाशी झाली तर जसा उपासमारा होईल तशी स्थिती शेतीची आहे. पाटाच्या पाण्यानें व रेलवेनें दुष्काळाचा परिणाम कमी होईल खरा पण पाण्याची वांटणी सारखी झाली व धान्याचा ही पुरवठा सर्व मुलुखांत सारखा केला तरी शेतीवर निर्वाह करणयांची संख्या कमी झाल्या शिवाय भविष्यकालीन दुष्काळ टळण्या सारखे नाहींत हें पक्केपणीं ध्यानांत धरलें पाहिजे.

वरील गोष्टीला प्रतिबंधक एकच उपाय आहे. धंदे पुष्कळ व भिन्न भिन्न निघाले पाहिजेत. शेतीवर अवलंबून राहणाऱ्यांची सोय दुसऱ्या धंद्यांतून केली पाहिजे. डाक्टर किंग यांनीं हा उपाय मोठ्या जोरानें सूचविला आहे. गेल्या २५ वर्षा मध्यें इंडियांतच निरानिराळ्या धंद्याची शक्यता मोठी वाढली आहे. पहिली गोष्ट कोळशाचीच पहा. रेलवे व इतर कारखाने यांस लक्षावधि टन कोळसा लागतो तो देशी खाणींतून पुरविण्यांत आला तर कित्येक सहस्रावधी लोकांस चांगली मजूरी मिळेल व देशाचें कल्याण होईल. इंडियांतच रेलवेचे भाग असे पुष्कळ आहेत कीं त्या पैकीं कित्येक भागांत शिसें सांपडतें, कित्येक ठिकाणीं रुपें मुबलक असून त्याच्या कारखान्यावर चांगला नफाही होईल, तांबें हा धातु अद्याप कोणीच लक्ष्यांत घेत नाहीं; लोखंड तऱ्हतऱ्हेचें अशुद्ध स्थितींत सांपडतें त्याच्यावर फक्त कोळशाच्या भट्टीची शोधनक्रिया व्हावयाची आहे. चिनीमाती सारखी मोल्यवान माती पुष्कळ सांपडते. तिचा भांडीं करण्याकडे उपयोग फार नाही होईल, तुरटी वाटेल तितकी मिळण्या सारखी आहे; इत्यादि अनेक गोष्टी विचारांत घेण्यासारख्या आहेत. या देशांत सर्व लोक सुती कपडालत्ता वापरतात, व सुंदर प्रकारचीं गवतें उगवतात असें असून देखील तुह्मी परदेशाचा कागद उपयोगांत आणितां हें तुह्माला ठीक वाटतें काय? इंडिया देशांत दगडी सामान व रंगीबेरंगी मातीचीं भांडीं परदेशाहून आणविलीं पाहिजेत काय? आपल्या आगकाड्याच्या पेट्यासाठीं ईंडियानें जपानाकडे पहावें काय? जपानची स्थिती एका शतकापूर्वीं किती वाईट होती आणि तीच सुधारणेच्या योग्य उपायांनीं बदलून तो देश मोठा संपत्तिवान बनला आहे. आपल्या उपयोगांतलीं भांडी करण्यासाठीं पितळेचे पत्रे आह्मी परदेशाहून आणावेत काय? आपल्या खिडकीच्या कांचा व तशाच शिशा आपणास परकी राष्ट्रांनीं पुरविल्या पाहिजेत काय? या गोष्टी आपल्या आपण स्वदेशी बनवूं लागलो तर किती कारखाने निघतील आणि उद्योगांच्या बाहुल्यामुळें सहस्रावधी लोक निरनिराळ्या धंद्यांत पोट भरण्यास लागणार नाहींत काय! पुष्कळ धंदे नवीन काढण्यास भांडवलाची मोठी अडचण सांगण्यांत येईल. पण भांडवल ज्यांच्यापाशीं आहे त्यांची इंजिनिअर लोकांनीं खात्री केली पाहिजे ह्मणजे जितकें द्रव्य पाहिजे तितकें देशांतल्या देशांत मिळण्यासारखें आहे.

---

प्लेगाचा आजार वऱ्हाड प्रांतांत येऊं नये ह्मणून मोठ्या दक्षतेची व्यवस्था ठेविली आहे. तपासणी, डिटेनशन क्यांप, वगैरे उपाय अमलांत आलेले आहेतच. हल्लीं उन्हाळा प्रखर आहे व त्याचें प्रमाण उत्तरोत्तर वाढतच आहे. उष्ण हवेंत या रोगाचा प्रादुर्भाव होऊं शकत नाहीं असा पुष्कळ गृहस्थांचा समज आहे तो खरा असेल अर निदान दोन तीन महिने या रोगाची मोठी भिती नाहीं. या रोगा संबंधानें गेल्या दोन वर्षांपासून चिकित्सा चालू आहे पण निश्चयात्मक माहिती कांहींच लागत नाहीं. प्लेगाचा रोग वायुरूपानें उद्भवत असो किंवा कृमिरूपानें त्याची उत्पत्ति असो, एक गोष्ट निर्विवाद आहे कीं गटाराच्या दुर्गंधीनें व जमिनीच्या ओलसरपणानें हा रोग फार वाढतो. स्वच्छता आरोग्यकारक आहे हें सर्वजणास संमत आहे तेव्हां निदान या रोगाच्या भितीनें स्वच्छता विशेष चांगली ठेविली तर ती मोठ्या फायद्याची होईल.

हल्लीं उष्णकाल आहे. हा आपल्या प्रभावानेंच पुष्कळ घाण नाहींशी करितो. या खेरिज घरोघर स्वच्छता करण्याला ही वेळ मोठी सोयीची होय. सध्यांच्या ऋतूंत सर्व स्वच्छतेच्या सोयी कराव्या ह्मणजे पावसाळ्यांत त्यांचा मोठा उपयोग होईल. पावसाळ्यांत साहजिक होणाऱ्या अस्वच्छतेला बंद करण्याची वेळ हीच आहे आणि ती वाया कोणी दवडूं नये अशी सर्व प्रांतस्थ मंडळीस विनंती आहे. प्रत्येक गृहस्थानें आपापल्या घरा पुरती स्वच्छतेची योजना केली ह्मणजे त्या पासून घरमालकाला सुख होईल. शेजाऱ्यापाजाऱ्याला सुख होईल आणि स्वच्छता ठेवण्याचा कित्ता इतरांस घालून देण्याचें श्रेय सहजी मिळेल.

सध्यां या प्लेगचा प्रतिबंधक जो स्वच्छता राखण्याचा उपाय तो आकोला मुनसिपालिटीनें जोरानें चालविला आहे. घरतपासणीचें काम सक्तीनें चालू आहे. मुनसिपाल सभासद आपला अमोल वेळ खर्ची घालतात, मानापमान सोडून घरोघर जाऊन अस्वच्छतेचीं स्थळें नोंदतात, घरधन्याला दुरुस्तीच्या जागा दाखवून देतात आणि मनुष्याची ऐपत पाहून ज्याला त्याला योग्य मार्ग दाखवितात. हा त्याचा उपकार अकोलेकरांनीं चांगला स्मरावा इतकीच आमची त्यांस विनंती आहे. उपकाराचें स्मरण प्रत्येकानें आपल्या कृतीच्या द्वारें केलें पाहिजे ज्या कांहीं सुधारणा सुचविल्या असतात त्या बिनबोभाट, आस्थेनें व इमानानें अमलांत आणाव्या ह्मणजे प्रत्येक मुनसिपाल सभासदास त्याच्या श्रमाची धन्यता वाटेल. कोणी वृथा गैरसमज होऊं देऊं नये. जी सुधारणा अवश्य वाटते तीच सूचविण्यांत येत आहे. आणि ती तत्काल केल्या पासून मुनसिपालिटीचें काम हलकें होईल आणि सर्वजणांस त्या गोष्टीनें अत्यंत सुख वाटेल. जर कोणी स्वच्छता ठेवण्या संबंधाचा हुकूम तोडील तर त्यानें तो अमान्य केल्या बद्दल त्यासच दुप्पट त्रास सोसावा लागेल. प्रस्तुत सर्व अष्टाधिकार स्वच्छता राखण्यासाठीं चालूं केले आहेत तर प्रत्येक माणसानें गोडीगुलाबीनें सर्व हूकूम पाळावेत यांतच खरी माणुसकी आहे.

---

गेल्या २७ वे तारखेला सर सय्यद अहमदखान बहादूर के. सी. एस. आय. हे अलिगड येथें आपल्या वयाच्या ८१ वे वर्षी निवर्तले हें कळविण्यास दुःख वाटतें. मुसलमान मंडळींत या या तोडीचा पुरुष विरळाच होता! मद्रासचे 'हिंदु' पत्रकर्ते ह्मणतात कीं थोरले सर सालरजंग यांच्या मागें सर सय्यद अहमद हेच मोठे किर्तीमान व धुरंधर अंते मुत्सद्दी होऊन गेले हे गृहस्थ राष्ट्रीय सभेचे वैरी ह्मणून १८८८ साली विशेष पुढें आले होते तथापि त्यांचीं चिरस्मारकें अगदीं निराळींच आहेत. मुसलमान जातीच्या लोकांस विद्यादान देण्यासंबंधानें यांनीं मोठा भगीरथ प्रयत्न केला आणि त्यांच्या श्रमाची विजयपताका अलिगड येथील मुसलमानी कालेजावर अक्षय्य फडकत राहील. सार्वजनिक कार्याची त्यांस मोठी कळकळ होती व त्यांचे विचार मोठे उदात्त असून पराकाष्टेचे राजनिष्ट होते. पाश्चात्य शिक्षणाची किंमत ते मोठी मानीत असत आणि पाश्चात्य विद्यासंस्कार आपल्या समाजावर होत असल्या विषयीं त्यांचे विचार सुधारणापक्षाचे होते. जुन्या नव्या पिढीला मार्गदर्शक असे हे वृद्ध पितामह होते. यांनीं मुसलमानांच्या उन्नती साठीं आपला देह झिजविला तरी ते हिंदु मुसलमानांस 'हिंदु' ह्मणजे हिंदुस्थानचा रहिवाशी या संज्ञे खालीं एकत्रपणानें लेखीत असत. राजकीय बाबदींत दोन्ही लोकांनीं एकजीव व्हावें असा त्यांचा मोठा उपदेश असे. पण आपल्या वृद्धापकाळीं त्यांचे विचार राष्ट्रीय सभेला कसे प्रतिकूळ झाले हें मोठें गूढच आहे. नाहीं तर, त्यांनीं उपदेशिलेला राजधर्म ह्मणजे राष्ट्रीय सभेचा मुळ आधारस्तंभ होय. सरसय्यद सारखीं नररत्नें हरपणें ह्मणजे देशाचें दुर्भाग्य होय! कालचक्रच असें आहे हें खरें तथापि सर सय्यद अहमद सारखा महात्मा पुरुष मृत्युंगत झाला ह्मणून मोठें दुःख होतें. मोठ्या गोष्टी कालक्रमानें नाश पावल्या तरी त्यांच्या मोठेपणाचा महिमा असा कांहीं विचित्र असतो कीं शोकानें अश्रु गळल्या वाचून राहत नाहींत. सर सय्यद अहमद यांचें चरित्र फार मनोवेधक असून नव्या पिढीनें तें कित्या प्रमाणें वळविण्या सारखें आहे. अप्रतिम उत्साहशक्ती, निश्चयदार्ढ्य प्रयत्नसातत्य इत्यादि अनुपम गुण शतांशानें आपल्या लोकांस त्यांच्या चरित्रा वरून लागले तरी त्याच्या जगण्याची सार्थकता झाली असें आह्मी समजू.

---

आकोल्यास नळाचें पाणी अद्याप पर्यंत पिण्यास मिळतें हा मोठाच लाभ होय. परंतु नळाच्या पाण्या संबंधानें फार गैरसोयी आहेत व त्याच्या पुरवठ्या विषयीं अव्यवस्थाही मोठी आहे. आणि त्यामुळें नळाच्या पाण्यापासून लोकांस अत्यंत ताप होतो. सुखाच्या आशेनें लोक नळाच्या पाण्याकडे धाव घेतात पण निराशेनें त्यास विन्मुख व्हावें लागून वेळ वाया जातो व उन्हांत भटकावें लागतें. पाणी वेळच्या वेळीं बिनचूकपणानें सोडण्याची व्यवस्था अवश्य झाली पाहिजे. हल्लीच्या पद्धतीमुळें लोकांस पाण्याच्या सोयी पेक्षां ताप बहुत होतो. पाण्याची व्यवस्था अद्याप पब्लिक वर्कस खात्याकडे आहे

आणि त्यांच्या हातून व्यवस्था नीट राहत नाहीं ही गोष्ट सर्व खात्याला कमीपणाची आहे. पाण्याचा खजिना लहान मोठा असेल त्या मानानें दररोज नियमित मापानें पाणी सोडलें पाहिजे. या विषयीं कोणाची तक्रार असूं शकणार नाहीं. लोकांची मुख्य तक्रार आहे कीं अव्यवस्थितपणानें पाणी नव्यांत सोडल्यापासून आणि ते धरसोडीनें कमीजास्त सोडल्यापासून लोकांस अतिशय त्राप होतो. मे. मीडो साहेब डिपुटी कमिशनर या प्रकरणांत विशेष लक्ष पुरवीत आहेत तेव्हां लवकरच कांहीं सुखकर व्यवस्था अमलांत येईल अशी आह्मी उमेद बाळगतों.

गरीब लोकांस सावकार लोक फसवितात आणि पुष्कळ प्रसंगीं सावकार लोकांनीं कुळाकडून करून घेतलेल्या करारा प्रमाणें कोर्टासही हुकूमनामे द्यावे लागतात. या दोन्ही गोष्टी बंद कराव्या, व्याजा संबंधानें कोर्टांतून ऋणकोस योग्य दाद मिळावी, आणि ज्या ठिकाणीं करार संशयात्मक असून सावकारानें कुळाला फुकट बुडविलें असें वाटेल त्या ठिकाणीं सावकाराला आपली सचोटी व खरेपणा शाबित करण्याचें भाग करावें ह्मणून निराळे फेरफार कराराच्या कायद्यांत करण्या विषयीं नामदार वुडबर्न यांनीं सूचना आणिली आहे. मूळ सूचना दोन आहेत कोर्टास जें व्याज योग्य वाटेल तें कोर्टानें देववावें आणि उभय पक्षकारा मधील करार कोर्टास बांधू शकणार नाहीं अशा अर्थाची पहिली सूचना आहे. ज्या कराराच्या दोन्ही बाजूचे पक्षकार समस्थितींत नाहींत आणि एकावर दुसऱ्याचा अनेक प्रकारें जोरा चालतो तो करार यथायोग्य आहे ही गोष्ट अधीक जोरदार पक्षानें शाबित केली पाहिजे. सध्यां हें बिल लोकांच्या विचारापुढें मांडलें आहे. अशा कायद्याचा कांहीं परिणाम चांगला होईल हें खरें तथापि शेतकरी लोकांचा तरणोपाय होईल असा मार्ग शोधून काढण्याचा मूळ प्रश्न या बिलानें कांहीं भागत नाहीं. कराराच्या कायद्यांतील दुरुस्तीनें लोकांची स्थिती ह्मणण्या सारखी सुधारत नाहीं ही गोष्ट सरकारला माहित नसेल अशी आमची समजूत नाहीं. न्यायकोर्टांतून गरीब लोकांस मदत देण्याची व्यवस्था होत आहे तशी कांहीं सोय मुलकी कोर्टाकडून साऱ्याच्या संबंधानें झाली पाहिजे. या देशांतील जनसमूहास लागलेला दारिद्र्याचा रोग कायद्याच्या सुधारणेनें दूर होण्या सारखा नाहीं. या पेक्षां दुसरें चांगलें औषध दिलें तरच हा रोग हटण्या सारखा आहे.

---

सरहद्दी वरील लढाई राज्यतृष्णेच्या तत्वावर नाहीं आणि रशियादि परचक्रापासून इंडियाचा बचाव करण्या साठीं सरहद्दीवरील लोकांस ब्रिटिश अमलाखालीं आणण्यांत येत आहे; असा विचार लार्ड राबर्टस यांनीं लार्ड सभेंत प्रदर्शित केला त्या वेळीं लार्ड रिपन यांनीं उत्तरा दाखल उत्तम भाषण केलें. त्यांनीं स्पष्ट कळविलें कीं सरहद्दीवरील लोकांशीं झालेला तह सरकार मोडीत आहे, त्यांचें स्वातंत्र्य नष्ट करीत आहे आणि इंडियावर मोठ्या कर्जाचा बोजा बसवीत आहे डोंगराळ लोकांस स्वतंत्रता ही प्राणा पेक्षांही अधीक प्रिय आहे आणि तिच्यावर कुऱ्हाड घालण्यामध्यें सरकारला भूषण नसून कांहीं फायदाही नाहीं. ही कटु गोष्ट लार्ड एल्जिन यांस आवडावी तरी कशी! सर वेस्टलांड यांनीं लढायी साठीं लक्षावधी रुपये आगाऊच राखून ठेविले आहेत ही रकम सरकार नवीन कर्जातून भागविणार आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY, APRIL 4 1898.

As days roll on and difficulties of life thicken upon us we are forced to undertake the unpleasant task of self examination. When we find so much poverty, so much misery about us in spite of the benign British rule and its philanthropic efforts to raise us, in spite of so many schools and colleges to educate our people, when we find that so many of us who have received the authoritative stamp of Universities, are often rejected as spurious articles in common walks of life we are perforce led to suspect that there must be some defect in the present system of Education.

We apprehend that the present educational institutions with some exceptions are emphatically institutions which propose to give liberal Education or so to train and develop the faculties of the scholar as to make a man—to enable him to take any professions for which he is especially fitted by nature and inclination. In this narrower sense it would therefore mean a kind of preparatory training.

This indicates that the end of this course of training is simply the beginning of the training with regard to other branches of practical utility which alone would bring us material prosperity.

But as a matter of fact we end here. We get liberal education but we go no further. We have perhaps badly assimilated some ideas, some smattering of rhetoric and we thus become pretenders and pedagogues. We have not been taught to observe, work and bring that mental development— so called result of liberal education to bear upon practical arts. Most of us, we may say without fear of contradiction, are miserably ignorant of the resources of our own country. Ask a man of average intelligence and learning how a coal mine is worked or what he knows about the manufacture of the common articles he uses every day and we at once see how helpless he is.

Let us therefore change our course. Let only those who have leisure, money and special mental capabilities aspire to the high culture of the Universities, but let the rest turn their attention to branches of practical utility Thus the disappointment which is the lot of many so-called educated persons will be spared. Let us now have commercial, technical & industrial schools and let the young scholar after his preparatory training be an actual worker and not a *theoriser* and *dreamer*.

In the most civilized countries like England, France, United States the children with special genius, or the children of gentry the richer classes—and not those of the populace—aspire to higher University attainments We must unfortunately confess that our country has been reduced to the lowest pitch of poverty. And there are few men whom we may call rich in the sense in which the word is understood in those countries. As it is there is a general and tremendous rush to the University from all ranks and classes, and most of the aspirants are rightly disappointed at the end of their course and then it is too late.

The Nation is extremely poor and its material wealth is being drained from year to year by the Britishers. We cannot rise as a nation unless we improve the national resources Development of diverse business is the key to check down the grouth of poverty and to improve the material prosperity in course of time. We request our readers to read earnestly the stirring appeal of Dr. King at the Madras Convocation to the new graduates. He remarked:—

"Railways now traverse tracts of country where lead exists, so rich in silver that it has been held it would pay to work it for the sake of this alone, where copper awaits treatment, where iron one of the purest varieties demands but coal to smelt it where kaolin is ready for the hands of the potter, where corundum is willing to yield its tribute of aluminium. Are you content in a country where the majority of the people wear cotton clothing, and sutable grass is to be found, to accept imported paper, where fluxes and glazes are avalable to import your stoneware and glazed pottery? must you look to Japan for your supply of matches—a country that within the memory of this generation devoted a few square yards of a single port to European trade, and would not accept the advantages of international commerce, till it received half an hour's teaching of what the resources of civilization were at the cannon's mouth, at Simonasaki? must your import from foreign countries the sheets of brass which you use for your domestic vessels; in a country that has no stint of fibre, must we ask for a piece of foreign-made twine before we can be quite sure a parced is safe? must even the glass of our windows and our bottles be of foreign manufacture? will you leave untouched the 60,000 horse power available at the Periyar works, or the riches obtainable from the phosphatic deposits in Trichinopoly, and not dare to enter a trade on which the Americans have embarked many million dollars successfully."

---

## वऱ्हाड

हवामान—उष्णतेचें मान प्रखर आहे पण गेल्या दोन दिवसा पासून पहाटेस थोडी थंडीही पडते. हवा निरोगी आहे. पाण्याबद्दल हाकाटी सर्वत्र आहे. किरकोळ दुखणीं वरीच वाढत आहेत. पारा १०४ अंशा पर्यंत चढतो.

कारंजा मुनसिपालिटीनें घराच्या किंमतीवर भंगीपट्टी व घराच्या वार्षिक भाड्याच्या उत्पन्नावर एक निराळा कर असे दोन कर चालूं एप्रिल पासून बसविले आहेत.

आह्मास लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं रा. रा. गणेश अनंत वैद्य. हेडक्लार्क निसबत शाळाखात्याचे डायरेक्टर यांस काळज्याच्या आजारानें शनिवारीं सकाळीं देवाज्ञा झाली. मृत्यू अगदीं बोलता चालतां आकस्मिक आला. तथापि गेल्या १५ दिवसांत छातींत दुखत असल्या बद्दल त्यांची विशेष कुरकूर होती. राजश्री गणपतराव स्वभावानें फार गोड, सरळ मार्गी व परोपकारी होते. डायरेक्टर साहेबांपाशीं राजश्री गणपतराव ह्मणजे एक मोहरा मनुष्य होता आणि त्यामुळें खात्यांतील सर्व लोकांस एक मोठें भरंवशाचें स्थळ वाटत असे. यांस विद्येची मोठी गोडी होती. त्यांनीं मणिबंध व मदनमंजरी अशीं दोन चांगलीं नाटकें लिहिलीं आहेत. मरणसमयीं याचें वय ५०।५१ होतें. दोन मुली व एक मुलगा अशीं ३ लहान लहान अपत्यें मागें आहेत. त्यांच्या द्वितीय कुटुंबावर हा मोठाच घाला पडला. वडील बंधु रा. रा. यज्ञेश्वर अण्णा यांनीं मनाचें शांतवन करून 'ठेविलें अनंतें तैसेचि रहावें' हा मंत्र जपला पाहिजे.

मे. बुलक कमिशनर साहेब हे येत्या बुधवारीं आकोल्यावरून मुंबईकडे जातील, त्यांच्या सन्मानार्थ उमरावतीस टोव्हेंजंग पानसुपारीचा समारंभ करण्यांत आला होता तसा आकोल्याच्या स्टेशनावरही एखादा समारंभ होईल असा बेत दिसतो. मे. बुलक साहेबांनीं आपल्या कामाचा चार्ज १ ले तारखेस मि. क्राफर्ड यांस दिला.

मि. सैफदीन खान लालखान यांस एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरची जागा मिळाल्या कारणानें त्यांच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं रा. रा. रंगनाथ विष्णु क्लार्क आफ कोर्ट, खामगांव, यांस बढती देण्यांत आली

मि. सुबराव नायडू हे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर झाल्यामुळें खालील बढत्या देण्यांत आल्या आहेत:—

| रा. रा. | तहशीलदाराचा वर्ग |
|---|---|
| गोविंद गंगाधर दामले | १ ला |
| नारायण बभुतासिंग | २ रा |
| वासुदेव विठ्ठल चांदेकर | ३ रा |
| कृष्णराव पुरुषोत्तम भट | ४ था |
| अश्रफअली खान | ५ वा |
| | १२० रु. |

रा. रा. कृष्णाजी अनंत तहशीलदार, चांदूर हे रजेवर जात असल्या मुळें यांच्या ३ महिन्यांच्या रजेंत रा. रा. कृष्णराव पुरुषोत्तम भट यांस मंगरूळपीराहून बदलून मंगरूळपीरच्या तहशीलीवर मि. अश्रफअलीखान यांस नेमलें.

मि. आर. ए. सिम्पसन हे रजेवरून परत आले असून वाशिमच्या डिपुटी कमिशनरच्या जागीं रुजूं होतील. आणि मि. रुस्तुमजी फर्दोनजी हे तीन महिन्यांच्या रजेवर जातील.

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार बी. ए. सी. आय. इ. माजी डायरेक्टर हे वाशिमहून पुण्यास रवाना झाले.

क्याप्टन ओ. जी आयव्हर्स कानटनमेंट माजिस्ट्रेट, शिकंदराबाद यांस येत्या १५ वे तारखेपासून दोन महिन्यांची रजा देण्यांत आली आहे.

येथील लायब्ररींत रा० रा० नारायणराव बर्वे यांनीं काल सायंकाळीं लायब्ररींत गोरक्षणा संबंधानें व्याख्यान दिलें.

---

## वर्तमानसार

चीनसरकारानें फ्रान्सला व्यापाराच्या ज्या सवलती दिल्या आहेत त्या देण्यांत इंग्रजी व्यापारास धक्का बसत असल्यामुळें त्याबद्दल इंग्लंडची चीननें संमत्ती घ्यावयास पाहिजे होती. या सवलतीनें कोलनची इंग्रजी मालकी दुळमळीत होऊन यूननमध्यें जाणारी इंग्रजी रेल्वेही बंद पडेल यासाठीं अशा प्रकारची सवलत देण्यापूर्वी चीननें इंग्लंडची सल्ला घेतलीच पाहिजे अशी इंग्लंडनें चीनला समज द्यावी असें तिकडील पत्रांचें ह्मणणें आहे. अशा प्रकारची सवलत अजून मिळाली नाहीं व ती देण्याबद्दल फ्रान्साकडून चीनला धमकीही गेली नाहीं मात्र त्याबद्दल प्यारिस येथें वाटाघाट चालूं आहे असें आतां बाहेर आलें आहे.

"राज्य चालविण्याची सर्व जबाबदारी आमच्यावर आहे, रिकामटेकड्या लोकांची वडबड ऐकून आमचे चालणार नाहीं; दंगेधोपे व राजद्रोह न वाढतील असे सक्तीचे उपाय आह्मास योजिलेच पाहिजेत" अशा प्रकारच्या गर्वोक्तींनी हल्लींचे राज्याधिकारी लोकमताचा जरी शेणसडा उडवूं लागले आहेत, तथापि हिंदुस्थानचे पूर्ण अनुभवी व इंग्लिश राष्ट्राचे खरे हितचिंतक आणि अभिमानी असे जे कित्येक ज्ञानवृद्ध युरोपियन गृहस्थ आहेत, ते योग्य ती सल्ला आपण अधिकाऱ्यांस द्यावी; मग ते ती ऐकोत, किंवा त्यांला ती रुचो किंवा न रुचो, हा पोक्त विचार मनांत आणून स्पष्ट शद्बांनीं बोलूं लागले आहेत. अशा दोन तीन स्पष्टवक्त्यांचे बोल आज आह्मी वाचकांपुढें ठेवीत आहों. ह्यांपैकीं पहिले गृहस्थ नाम. वेडर्बर्न साहेबांचे एक मित्र असून ते हिंदुस्थानांतून पेनशन घेऊन गेलेले एक जज्ज आहेत. त्यांणीं प्रस्तुत स्थितीबद्दल पुढील उद्गार काढिलेले आहेतः—"हल्लींचे दिवस कठीण आले आहेत. लोक भयभीत झाले असून सरकारानें एकंदरींत आपला रस्ता सोडला आहे. मी ज्या सरकारची हिंदुस्थानांत फार वर्षें नोकरी बजावली, आणि ज्या सरकारचा मला आजन्म चांगला अनुभव आहे, तें सरकार आतां उरलें नाहीं! हा स्थितीविपर्यास किती दिवस चालणार नकळे. पण हे ह्मातान्याचे शद्ब पक्के लक्षांत ठेवा कीं, हल्लींचा प्रकार इंग्लिश राज्याला किंवा हिंदुस्थानाला खचित हितप्रद नाहीं. गेल्या वर्षांत दक्षिणेंत जसा ब्रह्मघोटाळा झाला, तसा सत्तावन सालच्या बंडांतही झालेला नव्हता." नाम. वेडर्बर्न साहेबांनीं अशाच वेचक शद्बांनीं सरकारास सावधगिरीचा इशारा केला आहे. त्यांनीं सांगितलें कीं, "हिंदुस्थानच्या रक्षणाची मुख्य जी काय किल्ली, ती तुह्माला हिरात किंवा कंदाहार येथें सांपडावयाची नाहीं. तर रयतेची समाधानवृत्ती व तिचा उत्कर्ष ह्यांतच ती सांपडेल." आणखी दोघे स्पष्टवक्ते कलकत्ता येथील आंग्लो इंडियन डिफेन्स असोसिएशनचे प्रेसिडेन्ट नाम. टर्नरसाहेब व नाम. टिळकांचे ब्यारिस्टर मि० प्यु हे होत. ता० १६ रोजीं सदरील असोसिएशनची सभा कलकत्ता येथें भरली होती, त्यांत सरकारास काय सांगावयाचें तें ते निर्भिडपणें बोलून गेले नाम. टर्नर साहेबांनीं सांगितलें कीं "हिंदुस्थानांत अलीकडे वरचेवर दंगे होऊं लागले हें राज्यांतील अस्वस्थतेचें दर्शक असून हे दंगे पाश्चात्य सुधारणा—ती ग्रहण करण्यास लोक तयार नसतां—आह्मी बलात्कारानें त्यांच्या घशांत कोंबतों, ह्यामुळेंच होऊं लागले आहेत." मि० प्यू ह्मणाले कीं—"राजद्रोहि कायद्याचे संबंधानें लोकांच्या अर्जाची जीं पेंडोळीं आलीं आहेत, ती वाचण्यास आपणास वेळ नाहीं असें नाम. चार्मस साहेबांनीं जें सांगितलें, तें अगदीं अयोग्य आहे. लोकमतास असें धुडकून लावण्यांत कांहींएक मतलब नाहीं. आह्मी लोकप्रीती संपादन केली पाहिजे. ती संपादन केल्याशिवाय प्लेग निवारणाचे आमचे उपाय चांगल्या रीतीनें अमलांत आणितां यावयाचे नाहींत. मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सांडहर्स्ट यांनीं दंगा झाल्यावर बाबापुता करण्याचा प्रयत्न केला, तो त्यांनीं अगोदरच करावयास पाहिजे होता. तसें त्यांनीं केलें नाहीं ही मोठी चुकी झाली." हे ज्ञानवृद्धांचे शद्ब आज जरी कडूजहर वाटले, तरी प्रस्तुत रोगावर असल्या शद्बरूप कटु मात्रानींच कांहीं गुण आला तर येण्यासारखा आहे. ठा० अ०

### सरहद्दीविषयीं इंग्लंडांत चाललेला विचार.

सरहद्दीवर बरेच महिने माजलेलें रण आपणास पथ्यकर होणार नाहीं, असें हल्लींच्या टोरी प्रधान मंडळीस वाटूं लागलें असावें असें दिसतें. सिंधु नदी पलीकडील ब्रिटिश मुलखाचा एक निराळाच राजकीय विभाग करून त्यावर एका सिव्हिलियन अंमलदाराची नेमणूक करावी, व सरहद्दीवरील रानटी जातींशीं सर्व प्रकारचा व्यवहार सदर्हू सिव्हिल अधिकाऱ्यामार्फत चालावा, अशा तऱ्हेची कांहीं व्यवस्था व्हावी असें प्रधान मंडळीच्या मनांत आहे ही गोष्ट खरी असल्यास सरहद्दीवरील भानगडी पुष्कळ अंशीं कमी होतील असें मानण्यास आधार आहे. आजपर्यंत ही व्यवस्था लष्करी अंमलदारांकडे असल्यामुळें व अर्थात त्यांच्या पेशाप्रमाणें त्यांना शांततेपेक्षां लढाई जास्त प्रिय असल्यामुळें, लढाईची संधी ते सहसा फुकट जाऊं देत नसत. सिव्हिल कामगाराचें धोरण शांतता राखण्याकडे जास्त असतें सबब सरहद्दीवरील व्यवस्था पहाण्याचें काम सिव्हिल कामगाराकडे आल्यास शांततेचा भंग होण्याची फारशी भीति नको. सरहद्दीवरील गडबडी संबंधानें इंग्लंडांतील पत्रांतून जे विचार प्रगट होत आहेत, त्यावरून ही गडबड कायमची बंद राहील अशा प्रकारचे उपाय योजणें हल्लींच्या प्रधान मंडळास भाग पडेल असें दिसतें.

पंजाबांत लाहोर येथें एक नवीन देशी वस्तु करण्याचा कारखाना सुरू झाला असून त्यास शुक्राचार्यांचें विद्यालय असें नांव देण्यांत आलें आहे. या कारखान्यांत विद्यार्थी ठेवून त्यांस कुलपें, चाकू कातऱ्या कारागिरांची हत्यारें आणि घड्याळे दुरुस्त करण्याचीं हत्यारें वगैरे करण्यास इंग्लिश पद्धतीवर शिकविण्यांत येणार आहे.

हिंदुस्थानांत यंदां गव्हाचें पीक फार चांगलें येईल असा सरकारी अधिकाऱ्यांचा अदमास आहे. पंजाबांत दरसालपेक्षां नऊ टक्के गव्हाचें पीक जास्त होईल वायव्य प्रांतांतही दरसालपेक्षां जास्त होण्याचा रंग आहे. बंगाल्यांत पंधरा आणे पीक येईल. मुंबई इलाख्यांत गव्हाची लागवडच थोड्या जमिनींत झाली आहे. वऱ्हाडांत ५६ टक्के पीक येईल. निझामच्या राज्यांत ६६ टक्के येईल आणि मध्यप्रांतांत तेरा आणे पीक येईल असा अदमास आहे. स. वि.

मद्रास इलाख्यांतील पुढील वर्षीची प्रांतिक सभा कुंभकोन येथें भरविण्याचें ठरलें आहे.

लाहोर येथें इन्फ्लयूएंझा तापाची सांथ आली असल्याचें तेथील आर्यपत्रिकेवरून कळतें.

अगदीं अलीकडे सुधारलेला ह्मणून खगोलाचा नकाशा काढण्यांत आला आहे त्यांत फक्त ६८०,००,००० नक्षत्रें दाखविण्यांत आलीं आहेत.

सूक्ष्मदर्शक यंत्रांतूनच जे जीवजंतू दिसतात इतके ते सूक्ष्म असतात कीं, पोस्टाच्या एका टिकिटावर २५ कोटी प्राणी ऐसपैस राहूं शकतील!

ब्रह्मदेशांत चोहोंकडे आगगाड्यांच्या सडका करण्याचा हिंदुस्थानसरकारानें ठराव केला असून त्याप्रमाणें तिकडे एकसारखीं कामें चालूं झालीं आहेत

अमेरिकेंतल्या एका पदार्थशास्त्रवेत्त्या शोधक गृहस्थानें एक अशी तोफ बनविली आहे कीं, तिला दारूची मुळींच जरूर नसून विजेनें उडविण्यांत येते.

अतिशय प्राचीन यूनिव्हर्सिटी—जगांत अतिशय प्राचीन विश्वविद्यालय [ यूनिव्हर्सिटी ] प्यारिस नगरची आहे. ती एक हजार वर्षांची जुनी आहे असें सांगतात!

रंगून येथील टपालखात्यांत व्ह्याल्यूपेएबल वस्तु वांटण्याच्या शाखेकडील कांहीं घोंटाळा उघडकीस आला आहे. व तो घोंटाळा त्या शाखेकडील एक मद्राशी क्लार्क अधिराजलू नायडू यानें केला असून त्याला पोलिसानें पकडलें आहे.

गतवर्षी पंजाब इलाख्यांत विद्याखात्याकडे एकंदर ३०,७२.००० रु० खर्च झाले. ह्यांतील केवळ शिक्षक मंडळीकडे २०,३०,००० रु० खर्च झाले असून. बाकीचे रुपये शाळाखात्यावरील पहाणी तपासणीचे खात्याकडे खर्च झाले.

हिंदुस्थानांत गुरांचे रोग सुरू झाल्यामुळें इकडून आस्ट्रेलियांत जाणारीं गुरें, मेंढरें, उंट, शेळ्या हरिण आणि ह्या सर्व जनावरांचीं प्रेतें, कातडीं, लोंकर वगैरे कांहीं एक आस्ट्रेलियाचे बंदरांत उतरूं देऊं नये असा आस्ट्रेलियन सरकारानें ठराव केला आहे.

पुनः जाणार—उत्तरध्रुवाकडे फारच लांबीचा प्रवास करून आजपर्यंत कधीं कोणी शोध आणिला नाहीं असा त्या प्रदेशांतला शोध आणि माहिती मिळवून आणून यशस्वी झालेले प्रसिद्ध साहशी व शोधक डॉ. न्यान्सेन हे पुनः १८९९ सालीं आपल्या फ्राम नांवाच्या विमानासह जाणार आहेत. व त्यावेळीं त्यांची पत्नीही त्यांचे साहाय्यास जाणार आहे. ह्या गृहस्थांनीं उत्तर ध्रुवाच्या प्रदेशांत दूरवर पर्यटन करून भूगोलशास्त्रांतील माहिती फार वाढविली आहे.

हिंदुस्थानांतील लोकशिक्षणाकडे कसा खर्च होत आहे हें अगदीं अलीकडील सरकारी रिपोर्टवरून बघितलें तर असें समजतें कीं, वायव्य प्रांतात दरमाणसी दरसाल ८॥ पै प्रमाणें खर्च होतो हाच खर्च बंगाल व मध्यप्रदेश यांजमध्यें दरमाणसी दरसाल १० पै प्रमाणें, पंजाबांत एक आणा चार पै [१६ पै] प्रमाणे, मद्रासेस १७ पै प्रमाणें आणि मुंबई इलाख्यांत दरसाल दरमाणसी दोन आण्यांच्या वर सरकाराकडून खर्च होतो हा खर्च त्या त्या इलाख्यांतल्या एकंदर लोकसंख्येच्या मानानें बसतो असें समजण्याचें.

प्यारीस शहरांतील वृक्षछाया—प्यारिस शहरांत राजरस्त्यांचे बाजूस जे छायावृक्ष लाविले आहेत त्यांची संख्या ८५,६५६ असून त्या प्रत्येकास ७ पौन्ड प्रमाणें खर्च आला आहे. आणि ह्या वृक्षाची जोपासना करण्यास प्यारिसच्या म्यु. प्या. स दरसाल १०,५०० पौन्ड खर्च येतो. सारांश, प्यारिसच्या म्यु प्या. कडील वृक्षछायेचा खर्च जितका मोठा आहे तितका मोठा खर्च इतर कोणत्याही म्यु. प्या. कडील नाहीं. प्यारिसच्या बरोबरीचें स्वच्छ व सुव्यवस्थित शहर दुसरें जगावर कोणतेंही नाहीं हें सर्वश्रुत आहेच. ज्ञा० च०

पोष्ट खात्याचा नवा कायदा लवकरच पास होऊन तो येत्या जुलै पहिल्या तारखे पासून अमलांत येणार आहे. त्यांत असें एक कलम आहे कीं, ज्या मनीआर्डरीचा पैसा चिनपत्त्यामुळें मालकाला वर्षाच्या आंत न मिळेल त्या पैशावरचा मालकाचा हक्क नाहीं. तथापि त्यांत इतकें आहे कीं, इलाखे सरकाराला योग्य कारण दिसेल तर वर्षा नंतर ही पैसा मिळेल. परंतु तो पैसा हकानें मिळेल असें मात्र कोणी समजूं नये इकडे मनीआर्डर करणारानीं लक्ष देऊन नांव, गांव, पत्ता वगैरे बरोबर लिहावा.

काकेशस पर्वतांतील लोक आपल्या प्रत्येक मुलाला तो चालूं लागल्या बरोबर आपलें संरक्षण आपणाला करितां यावें ह्मणून खंजीर कसा वापरावा हें शिकवीत असतात.

सर्पाच्या विषाचें सत्व काढतां येतें. त्या सारखें जालिम विष जगांत दुसरें नाहीं एका अंगुस्तानांत मावेल इतकें तें सत्व २५ हजार माणसांचा जीव घेण्यास पुरतें.

इकडील महत्वाच्या राजकीय बातम्या बरोबर रीतीनें विलायतेस पाठविण्याची व्यवस्था मुंबई, मद्रास व कलकत्ता एथील कांग्रेस कमिट्यांनीं केली आहे. या बातम्या प्रथम ब्रिटिश कांग्रेस कमीटीकडे जातील व तिजकडून सर्व वर्तमानपत्रांस वांटल्या जातील आतां खोट्यानाट्या बातम्या विलायतेंत पसरविणाऱ्या खोडसाळ आंग्लोइंडियनांचा धंदा बसल्या सारखा होईल.

मद्रासे कडील समुद्र १८७६ साला पेक्षां ३ फूट उथळ झाला आहे ह्मणतात. धा. वृ.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................ ॥४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........ ॥१ ॥६

दुसरे खेपेस .... ......॥१

Six monthly......... 3 ............ 3 as

Single copy ........................... 4as

Advertisemen

Below 10 lines ......2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3 a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 11 APRIL 1898 NO 14

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख ११ माहे एप्रील सन १८९८ इ० अंक १४

नोटीस

मा. रा. मनसुकदास चुनीलाल मालक रामलाल मारवाडी दुकान खामगांव यांस नोटीस देणार गंगाबाई जवजे गणूसिंग रजपूत राहणार जानोरी निपाणीची नोटीशी नें असें कळविते कीं आज अदमासें तीन वर्षे होत आलीं माझ्या दंडांतील सोन्याचें कडें वजन तोळे सात दर तोळ्यास किंमत रुपये सव्वीसचे भावाचे तुह्मा पाशीं गाहाणवट ठेऊन रुपये साठ, सोने गाहाण ठेऊन ज्या व्याजाच्या दरानें मिळालें जातात त्या दराने आह्मी तुह्मा पासोन सदरहू सोने गाहाण ठेवून काढिले त्यानंतर अदमासें चारपांच महिन्यानीं मी तुह्मास माझ्या शेतांतील कापूस विकुन रु. तीस आदा केले. त्यास अदमासें दोन वर्षे झालीं. आता तुमचे राहिलेले रु. तीस व सदरहू रकमेचे शीरस्त्या प्रमाणें तीन वर्षाचें व्याज देणें राहिले आहे व त्या करितां माझे सोन्याचे कडे तुह्मापाशीं गाहाण आहे ही नोटीस पावल्या पासून चार दिवसाचे आंत तुमची व्याजा सह सर्व रक्कम घेऊन जावी व माझी जिन्नस मला द्यावी तुह्मी व्याजाच्या व इतर कोणच्याही लालचीनें फिर्याद वगैरे कराल तर त्याचा खर्च व नोटीस दिल्या तारखे पासून व्याज मिळणार नाहीं माझे कडे तुह्मापाशीं गाहाण आहेत तें नोटीस पावल्यावर तुह्मी आपले सर्व रुपये घेऊन परत न केल्यास रीतशीर तजवीज केली जाईल. ह्मणून दिली नोटीस सही. तारीख ७।४।९८ इसवी.

सही

सहीची निशाणी बांगडी गंगाबाई जवजे गणूसिंग रजपूत

---

नोटीस.

रा० रा० खंडु वल्लद सीदाजी जात गवळी राहणार चांदूर तालुके व जिल्हे अकोले यांस

नोटीस देणार सिताराम वल्लद नारायण पाटील राहणार चांदूर तालुके व जिल्हे अकोलें नोटीसीनें असें कळवितो कीं तुमच्या आमच्या भागिनींतील नंबराचे सरकारी साऱ्याचे रुपये मामुल वहीवाटी प्रमाणें तुह्मापाशी पाटीलपांड्या देखत देत असतांना तुह्मी घेतले नाहींत. आतां सदर्हू साऱ्याच्या रुपयाबद्दल पुढें मागें तुह्मी व्याज लावाल व कदाचित् फिर्याद वगैरे कराल त्याजबद्दल कोणच्याही प्रकारचा मी जबाबदार नाहीं. सदर्हू सेतसाऱ्याचे रुपये रा० रा० कडताजी वल्लद प्रिथमजी पाटील राहणार चांदूर तालुके अकोले याजपाशी आह्मी रुपये साऱ्याचे आनामत ठेविले आहेत ते तुह्मी वाटेल तेव्हां त्यास पावती देऊन रुपये घेऊन जावेत कळावें. तारीख ६ माहे एप्रील सन १८९८ इ०

सही

सहीची निशानी वखर सिताराम वल्लद नारायण पाटील राहणार चांदूर निशानी खुद्द हातची असे.

---

वऱ्हाडसमाचार

---

मित्ती चैत्र वद्य ५ शके १८१९

---

हिंदुस्थानच्या खजिन्यांत भयंकर तूट पडत चालली आहे. अगोदरच, जमा व खर्च या दोन तोंडाचा मेळ नव्हता. खर्चाच्या बाजूला कांहींच निश्चितपणा नाहीं आणि खर्चाचे दरवाजे असे खुले आहेत कीं वसुलाची रक्कम कितीही व कोणत्याही प्रकारें वाढविण्याची अखेर मजल मारली तथापि खर्च भागत नाहीं. आदा असेल त्या मानानें जेथें व्यय नाहीं तेथें नादारी उभी ठाकलीच असें समजले पाहिजे. आणि हीच स्थिती आमच्या कर्जबाजारी व बेताल खर्चिक सरकारची आहे. हिंदुस्थानचे धूर्त फडणीस वेस्टलांड हे आंकेड इतक्या खुबीनें मोडतात कीं त्यांनीं गुदस्त सालचा आढावा व चालू सालचा जमाखर्ची अंदाजा हे कळवितांना हिंदुस्थानच्या खजिन्याची सुस्थिती दर्शविली आहे. वास्तविक प्रकार फार शोचनीय आहे. कसूल वाढविण्याची कमाल झाली आणि खर्चाच्या तोंडास तर काडीमात्र धरबंध नाहीं. सर वेस्टलांड यांनीं गेल्या बजेटपत्रकांत जमे कडे वाढवा दाखविला आहे तो पोकळ भ्रामक आहे. हुंडणावळीचा भाव वाढला ह्मणून सरकार कर्जाच्या पेचांत आलें ह्मणून जी ओरड आहे ती सत्याला सोडून आहे. हुंडणावळी मुळें नुकसान आलें तथापि सरकारच्या लढाया, सरहद्दी वरील कमिशनें वगैरे अवाढव्य खर्चाचीं कामें नादान स्थितीचीं खरीं कारणें आहेत.

---

वऱ्हाड प्रांतांत शेतकऱ्या संबंधानें कांहीं सवलती सरकारांतून योग्य वेळेवर मिळाल्या नाहींत तर या प्रांताची दैना पराकाष्टेची होईल. सरकारांतून या दोन मार्गांनीं मिळाल्या पाहिजेत. पहिला मार्ग न्यायकोडतांच्या हातून चालू झाला पाहिजे. दक्षिणेंतील शेतकऱ्याचा कायदा जसा आहे तसा आमच्या प्रांतासाठीं निराळा कायदा केला जावा. आणि मुलकी खात्या कडून दुसरा मार्ग खुला व्हावयाला पाहिजे. या मार्गांत मुख्य तीन गोष्टी येतात पहिली बाब शेतकऱ्यांस कमी व माफक व्याजानें कर्ज मिळावें ही होय. सरकारचीच किंवा सरकारच्याच आश्रया खालीं शेतकऱ्यांची पेढी निघाली पाहिजे. अशी पेढी जोपर्यंत निघत नाहीं तोंपर्यंत शेतकऱ्यांस काबाडकष्ट करूनही पोटभर खाण्यास मिळणार नाहीं. शेतकऱ्यांच्या जमिनी न विकल्या जातील अशाविषयीं कडक मुलकी नियम पाहिजेत. कर्नल मेकेंझी जुडिशिअल कमिशनर असतांनाच त्यांनीं हें संकट ध्वनित केलें होतें. त्यांच्या पक्के लक्ष्यांत आलें होतें कीं, जमिनी बहुतेक शेतकऱ्यांच्या हातून भराभर जात चालल्या आहेत आणि शेतकरी ह्मणजे शेतांतले मोलमजूरदार होत आहेत. दहा वर्षां पूर्वी भावी संकटाचीं पूर्व चिन्हें ह्मणून ही गोष्ट कर्नल मेकेंझी यांच्या लक्ष्यांत आली होती. परंतु सांप्रतची शेतकऱ्याची स्थिती पक्केपणीं ओळखली ह्मणजे जमिनी शेतकऱ्यांच्या हातांतून हिरावल्या जात आहेत हें मोठें अरिष्टकारक वाटेल. तिसरी बाब सारा वसूल करण्या संबंधानें आहे. शेत पीको अगर बुडो, वायदा हा चुकावयाचा नाहीं किंवा पै भर कमी व्हावयाचा नाहीं आणि शिवाय तो देण्याची तारीख ही मागे पुढें व्हावयाची नाहीं. असा जबरदस्त मुलकी कारभार आहे. साऱ्या संबंधानें कांहीं उणें पडलें कीं तत्काळ जमिनीचा लिलाव होऊन व कुळाचें घरदार विकलें जाऊन पैसा वसूल केला जातो. जन्मभर पोट शेतीवर चालवावयाचें असतें तेव्हां ती नाहींशी होऊं नये ह्मणून इतकी रात्रंदिवस शेती घरांतच कायम राखण्या विषयीं लोक दक्षता ठेवितात तथापि कर्जावरील व्याजाचा व वायद्याचा घोडा भरधांव सुटलेला असतो आणि त्याच्या टापाखालीं व दुगाण्या खालीं घायाळ होऊन शेतकऱ्यास आपली जमीन दुसऱ्याच्या स्वाधीन करावी लागते. चौदा वर्षां पूर्वीं या प्रश्नाचा खल दुष्काळ—कमिशनानें केला होता आणि त्यावेळीं कमिशननें अभिप्राय असा दिला होता कीं शेतकऱ्यांची सुस्थिती राखणें ह्मणजे शेतकरी, त्यांचीं कुंटुंबें व गुरें ढोरें यांच्या खाण्यापिण्याचा योग्य बंदोबस्त झाला पाहिजे. आणि शेतीचीं आऊतें, पाण्याचा पुरवठा व काम धंद्याच्या सोयी हीं सर्व साधनें मुबलक पाहिजेत. यापैकीं कोणतेंही कमी पडलें तरी शेती नीट चालणार नाहीं.

सारांश, सरकारी सारा जबर बसला, सारा वसूल करण्यांत करडी नजर ठेविली, कर्जाऊ पैसा माफक व्याजानें मिळाला नाहीं. आणि पीकपाणी बरोबर झालें नाहीं तर शेतकऱ्यांची निभावणूक व्हावी ह्मणून सरकारनें वेळेवरच उदार बुद्धीनें कांहीं सवलती दिल्या पाहिजेत.

---

बाबू आनंद मोहन बोस व रोमेशचंद्र दत्त हे उभयतां विलायतेस मोठी नामी देशसेवा करीत आहेत ही अतिशय आनंदाची गोष्ट होय. या दोन गृहस्थांनीं विलायतेस व्याख्यानें देण्याचा तडाखा चालविला आहे. इंडिया संबंधाची माहिती इंग्लिश लोकांस देण्याचा संकल्प आहे आणि तो त्यांनीं मोठ्या बहादरीनें व धन्यतेनें फलद्रूप केला आहे. त्यांच्या व्याख्यानांनीं इंग्लिशांच्या मनांत इंडिया विषयीं प्रेमभाव वाढत चालला असून या देशाचे कैवारी ह्मणून पुष्कळ लोक आपल्या वतीनें भांडण्यास पुढें येत आहेत. विलायतेस राष्ट्रीय सभा भरविण्याचा प्रश्न गेल्या वर्षी, निघाला होता. त्या राष्ट्रीय सभेनें जो कार्यभाग केला असता तो या दोन बाबू गृहस्थांच्या उत्कृष्ट देशसेवेनें अंशत: तरी चांगला सिद्धीस जात आहे. प्रस्तुत इंडिया सरकारची राजनीति नेटिव लोकांच्या महत्वाकांक्षेला कायद्या खालीं चिरडून टाकीत आहे आणि या दडपशाहीचा कारभार सर्व देशास चिंताक्रांत करून सोडित आहे अशा समयीं बाबू आनंद मोहन बोस व रोमेशचंद्र दत्त यांनीं इंडियाच्या अशा वाईट राजनीतीच्या खऱ्या परिणामाचा डंका इंग्लंडांत वाजविला आहे आणि त्या मुळें कांहीं तरी दाद मिळण्याची आशा उत्पन्न होत आहे.

मुंबईच्या दंग्याला उद्देशून बाबू रोमेशचंद्र यांनीं एक उत्कृष्ट लेख प्रसिद्ध केला आहे. ते लिहितात कीं सरकारानें राजद्रोहाचा कायदा नवीन केला ही मोठी चूक होय. सरकारची पद्धती अगदीं चुकीची होय. वर्तमानपत्रकर्त्यांचीं तोंडें बंद केल्यानें असंतोषाच्या गोष्टी दूर होत नाहींत तर उलट पक्षी असंतोषाचा उद्गार दंग्याच्या रूपानें बाहेर पडतो. लोकांच्या मनोवृत्ती प्लेगाच्या कडक बंदोबस्तानें बिघडल्या आहेत असें पत्रकर्ते राजनिष्टेनें कळवीत होते तरी देखील मुंबई सरकारानें काना डोळा केला आणि परिणाम, दंग्यांत झाला ही गोष्ट ध्यानांत न घेतां नामदार चामर्स यांनीं पत्रकर्त्यांवर फार कटाक्ष धरला आणि राजद्रोहाच्या कायद्याचा विजयध्वज उभारला. सत्ताधारी सर्व गोष्टी करूं शकतात. गेल्या नऊ महिन्यांचें चित्र काढतांना बाबू रोमेशचंद्र लिहितात कीं लोकमताची पायमल्ली सरकारनें सर्व बाजूंनीं केली. पुण्याचे दोन प्रमुख सरदार प्लेग संबंधी गाऱ्हाणें गात होते ते सध्यां तुरुंगांत कालक्रमणा करीत आहेत. वजनदार वर्तमान पत्रांच्या प्रकाशकांवर राजद्रोहाचे खटले केले आणि त्यांस शिक्षा दिल्या या मुळें सर्व देश हळहळत आहे. राजद्रोहाचा कायदा सर्वत्र गाजविला आहे. या राजकीय गोष्टीमुळें लोकमत प्रकाशांत येऊं

शकत नाहीं आणि लोकांच्या मनांत धुमसत असलेला असंतोष दंग्याच्या रूपानें जगास दिसून पडला.

---

अबकारी खातें सरकारच्या दांडग्या उत्पन्नाची बाब आहे. या खात्याच्या उत्पन्नांत मोठा वाढवा आला आहे ही गोष्ट हिंदुस्थानचे फडणीस सर वेस्टलांड यांनीं कायदे कौन्सिलांत कबूल केली. ते गेल्या ३० वे तारखेस ह्मणाले कीं:—'अबकारीचें उत्पन्न पुष्कळ वाढलें आहे ही गोष्ट मला कबूल आहे. ज्याला दारूच्या पेल्यांची मजा पाहिजे किंवा तसलेंच एखादें मादक पेय ज्याला अगत्य लागेल त्याला तीस वर्षां पूर्वीं जो दाम पडत असे त्या पेक्षां आतां अधीक दाम खर्चावें लागतात. तथापि सरकारी करामध्यें ही निराळी भर पडली अशी माझी समजूत नाहीं. ज्या नामदार सभासदांनीं गेल्या वीस वर्षांत सरकारी कर वाढले असल्या विषयीं ओरड केली आहे त्यांस देखील कबूल करावें लागेल कीं अबकारीचें उत्पन्न ज्या लोकांकडून वसूल केलें जातें त्यांच्यावर त्या उत्पन्नाचा बोजा जास्त बसविणें अगदीं कायदेशीर व यथायोग्य आहे." अबकारी खात्याचें उत्पन्न वाढविण्याला जीं कारणें येथें दर्शविलीं आहेत तीं इतकीं नामी आहेत कीं दारू पिणाऱ्या व्यसनी लोकांवर केवढाही दारूचा कर बसविणें यथान्याय होईल. वरील निधानात सरकारच्या अबकारी खात्याचीं मूलतत्वें उत्तम प्रकारें वर्णन केलीं आहेत परंतु त्या मूलतत्वा मध्यें एक मोठी चूक होत आहे. लोकांच्या दुर्व्यसनावर सरकारनें आपला खजिना ओतप्रोत भरावा ही गोष्ट न्यायदृष्टीनें मोठी लांछनास्पद होय. लोकांची व्यसनाधीनता सरकारच्या फायद्याला कारणीभूत होत आहे तथापि सरकारचा हेतु लोकांचे मद्यपान कमी करण्याकडे असला पाहिजे. मद्यपान कमी करण्याच्या दृष्टीनेंच अबकारीचे कर लोकांवर बसविले पाहिजेत. लोक दुर्व्यसनी आहेत ह्मणून त्यांस त्या व्यसना बद्दल सरकारी कामांनीं पिळून काढणें मोठें अन्यायाचें काम होईल. लोकांस मद्यपानादि व्यसना पासून परावृत्त करण्या साठीं किंवा त्याचीं व्यसनें मर्यादित करण्या साठीं अबकारीचा कर बसविण्यांत आला आहे. मादक पदार्थ महाग झाल्यानें लोक त्यांचे सेवन कमी करितील अशी सरकारची मूळ समजूत आहे आणि ती समजूत कांहीं मर्यादे पर्यंत खरीही आहे. तथापि ती मर्यादा उल्लंघन करणें व लोकांच्या व्यसनावर उत्पन्नाच्या बाबी वाढविणें ह्मणजे खऱ्या चांगल्या मूळ तत्वांचा प्रतीकार किंवा दुरुपयोग करण्या सारखें आहे. हल्लीं सरकारचीं अबकारी खातें उत्पन्नाची कामधेनु बनविली असून तिच्या मुळें लोक मद्यपानासारख्या व्यसना मुळेंच धुळीला मिळत चालले आहेत. लोकांचीं हीं व्यसनें अधिकाधिक खर्चाचीं होत गेल्यामुळें व्यसनें तर कमी होतच नाहींत पण कुटुंबांचीं कुटुंबें सरकारी अबकारी खात्यामुळें अन्नाला महाग झालीं व अस्ताव्यस्त होऊन अगदीं ठार बुडालीं.

अबकारीचें उत्पन्न पराकाष्ठेचें वाढविणें ह्मणजे मनुष्य स्वभावाला विसरल्या प्रमाणें आहे. मद्यपानाचीं व्यसनें जगाच्या आरंभा पासून आहेत. तीं मनुष्याच्या हाडमासांत खिळलीं आहेत. सरकारी कर मादक पदार्थी वर बसला ह्मणजे लोक बेताबेतानें वागतील हें खरें तथापि त्यांचीं दुर्व्यसनें समूळ नाहींतशीं होणार नाहींत. गेल्या वर्षीं दुष्काळा मध्यें अन्नच मिळत नव्हतें त्या वेळीं लोक दारू वगैरे फार कमी पण सेवन करीतच होते असें आपल्या अनुभवास आलें; अशा अन्नान्न दशेंत देखील लोकांची व्यसनासक्ति नष्ट होत नाहीं तर ती साधारण स्थितींत कांहीं अंशानें कायम राहील हें उघड आहे. लोकांच्या व्यसनांवर धरबंध राहील अशा बेतानें अबकारीचें माफक उत्पन्न असावें पण त्या पुढें हें उत्पन्न वाढत गेलें तर त्याचे वाईट परिणाम घडतात. नामदार विजय राघवाचारी यांनीं मद्रासच्या कौंसिलांत थोड्या दिवसा पूर्वीं या संबंधानें मोठा बोध केला आहे. ते ह्मणतात कीं मद्यादि पदार्थ अधिक महाग विकल्यानें गरीब शेतकरी लोक अधिक भिकारी होतात. त्यांच्या हातून दारू सोडवत नाहीं आणि ते मरे पर्यंत दारूचा पेला मिळण्या साठीं जीव कीं प्राण करतील. अबकारी खात्यानें लोकांचीं व्यसनें मर्यादेच्या आंत न ठेवितां एका प्रकारें मद्यपानाचा दरवाजा खुला केला असून त्या बरोबर लोकांच्या हातीं दारिद्र्याचा पेला न कळत दिला आहे. सरकारी राजनीतिनें प्रस्तुतच्या अबकारी उत्पन्ना मध्यें मोठी घातुक दिशा घेतली आहे हेंच सरकारच्या व लोकांच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न आह्मी आज केला आहे.

---

व्हाइसराय साहेबांच्या कायदे कौंसिलांत बिन-सरकारी कौंसिलदारांनीं आपली कामगिरी उत्कृष्ठ पणानें बजाविली आहे. नामदार आनंदाचार्लू, सयानी, पंडित विश्वंभर नाथ, चिटणीस इत्यादिकांच्या उत्तम देशसेवे बद्दल सर्व लोक त्यांचे धन्यवाद गात आहेत. सरकारचें बहुमत सदोदित असतें. सरकार तर्फे मत देणें हें सरकारी कौंसिलदारांचें मुख्य कर्तव्यच बनलें आहे असें वाटतें. गेल्या महिन्यांत या बड्या कौंसिलची कलकत्याची बैठक संपली तेव्हां ही गोष्ट निदर्शनास आली कीं कायदेकौंसिलांत खरा वादविवाद होऊन प्रत्यक्ष फायदा तर होतच नाहीं पण उलट पक्षीं वादविवादाचें उत्तम प्रहसन होतें. सरकारचें बहुमत कायमच आहे. बिन-सरकारी लोकप्रतिनिधींच्या अभिप्रायांचा बहुमान एवढाच कीं त्यांचीं भाषणें वाचण्यांत येतात. लोकमत अशा प्रकारें कळावें व त्या नंतर तें पायमल्लींत यावें हाच गेल्या सेशनांतील वादविवादाचा मथितार्थ निघेल. नवीन लोकप्रतिनिधींचें संभाषण अरण्यरुदिता प्रमाणें होत असतें तेव्हां लोक प्रतिनिधी नेमण्याचा केलेला उपकार लोकांच्या आदरास व कृतज्ञतेस पात्रच आहे असें आमच्यानें ह्मणवत नाहीं लोकमताला कांहीं मान मिळेल आणि शेंभर प्रश्नांतून एका प्रश्नांत तरी सरकारचें मत लोकमतापुढें त्याज्य होईल असा योग्य फेरफार कायदे कौंसिलांत झाला पाहिजे. पिनलकोड, क्रिमिनल प्रोसिजर, पोस्टल कायदा इत्यादि कायदे पसार झाले आहेत तथापि ते कौंसिलाच्या रचनेचा दोष अगदीं खुलावटीनें दाखवितील आणि इंडिया सरकारच्या कायदेशीर दांडगाईची उत्तम साक्ष देतील.

---

गेल्या दुष्काळांत मुंबईचें दुष्काळ-कोड वऱ्हाडांत प्रथम चालूं केलें होतें पण अनुभवा अंतीं पुष्कळ फेरफार वायव्य प्रांताच्या दुष्काळकोडा प्रमाणें करण्यांत आले. एकंदरीनें या प्रांताला वायव्य प्रांतांतील दुष्काळ-व्यवस्था चांगल्या लागू पडल्या आणि त्याच विशेष फायदेशीर आहेत असें पुष्कळ दुष्काळा-वरील अधिकाऱ्यांचें ह्मणणें पडतें. गांवोगांवचे लोक एखाद्या मोठ्या कामावर नेमण्यापेक्षां ज्या त्या गांवचे लोक तेथेंच मोलमजूरीला लावणें चांगलें फायद्याचें असून लोकांसही सुखावह होतें. गांवोगांव अशी व्यवस्था सरकार मार्फत होणें मोठें कठीण पडतें परंतु तीच गोष्ट सरकारच्या पैशाच्या मदतीनें गांवोगांव उत्तम प्रकारें अमलांत आणिता येते. या जिल्ह्याचे आफिशिएटींग डिपुटी कमिशनर मे. प्रीडो साहेब यांचें मत असें आहे कीं जमिनीच्या सुधारणेच्या कायद्याखालीं कुळास दिलेला कर्जाऊ पैसा खेड्यांतील लोकांस खेड्यांतच मोलमजुरीच्या कामावर लावण्यांस मोठा उपयोगीं पडतो; आणि त्या पैशाचा व्यय दुष्काळाच्या वर्षांतच केला पाहिजे अशी अट कर्ज देतांना सरकारनें घालून ठेविली पाहिजे. कुळाला जें कर्ज द्यावयाचें त्यांतून चौथाई सूट दिली तर असें कर्ज पुष्कळ लोक मोठ्या आनंदानें घेतील, गांवच्या लोकांस रोजगार धंदा मिळेल आणि सरकारच्या पेढी प्रमाणें लोकोपकाराकडे उपयोग होईल. हा उपयोग कांहीं लहानसहान नाहीं." हा सरकारी अधिकाऱ्यांचा अभिप्राय मोठ्या महत्वाचा आहे. शेतकरी लोकां साठीं पेढ्या किती अवश्यक आहेत आणि दुष्काळाच्या वेळीं देखील अशा पेढ्यांचा किती फायदा आहे ही गोष्ट पुढील उपयोगा साठीं निदान सरकारनें लक्ष्यांत घ्यावी अशी आमची सविनय प्रार्थना आहे.

---

# The Berar Samachar

**MONDAY, APRIL 11 1898.**

---

The budget of 1898—99 is more valuable for the learned discussion over it that for the original text itself. The official members have done a public service of proclaiming from the house-tops the main principles of the present policy of the Government. The non-official members have done their best to illustrate the pitfalls in that policy of repression. Both sides have tried to view a number of questions from their own stand points..The public voice is of course lost in the authoritative declarations of the Government members. But the fact is there that the public opinion asserts itself. The force of its logic brings couviction with it; and just as good wine needs no bush the opinion as expressed in the cloak of cloquence and based on facts and figures requires no trumpeting in the name of this or that lordship.

The budget fails to satisfy the tests of economy and sound statesmanship. It promises a golden future and is optimistic in every detail. The rosy picture is far from the stern reality. The National debts have assumed immense proportions. The military expenditure has outstripped all possible limits of economy. Finances make or unmake a state. India as a nation is a slave to English generosity, and is ready to have a bankruptcy certificate. England will be India's creditor and will domineer over every prospect of exploiting India to the best and richest advantages of the English people. The budget tells a sad tale when it makes no provision to pay off the growing debts. It provides for the frontier war in a handsome manner when the Imperial interests of England ought to satisfy all claims on account of this war. It is no matter for alms or donation England is bound to pay for the extensions of the English dominions.

Such a state of affairs paralyses all useful works of promoting the people's welfare. The policy is to increase the revenue in every possible manner. The poor ryot is taxed to an unbearable degree. Further taxation is an impossibility and with all that, the land—tax is increased to an enormous extent. The rule of revising the old assessments serves like a magic wand. The method is to reclassify the land and enhance the assessment on the improved condition of land. The peasentry forms the over—whelming majority of the Indian people and pays the heay land—tax without a murmur. But the effect is demoralizing to the progress of the nation. Poverty becomes the rule with those who live on agriculture. The time is fast ap—proaching when the revenue from the land—tax should be realxed if the Government wish to keep peace and contentment amongst the masses. People care for the nation because their dearest stakes lie in the well—being of the nation. When even a competency of income is not the fruit of agriculture people do not know why their native country should be a matter of patriotic pride with them The present policy of realizing the land—tax is not good at all and we should like to take our readers over the lucid arguments of the Hon'ble Mr Ananda Charlu in this connection. He remarked in the course of his debate on the budget to the following effect:—

"It has thus become an imperative duty and a paramount consideration for the responsible Govetnment to grapple with the problem how best to secure such a vantage ground for the people, the bulk of whom eke out their existence by agriculture, and a large percentage of whom live by handicrafts of many sorts. It is in proportion to the approach, made by men sitting at the helm of Indian affairs, towards a solution of this problem, that credit is scored or reputation is achieved by them. To shuffle the cards so as to make the two ends meet for any particular year,—by continually raising loans, by waving famines out of sight, by relying on bumper crops, as sure not to come as to come, by expecting the next or any year's harvest to pay, not only that year's tax, but also those that have been suspended in the previous year or years, by leaving nearly all the taxes at the enhanced rates they have been for years, by budgeting for moderate sums under this or that head, which when revised in the light of actualities mount up severalfold, as for instance the Budget famine allotment doubled itself in the Central Provinces and more than quadrupled itself in Madras, by shutting the eyes and the ears to provocations of wars

on the frontier, constantly on the card, and other makeshifts,—to do all this, without also making any appreciable advance in finding out a clue to the solution of that vital problem, is neither a solid triumph of talent nor a matter for enduring faction. Even from the days of the Court of Directors, was the prosperity of the rayat population, so that the taxes levied may leave a margin with a view to meeting any increase in the cost of agriculture and providing for a rise in the standard of living. The figures I quoted in the commencement of my remarks to day would seem to shew that the need exists, not only to leave a margin to meet any increase in the cost of agriculture and not only to provide for a rise in the standard of living which inevitably multiplies the material requisites of a civilized life under the enlightened British rule, but need has also arisen for something far more urgent, namely, to lay the foundation for two other and comparatively minor objects, *i. e.*, to enable vast multitudes, *firstly*, to earn the necessaries for existence, and *secondly*, to command the necessaries for efficiency. In the face of this accumulated and complex responsibility there must be a radical change in the revenue administration of the country. 'The Difficulty of finding other sources of revenue' have long solved this problem. That ought no longer to weigh in the balance; but on the contrary the present policy must be resolutely and with a solemn sense of duty reversed or gradually give way, and we must go back to the one reform which, soon after Her Majesty's assumption of the government of the country, the statesmen of both the parties in England agreed to be the only one calculated to bring competence and contentment before long and lead in its wake to prosperity all round. The reform I allude to is what has been authoritatively called *a permanent and perpetual settlement of land—revenue.*"

We hear that an entertainment is to be given tomorrow evening (12th instant) to Mr. R. Obbard Judicial Commissioner, at the rooms of the Native Club, Amraoti.

## वऱ्हाड

वऱ्हाड हास्पिटल असिस्टंटच्या वर्गाची प्रवेश परीक्षा येत्या २० वे तारखेस उमरावती व चदरघाट येथें होणार आहे.

शेगांव मुनासिपालिटीनें इमारतीच्या वार्षिभाड्याच्या उत्पन्नावर भंगीपट्टीची आकारणी चालू एप्रिल पासून केली आहे.

रा. रा. गोपाळ नारायण बापट बी. ए. एल. एल. बी. एक्स्ट्रा असि. कमिशनर, मोर्शी यास स्मालकाज कोर्टाचा १०० रुपया पर्यंतचा अधिकार व माजिस्ट्रेट वर्ग १ चा अधिकार देण्यांत आला.

आकोला जिल्ह्यांतील देशमुख व देशपांडे यांच्या वतीनें रा. रा. रामराव गोपाळ, मुगुटराव बळवंतराव, खुशालराव गणपतराव व आनंदराव हरिसिंग यांनीं मे. बुलक साहेब कमिशनर यांस गेल्या बुधवारीं पानसुपारी दिली. थाटमाट फार चांगला होता.

मे. बुलक साहेब यांच्या सन्मानार्थ मुनशी अजिजुद्दीन यांनीं मेजवानीचा समारंभ शेगांवच्या स्टेशनावर केला होता. पाहुणचार घेऊन सर्व मंडळी संतोष पावली.

वऱ्हाड प्रांतांत गांजावर दर शेरी ३ प्रमाणें व भांगेवर दर शेरी १ रुपया प्रमाणें कर चालू महिन्या पासून आकारण्यांत येतील.

राव बहादूर सिताराम विश्वनाथ पटवर्धन डायरेक्टर हे उद्यां पासून दोन महिन्यांच्या रजेवर जातील आणि त्या रजेंत रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी हे डायरेक्टरचें काम पाहतील. त्या शिवाय त्यांच्याकडे आकोला व बुलढाणा येथील डिपुटी इनस्पेक्टरची कामगिरी आहे ती कायमच राहील ह्मणजे ते एकटे डायरेक्टर ए० इन्स्पेक्टर व २ डे० ए० इन्स्पेक्टर इतके एकदम आहेत!

मि. पीक ए. अ. कान्सरव्हेटर यांस तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली आहे.

मे आबर्ड जुडिशिअल कमिशनर यांस उद्यां सायंकाळीं उमरावती येथें नेटिव क्लबांत मेजवानी करणार आहेत.

### नोटीस

रा. रा. विक्रम वल्लद सूर्यभान पाटील राहणार पातुर शेखबाबु साहेब तालुके बाळापूर यास नोटीस देण्यांत येते कीं मी तारीख २९।३।९८ इ. रोजीं शुद्धवऱ्हाडी छापखान्यामार्फत नोटीस तुह्मास दिली आहे. ती बहादरसिंग व हरीसिंग यांचे सांगण्यावरून दिली आहे ती हकीकत सर्व खोटी आहे. कारण तुह्मास जें माझें बागाईत पातूर तालुके बाळापूर येथील शेत सर्वे नंबर ४९ चे तारीख १५।२।९८ इ० रोजीं खरीदीखत लिहून दिलें तें बरोबर आहे व त्याचें खातें तारीख ११।३।९८ इ० रोजीं लावून दिलें. तें ही बरोबर रीतीचें आहे. मी शुद्धवऱ्हाडींत नोटीस देण्याचें कारण हेंच कीं तुह्मी मजला रुपये दिले नव्हते. करितां ती नोटीस दिली. आजरोजीं तह्मी मजला रुपये २३० दिले ते असें कीं, हरीसिंग व बहादरसिंग यांचे नजर गहाणखताचे देण्या करितां रुपये २०० भगवान वल्लद संभाजी माळी दरडकर याजजवळ धरवर माझे संमतीनें ठेविले ते व रोख नगदी ३३ व मागेंच घेतले रुपये १७ एकूण अडीचशे रुपये भरून पावलों आहे. करितां तुह्मास खरिदीखत व खातें नांवें लाऊन दिलें. आहे. हें बारोबर रतीचें आहे. करितां तुह्मास सदरहू शेताचा व आंब्याचा तुह्मास कबजा दिला. सदरहू भरण्याबद्दल रुपये २५० ची पावती तुह्मास आजरोजीं लिहून दिली कळावें तारीख ९।४।९८ इ०

सही

मारोती वल्लद निंबाजी माळी

निशानी खुद्द.

### नोटीस.

रा. रा. बहादरसिंग व हरीसिंग वल्लद हिरासिंग जभादार राहाणार पातुर सेखबाबूसाहेब तालुके बाळापूर. खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतेकीं, तुह्मास मी तारीख १२।२।९७ इसवी रोजीं रकम रुपये १६० एकशें साठचे नजर गहाणखत लिहून दिले आहे. तुमचे देण्याकरितां सदर्हू तुह्माजवळ नजर गाहाण असलेले बागायत पातुरचे शेत सर्वे नंबर ४९ हे मी तारीख १५-२-९८ इसवी रोजी विक्रम वल्लद सुर्यभान पाटील यांस रुपये २५० दोनशे पन्नास खरीदी देऊन खातें नावे लावून दिल्हे आहे. तुमचे गाहाणाचे व्याजा समेत रुपयें २०० दोनशे विक्रम पाटील याचे समतीनें भगवान वल्लद संभाजी माळी दरडकर याजजवळ धरवर ठेविली आहे. ते तुह्मी घेऊन जाऊन माझे नांवची पावती लिहून धावी तुमचे गाहाणा शिवाय मजकडेस दुसरे कांहीं देणें नाहीं. तुह्मी मजला घरांत जुलमानीं नेऊन पाव या वगैरे करून घेतल्या आहेत ते सर्व खोट्या आहेत. गाहाणा शिवाय तुमचे मजला दुसरे देणें मुळींच नाहीं. तर मी वरील रुपये धरवर ठेविले ते घेऊन जावे. या प्रमाणें तुह्मी न केल्यास तुमचे रुपयास व्याज आजपासून मुळींच देणार नाहीं आणि कोर्टांत फिर्याद वगैरे केल्यास त्याचा खर्चही देणार नाहीं. सदर्हू तुमचे रुपये देण्याकरितां मी आपले सेत विकून विक्रम पाटील यास सेताचा ताबाही दिला आहे. आणि मी तारीख २९-३-९८ इसवी रोजीं शुद्धवऱ्हाडी छापखान्यांत जी नोटीस दिली आहे. ती तुमच्या सागण्यावरून दिली आहे. ती नोटीस खोटी आहे, व त्यातील मजकूर जो लिहिला आहे तो सर्व बातल असे. करितां ह्मी आज रोजीं नोटीस दिली हे बरोबर असून खरी हकीकत आहे तर तुह्मी आपलें गाहानाचे रुपये घेऊन जावे. करितां तुह्मास अगाऊ नोटीसीनें कळविले आहे व या नोटीसिचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावे, तारीख ९।४।९८ इसवी.

सही.

मारोती वल्लद निंबाजी उगले माळी

निशानी खुद्द.

### नोटीस.

रा० रा० जयराम वल्लद चंद्रभान पाटील वस्ती शिर्ले (नेमान्याचें) तर्फ पिंपळखुटें ता० बाळापूर.यास:-

या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी तारीख २४-३-१८९१ रोजीं खालील शेतें विकत देऊन आमच्या ताब्यात दिली, आणि तींच शेतें तुह्मी माझ्याकडून भाडेपट्यानें वहितीस घेतली. सदर्हू शेतें तुह्मी दुसरा भाडेपट्टेवाला लक्ष्मण वल्लद चंद्रभान यास १८९५ सालीं न देतां स्वतां जबरदस्तीनें वाहिला असें तुह्मी कोर्टास आज रोजीं कळविलें. पुराव्या अंती ती गोष्ट खरी ठरल्यास तुह्माकडून सर्व नुकसानी भरून घेतली जाईल. शेतांचा तपशील येणें प्रमाणें:—

| सर्व्हे नंबर | एकर गुंठे | आकार |
|---|---|---|
| १८० | १८८३४ | ८८८ |
| २११ पैकीं | २८३१ | १८१२ |
| १७९ | १३८१७ | ५ |

हीं शेतें तुह्मी नोटीस पावल्या पासून ४ दिवसाचे आंत आमच्या ताब्यांत द्यावी. नोटिशी प्रमाणें न केल्यास कोर्ट मार्फत शेतें ताब्यांत येई पर्यंत १३०८ फसली सालाच्या पीकाच्या नुकसानी बद्दल तुह्मास १०० रुपये सालिनाचे द्यावे लागतील. व या नोटिशीचा खर्च द्यावा लागेल. कळावे, तारीख ६ माहे एप्रील सन १८९८ इसवी.

(सही मारवाडींत)

सांगिदास गुलाबचंद दुकानचे मालक गुलाबचंद राहणार शिर्ले (नेमाण्याचे) तालुका बाळापूर दस्तुर खुद्द.

### नोटीस.

रा० रा० तुकाराम वल्लद मांगो धनगर राहाणार चावरे तालुके जळगांव जिल्हा अकोले. यांस:—

नोटीस देणार दत्तु वल्लद तुकाराम पाटील राहाणार चावरे नोटीसीनें असें कळवितो कीं तुह्माकडे आमचे रुपये येणें एकंदर ६८० साहाशे ऐंशी. याचा तपशील शेत गाहाण रुपय (६००) रुपयेचें व रुपये [८०] गाहाण घराबद्दल (६८०) व या खेरीज वरील रकमेचे आजपावेतो दरशेंकडा एक रुपये व्याज या हिशोबानें व्याज व मुदल मिळून येणें आहे. तर हें सदरील लिहिलेले रुपये. हिशोब करून नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांत आणून देऊन निकाल करावा. असें जाहाले नाहीं तर रीती प्रमाणें तुह्मावर काम चालवून अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च होईल तो व ह्या नोटीसीचा खर्च असे मिळून सर्व भरून घेतले जाईल. ह्मणून दिल्ही नोटीस सही ता० ९।४।९८ इसवी.

सही

दतु वल्लद तुकाराम पाटील राहणार मोजे चावरे दस्तुर खुद्द.

### जाहिरात.

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें दतु वल्लद तुकाराम पाटील राहणार चावरे तालुके जळगांव जिल्हा अकोला. ज्याहिर करितो कीं गेल्या महिन्याच्या अखेरीस मी कांहीं कचेरीच्या कामास जळगांवी गेलो होतो. त्यावेळी कामा करितां मी खाली लिहिलेले दस्ताऐवज बरोबर घेऊन गेलो होतो ते दस्ताऐवज तीन हे माझ्या हातून गहाळ झाले आहेत ते ज्या कोणास सापडले असतील ते त्यानें आणून द्यावे व तीन दस्ताऐवजाबद्दल त्यास रुपये ५ इनाम दिले जाईल. दस्तारेवजाचा तपशील लिहिले प्रमाणें दस्ताऐवज लिहून देणार तुकाराम वल्लद मांगो धनगर राहाणार चावरे.

रुपये (६००) साहाशेचे गहाणखत शेताबद्दलचे.

रुपयें (७००) सातशेचा दस्ताऐवज रोख खरिदी बदलचा.

रुपये (८०) गहाणखत जागेबदलचा कागद.

येणेंप्रमाणें सदरी लिहिलेले कागद आहेत हे जो कोणी आह्मांस आणून देईल त्यास सदरी लिहिलेले रुपये ५ पाच इनाम दिलें जाईल. ह्मणून दिली जाहिरात सही ता. ९।४।९८ इसवी.

(सही) दतु वल्लद तुकाराम पाटील राहणार चावरे दस्तुर खुद.

## वर्तमानसार

निजामसरकारच्या राज्यांतून ह्या सतीमाई येथें बडोद्यास आल्या आहेत ह्यां कै. जयाजीराव शिंदे सरकार ह्यांच्या भगिनी भागवितात व यांचे सासरचें अडनांव माने असें आहे. जन्मापासून मातोश्रींच्या दुधाची सुद्धां यांना ओळख नाहीं या अन्नपाणी मुळींच घेत नाहींत मलमूत्रोत्सर्ग व दुसरे स्त्री जातीचे शारीरीक उपाधि या सर्वांपासून या सतीमाई मुक्त आहेत. पूर्वीं एकदां ह्या सतीमाई येथें आल्या होत्या, त्यावेळीं त्यांचा मुक्काम रोड्यांच्या धर्मशाळेंत होता. तेथें त्यांस लोकांनीं फारच त्रास दिल्यामुळें त्यांनीं आपणास जाळून घेतलें; परंतु त्यांस लेशमात्रही इजा झाली नाहीं. ह्या सिद्धपुरास गेल्यावर तेथें वैरागी लोकांनीं यांना बरेंच छळलें, त्यामुळें तेथेंही यांनीं जाळून घेतलें; त्यामुळें त्यांचे यावेळीं देहावसान होणार असे जाणून, पोलीस फौजदारानें पंचक्यास केला, परंतु दुसरे दिवशीं सकाळीं सरस्वतीवर स्नान करून आल्याचे पूर्ववत देह झाल्याचें लोकांच्या अवलोकनांत आलें! हैद्राबादेसही एकदां त्यांनीं असेंच जाळून घेतलें होतें. "जगाचे पाप घेऊन त्यासह स्वतःच्या शरीरास जाळून घ्यावें हेंच मला बरें वाटतें' असें त्यांचें ह्मणणें आहे. प्रसिध्द अक्कलकोटचे स्वामीमहाराज व उदगीर येथील शंकराप्पा स्वामी यांनीं या बाईंचा अवतार ओळखून, ते यांस मान देत असत ह्यांस अन्नपाणी वर्ज असून त्या प्रत्येक रविवारीं सत्यनारायणाची आराधना करीत असतात व सकाळ पासून संध्याकाळपर्यंत हातांत तुपाचा दिवा धारण करीत असतात. अमेरिकेंतही याच नमुन्याचे एका सतीचें चरित्र प्रसिध्दीस आलें आहे, त्याचा विचार केल्यास ईश्वर जगावर कोणत्या रूपानें प्रगट होईल, त्याचा नियम सांगतां येत नाहीं. या सतीमाईचा मुक्काम हल्लीं फत्तेपुऱ्यांत माऊसिंदे यांच्या मंदिरांत आहे. व त्या हल्लीं एकांतवासांत अनुष्ठानास बसल्या आहेत. अ.

पोर्टऑर्थर व तालनवान हीं चिनी बंदरें रशियाच्या ताब्यांत आलीं. तेथील चिनी फौज आपलें ठाणें उठवून निघून गेली व रशियन फौजेनें आपलें ठाणें बसवून आपला झेंडा लावला. इतकें झाल्यावर रशियन सरकारानें सर्व बड्या राज्यांस एक सरक्युलर पाठवून असें कळविलें कीं, हीं बंदरें व त्याच्या आसपासचा प्रांत रशियाच्या राज्यास जोडला आहे आणि तालेनवान बंदरांत इतर राष्ट्रांच्या व्यापारी गलबतांस येण्याची मोकळीक असून आपल्या मित्रराष्ट्रांच्या लढाऊ गलबतांस येण्याचीही मोकळीक आहे.

टर्की सरकारानें जर्मनींतून पुष्कळ काडतूसें मागविलीं आहेत व तीं पुरविण्या करतां दोन कारखाने रात्रंदिवस चालू आहेत असें टर्कींतली वर्तमानपत्रें सांगतात.

विलायत सरकारचीं लढाऊ गलबतें चीनाकडे रवाना होऊं लागलीं आहेत.

विसायतेस एक माणूस आगीनें फार भाजला. डाक्टरी उपचार करण्या करतां त्यास इस्पितळांत नेलें. त्याच्या जळलेल्या जागीं माणसाचें तानें कातडें शिवण्यास मिळेल तर तो लवकर बरा होईल असें डाक्टराचें मत झालें. कोणीं आपलें कातडें देण्यास तयार आहे काय असें त्याणें लोकांस विचारलें तेव्हां बेकर मुलगा व दुसरी दोघेही आपलें कातडें देण्यास तयार झालीं. डाक्टरानें बेकर मुलीस हुंगून बेशुध्द होण्याचें औषध देवून तिच्या पायाचें व हाताचें मिळून चौरस ५२ इंच कातडें काढलें व त्यामुळें तिला ११ दिवस इस्पितळांत राहावें लागलें. बरी झाल्यावर मुलीनें डाक्टरांवर ५,००० रुपयांचा नुकसानीचा दावा केला फाजील कातडें काढलें असें तिचें ह्मणणें आहे. तिणें देण्याचें कबूल केल्यावरून काढले अशी डाक्टरची तकरार आहे इन्साफ अजून व्हावयाचा आहे.

हांगकांग येथें प्लेगचा रोग सुरू झाला.

स्पेन व अमेरिका यांच्या दरम्यान कांहीं कारणानें वितुष्ट येऊन लढाईवर येण्याचा रंग दिसूं लागला आहे.

मनानी प्रांतांतून बारकाई प्रांतांत परत येत असतां कांहीं इंग्रज आफिसरांवर १४ झाकाखेल जातीच्या लोकांनीं एकदम छापा घातला व त्यांत एकास बरेंच जाया केलें आहे. नंतर अतीशय बंदोबस्त असतां मनानी छावणींतून एका खेचरास पळवून एकास जाया केलें.

खैबर खिंडीच्या तोंडाशी असणारी तार शत्रूंनीं तोडून टाकली व तीनशे यार्ड लांब तार पळवून नेली.

बंगाल्यांत अफूच्या कराचें उत्पन्न ४ लाखांनीं कमी झालें ह्मणतात.

त्रावणकोर हद्दींतील कोणताही बडा अधिकारी फौजदारी कायद्यानें कोणत्याही गुन्ह्याबद्दल अपराधी ठरवून देण्याचें जो कोणी कबूल करील त्यास ५०० रुपये इनाम देऊं अशी 'वेस्टर्न स्टार' पत्रानें जाहिरात दिली आहे.

मि. वेस्टलांड साहेबांनीं नव्या वर्षाच्या खर्चाचा तक्ता वाचून दाखविला व नाण्याच्या संबंधाचा विचार स्टेटसेक्रेटरीकडे चालू आहे असें त्यांनीं सांगितलें.

गेल्या कौन्सिलांत पोष्टाचा कायदा पास झाला.

मद्रासेकडील कापसाचें पीक नेहमींच्या निमेनेही नाहीं.

जलंदर व हुशियारपूर या प्रांतांत आतां सांथीचा आजार कमी आहे.

सयाम प्रांतांत दंगे धोपे व लुटालूट विशेष आहे असें ह्मणतात.

युगांडा प्रांतांत इंग्रज व तेथील लोक यांच्यांत मोठी लढाई झाली व इंग्रजांचा जय झाला.

चीनच्या आसपास इंग्रजांचीं जीं लढाऊ गलबतें आहेत त्या सर्वांस असा हुकूम झाला कीं, सर्वांनीं समुद्रांत लढण्यासाठीं अगदीं तयार असलें पाहिजे.

चीननें मागितलेलें बहुतेक कर्ज जर्मन सावकारांनीं दिलें आहे असें ह्मणतात.

जड्डा येथें सांथीचा ताप सुरू झाला आहे असें ह्मणतात.

चीनचे फक्त एक तृतीयांश कर्ज इंग्लंड मध्यें विकलें गेलें.

क्रीट बेटांतून आस्त्रिया आपलें सैन्य काढून घेत आहे.

फिलिपाईन बेटांत पुनः बंड उद्भवलें आहे. बंडखोरांनीं उत्तर प्रदेश सर केला आहे ४ तारा तोडून टाकल्या आहेत. इंग्रजी मालमत्ता संरक्षण करण्यासाठीं एक इंग्रजी लढाऊ गलबत तिकडे गेलें आहे. अ०

तिरहा येथील ब्रिटिश सैन्य लवकरच कमी करण्यांत येणार आहे.

पंजाब प्रांतांत प्लेगचा आजार दिवसानुदिवस वाढत जात आहे.

बंगाल, मद्रास व ब्रह्मदेश इकडे यंदा तांदुळाचें पीक उत्तम आलें आहे.

इतिहास भूगोल प्रमाणें आस्ट्रेलियांतील शाळांत बुद्धिबळें खेळावयास शिकवितात.

मुंबईच्या क्राफर्ड मार्केटावरील घड्याळ कोणी दुष्टानें दगड मारून फोडलें आहे.

जर्मन प्रिन्स हेनरी हे आपल्या 'डयुशलंड' लढाऊ बोटीसह हँगकाँग येथें गेले आहे.

खांडवा येथील एक प्लेग डाक्टर यांनीं गेल्या सोमवारीं विष प्राशन करून आत्महत्या केली.

वृष्टीचीं चिन्हें दाखविणारा एक आश्चर्यकारक दगड नुकताच इंग्लंडांत आढळला आहे.

कान्स्टांटिनोपल मुसलमानांनीं घेतल्यापासून आजपर्यंत ६७ सुलतान झाले, त्यांपैकीं ३४ सांचे खून झाले आहेत.

राजद्रोहाचे नवीन पास झालेल्या बिलाच्या धास्तीनें कलकत्ता येथील अति जुनाट वर्तमानपत्र 'सहचर' बंद झालें.

ता. १-४-९८ पासून व्हॅल्यूपेबलनें जाणारीं पार्सलें रजिष्टर करणें अगर न करणें हें पाठविणाराचे मर्जीवर अवलंबून राहील असें प्रसिद्ध झालें आहे.

हिंदुस्थानांतील तोफखान्याची सुधारणा करण्याचे प्रश्नाचा विचार करण्यास्तव लवकरच सिमला येथें अधिकाऱ्यांची एक लहानशी कमिटी बसणार आहे. स० वि०

हँगकाँग येथून रूटरची अशी तार आली आहे कीं, तेथल्या सर्व ब्रिटिश लढाऊ बोटींना तावडतोब चालून जाण्यास तयार असण्याचा हुकूम झाला आहे.

लंडन 'टाईम्स' चा पेकिनचा बातमीदार त्याला तारेनें कळवितो कीं, व्यापारी राष्ट्रांचीं मनें शांत होतील अशाच बेतानें टालियवान रशियाला देण्या संबंधाच्या अटी बसविल्या आहेत आणि मान्चुरिया घेण्याचे पूर्वीं आपली बळकटी रशिया जोराची बनवीत आहे.

ब्रिटिश सरकार चिनांत कांहींच जोर दाखवीत नाहीं आणि वाईट व अनिश्चितपणानेंच वागत आहे तें याचें वर्तन लंडन 'टाईम्स' व 'स्टँडर्ड' अशा दोन्हीं पत्रांनीं निंद्य ठरविलें आहे. 'टाईम्स'चें असें ह्मणणें आहे कीं, ब्रिटननें आपलें, जोरदार आरमार पेचिली आखाता मध्यें एकदम एकत्र जमवावें.

टर्कीनें काराथिओडोरी पाशाची क्रीटच्या गव्हर्नरचे जागीं नेमणूक व्हावी असें राष्ट्रांना कळविलें आहे. मुं० वै०

नर्मदेच्या किनाऱ्यावरील एका गांवांत सौभ्यागसुंदरी नांवाच्या देवीचें देवालय आहे हल्लीं त्या देवीचें शरीर इतकें वाढलें आहे कीं तें सगळें देवालय देवीच्या शरीरानें वेढून टाकलेलें आहे. त्यावरून ती देवी कोपली असून, गेल्या दोन वर्षां पासून मुंबईस जो प्लेगचा रोग झाला आहे तो तिच्याच कोपाचा परिणाम आहे. तेव्हां तिच्या क्रोधाच्या शांतवनार्थ यज्ञयागादि क्रिया करण्या करितां व हल्लींचें देऊळ मोठें करण्याच्या, हेतूनें कोष्टी सिताराम रामचंद्र पंडित नांवाचे गृहस्थ पैशाची मदत मिळविण्या करतां मुंबई येथें आले आहेत. ज्यांची इच्छा असेल त्यांनीं यथाशक्ती द्रव्य साह्य करावें ह्मणून महालक्ष्मीचे देवळानजीक त्यांनीं एक पेटी ठेवली आहे. यज्ञ व देवळाची मरामत या कामा करतां ११ हजार रुपये पाहिजेत असें त्याचें ह्मणणें आहे. तसेंच वरील दोनही कामें तडीस गेल्यास मुंबईतील सांथ समूळ नाहींशी होईल असें ते आशीर्वचन देत आहेत. शहरांतील शेटसावकारांनीं यथाशक्ती साह्य देणें अयोग्य होणार नाहीं असा आमचा समज आहे. गुराखी.

चीन व जपान या दोन देशांत तंबाखूला इतर देशांपेक्षां फारच मान देतात. हिंदुस्थानांतही तंबाखूचें महत्व कमी आहे असें नाहीं. तंबाखूला चिनी व जपानी लोकांनीं मोठ्या हौसेनें जीं नावें दिलीं आहेत, तीं वाचून तर त्यांच्या शौकीनपणाचें व तंबाखूच्या आवडीचें फारच नवल वाटतें. तीं नांवें येणेंप्रमाणें:—तंबाखू ह्मणजे एक स्वर्गलोकीची सुवासिक वल्ली, आरोग्यतेचें माहेरघर, रिकाम्या वेळांचा एक आनंदी मित्र, सदानंद वनस्पती सुविचार उत्पन्न करणारी, मनाला क्षणमात्र शांतविणारी, वगैरे नांवांनीं तंबाखूची ते लोक फार हौसेनें महिमा गातात. परंतु त्याचप्रमाणें त्यांच्या भाषेंत तंबाखूविषयीं अशी एक ह्मण आहे कीं, "तंबाखूही मृत्यु द्योतक लोकांचें व्यसन असून ते दारिद्र्य स्थितीचें चांगलें आहे."

एका आफ्रिकेंतील प्रवाशानें, आपल्या प्रवासांत पाहिलेल्या एका फारच चमत्कारिक जातीच्या मुंग्याबद्दल पुढील मजकूर लिहिला आहे. या मुंग्या तांबड्या असून त्यांचे पुढचे पाय असे विचित्र असतात कीं, जणूं काय घाय घालण्यासाठीं सज्ज केलेल्या तरवारी प्रमाणेंच ते दिसतात. या मुंग्यास तिकडले लोक "बाशकोनी" असें ह्मणतात. आफ्रिकेंतील अरण्यांतून ह्या प्राण्यांची प्रचंड सैन्येंची सैन्यें कोठें तरी विवक्षित जागेकडे जातांना दृष्टीस पडतात. त्यांच्या त्या सैन्यप्रवाहांत कोठें खंड ह्मणून पडलेला कधीं दिसत नाहीं. आणि मध्येंच कोठें थांबणें त्यांस मुळींच ठाऊक नाहीं. एक सैन्य सुमारें दोन मैल पर्यंत लांब असतें. आणि मधून मधून सारख्या अंतरावर बाकीच्या रांगेहून भिन्न अशी एक एक मुंगी निराळीच चाललेली असते. ही मुंगी ह्मणजे हवालदार, जमादार, क्याप्टन कर्नल यांच्या प्रमाणेंच असते, असें दिसतें. सैन्याच्या पाठीमागल्या बाजूस फार जंगी जंगी अशा मुंग्याच्या गराड्यांत कांहीं पांढऱ्या मुंग्या असाव्यात असें दिसलें. या बहुतकरून शत्रूच्या कैद केलेल्या मुंग्या असाव्या. आणि सगळ्यांच्या पाठीमागें एक विशेषच तांबडी अशी मुंगी होती. ही बहुतकरून सेनाधीश असावी. हा सैन्यप्रवाह पाहिल्याबरोबर माझ्याबरोबरच्या तद्देशीयांनीं मला सांगितलें कीं, रानात या मुंग्यांची आणि पांढऱ्या मुंग्यांची जंगी लढाई होण्याचें हें चिन्ह आहे. कर्मणूक.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाससमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ..........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ०६
दुसरे खेपेस .... ......८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ..............8 as
Single copy ..............................4 as
Advertisemen
Below 10 lines ......2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

**VOL XXXII** **AKOLA MONDAY 18 APRIL 1898** **NO 15**

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख १८ माहे एप्रील सन १८९८ इ० अंक १५

नोटीस

रा. रा. माधवराव दादंभट हरदास वैयत आज्ञान माधवराव पालन करणार माताश्री सरस्वतीबाई जवजे दादंभट हरदास इच्या इकडून कुलमुखत्यार जैराम विश्वनाथ राहणार आडगांव तालुके आकोट यांस नोटीस देणार राजाराम वल्लद भोनाजी धामोडे राहणार मालठाने तालुके आकोट प्रगणे आडगांव याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा बाप नामे दादंभट यांनीं मजला मालठाने येथील शेत ६ एकर ५ गुंठे रुपये १८८ एकशे अठ्याशी रोख आमचे जवळून घेऊन खरिदी करून दिलें आहे तें शेत आह्मी आजपर्यंत वाहत आलो पुढें रा. रा. भवानसिंग रजपुत राहणार आडगांव हल्लीं मुंडगांव यांनें कोर्टमार्फतीनें शेत ताब्यांत घेतलें याजकरितां त्या शेताची किंमत रुपये ६०० आह्मास मिळाले ज्यावेळेस तुह्मी आह्मास शेत दिलें त्यावेळेस सर्व पडीत व गादलेलें होतें पुढें मी तें शेत नांगरून व कुंधा काडी वगैरे सर्व किस्तकारी करून साफ केलें याजकरितां तुह्मी रुपये ६०० आह्मास आठ दिवसांचे आंत ह्मणजे तारीख २०।४।९८ इसवीचे आंत ह्या नोटीशीचे खर्चासह आणून द्यावे असें झालें नाहीं तर आह्मी फिर्यादी करून कोर्ट खर्चा सुद्धां सर्व रक्कम भरून घेऊं ह्मणून दिली नोटीस तारीख ११।४।९८ इसवी.

सही

सहीची निशाणी वखर राजाराम वल्लद भोनाजी पाटील राहणर मालठानें.

नोटीस

दर्याजी वल्लद मारुती आखरे जात कुणबी वस्ती मौजे सुटाळ खुर्द तालुके खामगांव जिल्हा अकोलें यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून तुमला मी वयांत येण्या पूर्वीच रक्तपीतीचा रोग झाल्यामुळें मी तुमच्या घरीं आली नाहीं व पुढेंही सदर्हू कारणामुळें माझी येण्याची इच्छा नाहीं माझे निर्वाहाची गैरसंगती असल्यामुळें वयांत आल्या पासून आजपर्यंत रुपये २०० मजला लोकाचें कर्ज देणें झालें आहे तें दिल्याशिवाय पुढें मिळत नाहीं याजकरिता थेकोसा वल्लद मीनसा कलाल वस्ती बोरगांव खुर्द तालुके अकोलें याचें सदर्हू देणें असलेले रुपये २०० तुह्मी १५ दिवसाचे आंत आदाई करावे असें न केल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन. कारण माझा संसार व्यर्थ जात आहे सबब मजला दुसरा घरठाव करणें भाग आहे वर दिलेले नोटीसीनें १५ दिवसाचे आंत सर्व निकाल करावा. असें न केल्यास हीच फारकती समजून मी दुसरे घरठावाची व्यवस्था करीन मग तुमचा नवरेपणाचा कोणच्याही प्रकारचा हक्क मजवर राहणार नाहीं. ह्मणुन दिली नोटीस सही कळावें तारीख १५।४।९८ इसवी.

सही

चनी मर्द दर्याजी आखरे वस्ती बोरगांव खुर्द प्रगणें कुरणखेड निशाणी खुद्द हातची बांगडी असे.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य १२ शके १८१९

शेतकरी लोकांच्या पेढ्या संबंधानें नामदार मि. निकालसन यांनीं व्हाइसरायच्या कौंसिलांत आणलेल्या महत्वाच्या सूचना सूज्ञ सरकार खरोखर लवकर अंमलांत आणील तर फार चांगलें होईल. रेलवेचा प्रसार जितका झपाट्यानें होत आहे त्या मानानें गांवोगांव लहान लहान पेढ्या शेतकऱ्या साठीं निघाल्या तरच सरकारी रेलवे वाढल्या पासून लोकांस नफा होईल. त्या पेढीवर लोकांस आपला गांठीं बांधलेला पैसा व्याजीं लावितां यावा आणि कर्ज लागल्यास कर्जही मिळावें असा मूळचा हेतु आहे. पोस्टल ब्यांकेंत पैसा व्याजीं लावण्याच्या सोयी पुष्कळ आहेत पण व्याजीं कर्ज देण्याची व्यवस्था नाहीं. प्रशिया देशांत अशा दोन्ही प्रकारच्या पेढी असतात आणि त्यांचें अनुकरण इंडियांत होईल तर फार बरें! दरसाल शेतकऱ्यांस तगाई ह्मणून सुमारें २५ लक्ष रुपये सरकार कर्जीं देतें आणि दुष्काळाच्या वर्षीं १॥ कोटी रुपये या बाबतींत खर्च केले तथापि कुळांस कर्ज देण्या संबंधानें चांगलीशी कोणतीच व्यवस्था नाहीं. इंडियाच्या विस्ताराच्या मानानें २५ लक्षांची रक्कम अगदीं थोडी होय. जर लोक साऱ्याचा पैसा वेळच्या वेळीं आणून देतात असा अनुभव आहे तर त्यांच्याशीं प्रामाणिकपणानें व्यवहार करणाऱ्या पेढ्या चांगल्या भरभराटीत येतील व शेतकरी लोक सरकारी साऱ्या प्रमाणें नियमितपणानें अशा पेढींचें कर्ज सव्याज फेडतील. सरकारांतून कांहीं दाद मिळण्याचा संभव नाहीं कांकीं सरकारचा खजिना सदासर्वकाळ रिकामाच आहे. सरकार कर्ज काढून आपल्या लढाया मारतें तर तें आपल्या प्रजाजनांस कर्जाऊ पैसा देण्याला असमर्थ आहे हें स्पष्ट दिसतें. उथळा कारभार महत्वाच्या गोष्टी देखील करूं देत नाहीं.

सरहद्दीवर लढाई चालू आहे तिच्या संबंधानें इंडिया सरकारचे विचार लार्ड एलजिन यांनीं आपल्या कौंसिलांत नुकतेंच कळविले. ते विचार कांहीं महिन्यांपूर्वीं कमांडर-इन-चीफ सर जार्ज व्हाइट यांच्या तोंडून बाहेर पडले होते. त्यांचाच पुनरुद्गार थोड्या सौम्यतेनें लार्ड एलजिन यांनीं केला आहे. लार्ड मेयो साहेबांची राजकीय पद्धती आपल्यास क्रिया प्रमाणें आहे असें सांगून लार्ड एलजिन यांनीं त्या पद्धतीचें वर्णन केलें एकंदर मोहिमेचा मूळ हेतु असा कीं या डोंगराळ लोकांस इंग्रजी शक्तीचा प्रभाव दाखवून त्यांस इंग्रजी अमलाखालीं आणावें, त्यांच्याशीं सलोख्याचा मित्रभाव कायमचा ठेवावा, आमच्या लोकांस आपल्या मुलखांत येण्या विषयीं त्या लोकांकडून पक्कें वचन घ्यावें, त्यांच्या मुलखांत रहदारी सुरक्षीतपणाची करावी, व्यापार धंद्याचे फायदे त्यांच्या नजरेस आणावे, आणि ब्रिटिश सरकारशीं वैरभाव धरला तर नफा तिळमात्र नसतां सर्वस्वी नुकसान होईल अशी त्यांच्या मनांत दहशत घालावी: हा हेतु सरहद्दी वरील मोहिमेचा आहे. लार्ड एलजिन ह्मणतात कीं हा हेतु ध्यानात धरून वागत आलों आणि तोच हेतु कायम राखण्याची माझी इच्छा आहे. सरहद्दीवर दंगे वारंवार होत जातील तेव्हां ते मोठ्या तत्परतेनें व शूरपणानें मोडले पाहिजेत. परंतु माझी पक्की समजूत आहे कीं या धोरणानेंच सर्वत्र शांततेची आशा, सफल होईल. आपल्या अधिकारबलाचा तोरा न मिरवितां इंडियन राष्ट्राच्या वैभवाला उचित अशा गोष्टी करण्यांत येतील. सुधारणेचा मार्ग स्वस्थता व शांतता राखून सांपत्तिक स्थितीही अभिनंदनीय करितो; असा हा मार्ग डोंगरी लोकांस माहित नाहीं. हाच काय तो त्यांचा दोष आहे. पण त्यासाठीं त्यांस सुधारणेचें वारें लागावें ह्मणून इंडियन राष्ट्रास लढाईची देखील खटपट करावी लागते. सारांश, परोपकाराच्या दृष्टीनें ही सरहद्दीवरील मोहिम चालविली असून त्यांत इंडियन राष्ट्राचें वैभव व पराक्रम यांचा दिगंत विजय होत आहे. सरहद्दीवरील लढाईची ही कारणमाला भूतदयेच्या मुशींतून किती नामी उतरली आहे बरें! या भूतदयेचा विजयध्वज लार्ड हामिल्टन यांनीं पार्लमेंटांत फडकावतांना आनंदानें कळविलें कीं मागील वहिवाटी प्रमाणें या लढाईचा खर्च इंडियासच सोसावा लागेल.

गेल्या दुष्काळांत साधारण स्थितींतलीं कुटुंबें मोठ्या निकृष्ट स्थितीला पोचलीं आहेत. आणि त्यांत शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांचाच भरणा मोठा आहे. शेतकरी लोकांसाठीं पेढी स्थापित करण्याची अवश्यकता पूर्वीं पासूनच होती तरी ती दुष्काळामुळें पुष्कळ पटीनें वाढली आहे. गांवोगांव कमी व माफक व्याजानें कर्जाऊ पैसा देणारी पेढी निघाल्या शिवाय गत्यंतरच नाहीं. लोकांचा निरुपाय झाला आहे आणि कर्जाची नड मोठ्या सक्तीची आहे. अशा कठीण पेंचांत पडलेल्या प्रजासमूहाला पेढी सारख्या संस्थेची मदत मिळाल्या शिवाय त्यांची मागिल कर्जातून ऋणमुक्तता होण्याचा संभव नाहीं आणि नवीन कर्जाखालीं मध्यम स्थितीच्या लोकांचा चुराडा मात्र उडेल शेतकऱ्यांच्या पेढीचा हा प्रश्न सर वुलियम वेडरबर्न यांनीं पुष्कळ वर्षांपासून हातीं घेतला आहे आणि त्यांनीं त्याची चर्चा वारंवार करून सरकारचें लक्ष्य या गोष्टीकडे ओढलें आहे पण त्यांच्या श्रमाचे चीज अद्याप कांहीं नाहीं. भावी यशाच्या आशेवर ते इतके झटत आहेत त्यांचे अमोल प्रयत्नच पाहून आह्मी त्यांचे अत्यंत आभारी आहों.

गेल्या 'इंडिया' पत्रांत सर वुलियम वेडरबर्न यांनीं शेतकऱ्यांच्या पेढी संबंधानें एक सर्वोत्कृष्ट लेख लिहिला आहे. तो प्रजेपेक्षां सरकारनें अवश्य वाचावा आणि त्याच्या अभिप्रायाच्या खरेपणाची प्रचिती घ्यावी. टाळाटाळी किंवा लोटालोटी करून हा प्रश्न मिटण्याचा नाहीं इतकेंच नाहीं तर तो जितका लांबणीवर पडेल तितकें अहित सरकारचेंच होणार आहे. विद्यमान स्थितींत जी गोष्ट सुसाध्य आहे तीच मोठ्या मुश्किलीची वाटून अगदीं कुचकामाची ठरेल. प्रजा उत्तरोत्तर भिकारी होत होत चालली तर मग तिला सुस्थितीला आणण्याची आशा देखील नष्ट होईल. लार्ड हामिल्टन थोडे दिवसापूर्वीं बोलले कीं रयतेला सावकाराच्या तडाख्यांतून वाचविण्याचा यत्न करावयाचा आहे पण तत्संबंधी सूचनांचा विचार करण्यास स्वस्थ वेळ मिळण्याची वाट पहात आहे. ही वेळ कांहीं वाट पाहण्याची नाहीं. कोणत्या तरी पद्धतीवर शेतकऱ्यांची पेढी स्थापित झालीच पाहिजे. सर वेडरबर्न यांनीं पुणें जिल्ह्याच्या एका भागासाठीं पेढीची व्यवस्था करण्याची पुष्कळ खटपट केली पण स्टेट सेक्रेटरी अद्याप शांत विचारासाठीं स्वस्थ वेळ धुंडीत आहेत. इंडियन रयत सुखी असून आबादानींत आहे असें स्टेट सेक्रेटरी वारंवार वर्णन करितात तें वर्णन निदान खोटें असल्या विषयीं स्टेट सेक्रेटरीचा वरील अभिप्रायच सांगत आहे. इंडियाची रयत ह्मणजे खालावलेली, निराश पावलेली, उद्योगधंद्यांत नादान ठरलेली आणि सावकाराच्या व सरकारच्या देण्या खालीं चिरडलेली आहे. सरकारी सारा व सावकारी व्याज या दोन बाबीखालीं शेतकरी पोटानें मरतो. सारा उत्तरोत्तर वाढत आहे आणि त्यामुळें

शेती मध्यें कांहीं जीव नाहीं. व्याज दरसाल शेंकडा १२ ह्मणजे फार झालें, त्यापेक्षां शेंकडा २४,३० किंवा ३६ रुपये व्याज ह्मणजे अशा व्याजी मुद्दलावर चालविलेला व्यापार धंदा ठार बुडालाच पाहिजे.

सर वेडरबर्न यांनीं गेल्या १६ वर्षां पासून या प्रश्नाची पाठ पुरविली आहे. पेढी काढण्याला सरकारी अडचणी निव्वळ काल्पनिक आहेत. उदाहरणार्थ, सरकारला सावकारी करावी लागेल आणि त्या मुळें सरकार लोकांस अप्रिय होईल. खरोखर ही समजूत चुकीची आहे. सरकारी सारा जसा वसूल होतो तसा कुळाकडे येणें असलेला पेढीवर पैसा वसूल केला पाहिजे. दिवाणी कोर्टांचा मार्ग भारी खर्चाचा आहे तो न स्वीकारतां मुलकी कोर्टांचा मार्ग पतकरला तरी त्या पासून सरकारचें काम चोख होऊन प्रजेला सुख होईल. असले अडथळे सर वुलियम यांस खरेच वाटत नाहींत. सरकारनें विचाराखालींच प्रजेच्या कल्याणाच्या गोष्टी गमावणें चांगलें नाहीं. कृती शिवाय विचार सगळे लटके आहेत. सर वेडरबर्न यांची खात्री आहे कीं पेढीच्या कामाला प्रजा अनुकूल राहील आणि इमानदारीनें पेढीचें कर्ज फेडील. 'रयतेची पेढी' या नांवाचें मि. एच. एम. वोल्फ यांनीं एक नामी ग्रंथ लिहिला आहे त्यांत ते लिहितात कीं:— लोकांस पेढी पासून खरें सुख व मदत मिळाली ह्मणजे गरीब मनुष्य अगदीं नियमितपणानें व करारी वर्तनानें पेढीचें कर्ज फेडतो. फ्रान्स, जर्मनी, इटाली, पोर्तुगाल, इत्यादि देशांत गरीब लोकांकडे एक पै देखील बुडत नाहीं. अमेरिकेंतला अनुभव अशाच प्रकारचा आहे. या अनुभवा प्रमाणें इंडियन प्रजा वागणार नाहीं असें मानण्यास लॉर्ड हामिल्टन पाशीं कांहीं निराळा पुरावा आहे काय?

---

के. जगन्नाथ शंकर शेट यांनीं मि. च्याटफिल्ड यांस उपदेश केला होता कीं नेटिवांशीं ममत्वानें वागा. ममत्वाचा धडा एकंदरीनें मनुष्यास लोकमान्य करितो असा अनुभव मि. च्याटफिल्ड यांस आला आणि तो मोकळ्या मनानें त्यांनीं पेनशन घेऊन जाते वेळीं लोकांस सांगितला. मि. च्याटफिल्ड साहेब मुंबई इलाख्यांतील शाळाखात्यांत लौकिकास चढले आणि त्यांचा वरील अनुभव एका पिढीचा आहे. तो अनुभव इतर इंग्लिश अधिकाऱ्यांनीं ध्यानांत धरण्या सारखा आहे. अधिकाराच्या तोऱ्यावर कारभार चांगला चालत नसतो. प्रत्येक गोष्टींत भूतदयेची छाया सतत ठेविली पाहिजे. इंजिनाला जसा मार्गे दाबून ठेवणारा ब्रेक असतो तसा प्रकार भूतदयेचा सरकारी सत्ते संबंधानें आहे. ममत्वाचा किंवा भूतदयेचा उपदेश प्रत्येक धर्मपुस्तकांत आहे परंतु धर्मपुस्तकाची पुजा करण्या पलिकडे त्या उपदेशास कोणी मान देत नाहींत. प्रस्तुत सरकारी कारभारांत कायद्याचा टणत्कार मोठ्या जोराचा असतो पण त्यांत भूतदयेचा जोर चालत नाहीं ह्मणून आह्मी मुद्दाम वरील ताजें उदाहरण लोकांसमोर आणिलें आहे. इंग्रजी अधिकाऱ्यांनीं नेटिवांशीं कसें वागावें या विषयीं सरजान माल्कम यांनीं एक उत्तम लेख लिहून ठेविला आहे. त्यांत ते ह्मणतात :— युरोपिन अधिकाऱ्यांची नेटिवांशीं वागण्याची तऱ्हा ही मोठी महत्वाची गोष्ट आहे. ममत्व ठेवा किंवा जुलूम करूं नका इत्यादि गोष्टी कोणी कोणास सांगाव्या लागत नाहींत. स्नेहभाव ठेवणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे परंतु कर्तव्याच्या नजरेनें व स्नेहभाव ठेविला ह्मणजे त्याची निम्मी गोडी नाहींशी होते. हा स्नेहभाव असा पाहिजे कीं त्यांत लोकांच्या गुणांची व चालीरितीची ओळख अवश्य पाहिजे. आपल्या दळवळणांत येणाऱ्या लोकांचा स्वभाव समजून घेतांना त्यांची परीक्षा निरभिमानानें व गौरवानें केली पाहिजे. त्यांच्या चालीरीती, सुधारणा, व्यापार धंदा, सामाजिक स्थिती, वगैरे गोष्टी पूर्तेपणीं लक्ष्यांत घेतल्या पाहिजेत. मनांत समभाव ठेऊन व वरील माहिती मिळवून जर युरोपिअन अधिकारी वागेल तर त्यास लोकांमध्यें पुष्कळसे सद्गुण, मनमिळाऊपणा, सुधारणेला अनुकूलता, सामाजिक बंधना विषयीं आदरबुद्धि, कृतज्ञपणा, व प्रेमळ वर्तन इत्यादि गोष्टी आढळतील. मनुष्यस्वभावच असा आहे कीं दुसऱ्याच्या बऱ्यावाईट वर्तनाची मूळपीठिका तो पाहत असतो आणि त्यांतल्या त्यांत श्रेष्ठ अधिकाऱ्यांच्या वर्तनावर निरीक्षण मोठें कसोशीचें करितो. अधिकाऱ्याचें वर्तन फक्त विचाराच्या जोरावाच असतें आणि त्याला मनोभावाचें बळ पोचत नाहीं तेव्हां त्यांत मोठासा मोहकपणा राहत नाहीं. विचारपूर्वक जाणून बुजून केलेली गोष्ट एखाद्या हेतूला धरून असते आणि कदाचित तो हेतु संशय घेण्यासारखा असतो. जेव्हां फक्त मेहरबानीच्या दृष्टीनेंच सरकारी अधिकारी स्नेहभाव ठेवितात तेव्हां तो दुसऱ्याला क्षोभकारक वाटतो. आपल्या वर्चस्वाचा तोरा मिरवितांना दुसऱ्याचा मानभंग होतो तेव्हां त्या वर्तनाबद्दल लोकांच्या मनांत प्रेम उत्पन्न होत नसून भितीनें लोक स्तब्ध बसतात" हा उपदेश सर्व अधिकाऱ्यांनीं लोकांशीं वागतांना मनांत आणावा इतकीच आमची विनंती आहे. सध्यां युरोपिअन अधिकारी व लोक यांच्या मध्यें अनेक प्रसंगीं मोठी फाटाफूट दिसते; आणि ती उभय पक्षाला घातुक आहे. ह्मणून मुद्दाम जुन्या चांगल्या गोष्टींची आठवण आह्मी वारंवार देत आहे.

---

सज्जन मनुष्य आपोआप पूज्य होतो. कस्तुरिकेच्या आमोदा प्रमाणें त्याचा चांगुलपणा आहे. तशांत अशा उत्तम कोटींतला मनुष्य श्रेष्ठ अधिकारावर असला ह्मणजे त्याचा चांगुलपणा दिगंत फाकतो; आणि असा अधिकारी जर युरोपिअन गृहस्थ असेल तर नेटिव लोक आनंदोल्हासानें याचे धन्यवाद गाऊन ईश्वरापाशीं त्याच्या अभीष्टाबद्दल वकिली करितात. क्षुल्लक गोष्टींत देखील या प्रेमळ मनोभावाचे दाखले सहजीं येतात. गेल्या मंगळवारीं उमरावतीच्या नेटिव क्लबांत वकील मंडळींनीं मि. आवर्डे यांच्या सन्मानार्थ करमणुकीचा समारंभ केला होता तेव्हांचे मे. आवर्डे साहेब यांच्या विषयीं लोकांच्या मुखावाटे निघालेले प्रेमोद्गार ऐकले ह्मणजे आवर्डे सारखे गुणी नररत्न वऱ्हाडास लाभलें आहे ह्मणून मोठा अभिमान वाटतो. त्या समारंभांत संभाषणें नव्हतीं, स्तुतीपर पद्यें नव्हतीं किंवा आत्मश्लाघेची पिरपीर नव्हती. सतार, बिन, वगैरे मंजूळ वाद्यें वाजत होतीं, नाटकाचे त्रोटक भाग रंगभूमीवर पाटणकर नाटक मंडळी करीत होती, आणि मधून मधून सर्व मंडळी उपहाराचें सुख सेवीत होती अशा मौजेच्या गप्पा मारण्यांत मनाचे चित्र बरोबर उमटतें. स्तुतीपाठा संबंधानें सर्व समारंभ मुकयांचा बाजार होता पण ही मूकावस्था अवर्णनीय वक्तृत्वानें भरली होती. नेटीव अधिकारी समारंभाला आले होते. उमरावतीच्या वकील मंडळी शिवाय आकोला, इलिचपूर, मोर्शी इत्यादि ठिकाणची वकील मंडळी पुष्कळ जमली होती. युरोपिअन दुसरे अधिकारी नसल्यामुळें त्यांच्या बरोबर नाचण्याचे परीश्रम पडले नाहींत. मि. आवर्डे बरोबर त्यांची तरुण कन्या होती. उभयतां बापलेकीचा संवाद पाहून सर्वंनांस मोठा आनंद वाटला.

मि० आवर्डे साहेब अगदीं साधे आहेत. त्यांचा प्रेमळ स्वभाव करमणुकीच्या नाना गोष्टींत रममाण होता आणि इतरांस आनंद देत होता. सर्व समारंभ मोठ्या प्रेमभरानें चालला होता. रात्रीं साडे नऊ वाजल्या पासून १२॥ वाजे पर्यंत वेळ कसा गेला ते कळलें नाहीं. मंडळी ज्या ज्या गोष्टी करण्यास सांगत त्या त्या आवर्डे साहेब गंमतीनें करीत असत. शेवटीं मंडळीच्या प्रेमाखातीं त्यांनीं विडा देखील भक्षण केला. लहान सहान गोष्टींत देखील मनुष्यांचा स्वभाव प्रतिबिंब पावतो ह्मणून आह्मी ही गोष्ट लिहिली. मि० आवर्डे हे सर्वोत्कृष्ट न्यायाधीश आहेत हें सरटिफिकीट देण्याची आह्मास जरूरी नाहीं. त्यांच्या हातीं सर्व खात्यांतील लोकांची अब्रू सुरक्षित आहे. वऱ्हाड प्रांतांत अशीं उत्तम उत्तम माणसें आहेत ह्मणूनच लोकास मोठा आनंद वाटतो एक आवर्डे साहेब ह्मणजे सर्व प्रांताचें पांघरुण आहेत. प्रत्यक्ष त्यांची गांठ सर्व थोडेच घेतात पण त्यांच्या सत्कृतीचा महिमा सर्व प्रांतभर विस्तृत असतो आणि तोच इतरांस मोहित करितो. आवर्डे साहेबांत लटकी युरोपियनशाही नाहीं आणि ह्मणूनच त्यांच्या सारख्यांच्या सद्गुणांनीं ब्रिटिश राज्याला शोभा येत आहे.

---

उमरावतीला 'लेडी डफरिन' फंडाचा स्त्रियांचा दवाखाना आहे. त्याच्या वार्षिक उत्पन्नाचा व खर्चाचा ताळा बरोबर बसत नाहीं ह्मणून कांहीं व्यवस्था करण्यासाठीं मार्चच्या २१ वे तारखेला सभा भरली होती त्यावेळीं सरासरी १३९८ रुपयांची तूट पडत असें निघालें होतें. या दवाखान्याचा एकंदर खर्च सालिना ६००० रुपये होतो. त्या पैकीं ४६४२ रुपये निरनिराळ्या बाजूंनीं दवाखान्याला मिळाले आहेत. या रकमेचा तपशील असा:—

| रु० | |
|---|---|
| १५४२ | सरकारी |
| २५० | उमरावती क्यांप मुनसिपालिटी |
| २०० | वणी-जिल्हा-बोर्ड. |
| ५० | बुलढाणा- " |
| ५०० | उमरावती " |
| ६०० | सेंट्रल कमिटी-डफरीन फंड. |
| १२४० | स्थानिक कमिटी" |
| ३०० | उमरावती शहर-मुनसिपालिटी |
| ४६४९ | |

ही तूट भरून काढण्यासाठीं असें ठरविलें आहे कीं सरकारांतून सालिना २००० रुपयांची उक्ती रकम ३ वर्षे पर्यंत दवाखान्या प्रीत्यर्थ मिळावी ह्मणून विनंती करण्यांत यावी. या दवाखान्याचा उपयोग उत्तरोत्तर अधिक होत आहे तथापि सर्व व्यवस्था युरोपिअन धर्तीवर असल्यामुळें लोकाश्रय चांगलासा मिळत नाहीं व लोकांत उपयोगही यथातथाच होतो. तथापि ही संस्था लोकोपयोगी आहे ही गोष्ट लक्षांत ठेऊन श्रीमान गृहस्थ आपला उदार हस्त पुढें करितील अशी बहुत जणांस आशा आहे.

---

रॉक आईल किंवा मातीचें तेल हें आपल्या व्यवहारांतील अगदीं जरूरीचा पदार्थ झालें आहे. हें तेल फार स्वस्त मिळतें आणि प्रकाश चांगला देतें. याचा खप इंडियांत गेल्या १६ वर्षांत इतका वाढला कीं त्या तेला शिवाय बहुतेक दिवाबत्तीला दुसरें तेलच वापरत नाहींत. दुसरी गोष्ट ही खरी कीं या तेलानें जितके अनर्थ झाले आहेत तितके सध्यांच्या प्लेगमुळें देखील नसतील. लोक या अनर्था विषयीं आंधळे आहेत असें नाहीं परंतु या तेलानें मोहनी इतकी घातली आहे कीं अनर्थ होत असतांही लोक हें तेल जाळतात. क्षणिक सुखाला मनुष्य फार भुलतो आणि त्यामुळें तो परिणामाकडे दृष्टीच पोचवीत नाहीं. प्रत्येक मनुष्याला वाटत असतें कीं आपण काळजी घेऊं तर कसलाही अनर्थ होणार नाहीं. पण काळजी बरोबर घेतली जात नाहीं आणि आगी लागून अनर्थ वारंवार घडतात. इंडियांत हें तेल इतकें खपतें कीं सर्व देश या ज्वालाग्राही तेलानें भरला आहे ह्मटलें तरी अन्यथा होणार नाहीं. या तेलापासून डोळ्याला अपाय पडतो, हवा अशुद्ध होते, आणि चिमणी शिवाय जाळल्यानें या तेलापासून आयुष्याला घातुक असा धूर चालतो व काजळानें गरीब लोकांचीं घरें काळीकुट्ट होतात. गरीब लोकांत एखादा पैसा वाचेल तेवढा पाहिजेच असतो ह्मणून ते मातीच्या तेला शिवाय इतर तेल वापरीतच नाहींत. सुखवस्तु लोकांचे ऐषआराम वाढले आहेत, त्यास मेणबत्यांचा खर्च करवत नाहीं, उजेडाची छानछुकी पाहिजे असते आणि ह्मणून ते लोक देखील हेंच तेल वापरतात. या तेलाचा प्रसार इतका झाला आहे कीं त्याचा उपयोग करूं नका ह्मणून सांगणें ह्मणजे असंभवनीय गोष्ट वाटेल. परंतु वस्तुस्थिती वरून हें सांगणें भाग वाटतें जर निदान उन्हाळ्याच्या दिवसांत लोक हें तेल न जाळतील तर त्यांचा स्वतांवर उपकार होऊन लोकांचा मोठा फायदा होणार आहे.

इंडियांत मातीचें तेल दोन ठिकाणाहून येत असतें. प्रथम अमेरिकेंतून हें तेल येत होतें आणि त्याचाच सर्वत्र पुरवठा होत असे. सन १८८५-८६ त २१३ १/३ लक्ष ग्यालन तेल इंडियांत आलें त्यापैकीं २०५ लक्ष अमेरिकेन तेलाचे होते. रशिया-

र्वे तेल नुकतेंच येऊं लागलें होतें पण गेल्या १० वर्षांत इतकें अंतर पडलें कीं १८९६-९७ मध्यें ४११ लक्ष ग्यालन आलें आणि अमेरिकन फक्त १९.३ $\frac{१}{३}$ लक्ष ग्यालन होतें रशियन तेलाचें अगदीं वर्चस्व आहे. आतां तिसरें तेल सुमात्रा बेटाकडून येऊं लागलें आहे आणि हें तेल फारच स्वस्त पडेल व त्यामळें याचाच सर्वत्र खप होईल असा रंग दिसतो. सुमात्रा बेटाचें या तेलांत वर्चस्व झालें तर रशियाचा व अमेरिकेचा व्यापार बुडाल्याच प्रमाणें होणार आहे. वरील आंकड्या वरून या तेलाचा वार्षिक खप कसा झपाट्यानें वाढत आहे हें कळून येईल.

---

गौतम बुद्धा विषयीं कांहीं लेख स्वाटदरीच्या भागांत सांपडले आहेत. मेजर डीन यांस 'नाग आपलाल' नांवाच्या सरोवराच्या नजिक जेथून स्वाट नदीचा उगम आहे तेथें बुद्धाच्या पादुका एका भव्य खडकावर आहेत तेथें नो कोरिव लेख पाली भाषेंत आहे त्याच्या लेखनपद्धतीवरून खिस्तीशकापूर्वीच्या शतकांतल्या या पादुका असाव्यात असा तर्क आहे. बुद्धाच्या पादुका संबंधानें चिनी प्रवासी प्रसिद्ध हान सांग यांनीं ६२१ सनाच्या सुमाराला उत्तम वर्णन दिलें असून त्यांत तेथील उद्यान स्थळाचें ही वर्णन आहे. मेजर डीन यांचा हा शोध जुन्या शोधामध्यें मोठ्या महत्वाचा आहे असा शास्त्रज्ञ लोकांचा समज आहे. पूर्वीच्या काळीं बुद्धाचा आगम या डोंगराळ मुलखांत होता आणि तिकडे त्याच्या वेदान्ताचा प्रसार होता असें अनुमान निघतें. या डोंगरी लोकांचें वर्णन रानटी लोका प्रमाणें इंग्रजी पत्रकार देतात तें चुकीचें आहे असें मानण्यालाही कारण दिसतें.

---

# The Berar Samachar

MONDAY, APRIL 18 1898.

---

The present history of India is most disappointing. It marks an erra in which the Government have triumphed over the public opinion. No respect or deference is shown towards the learned Native opinion. All things un counter to estrange further the Government and the public. The gulf between them is widened and no kindness prevails to bridge it over. Both the Government and the people seem as contending parties in a race-course. The Government parade their superiority to humiliate the people while the latter raise a war-cry and call the rulers to righteousness and the paths of duty. The hearty good old feelings are utterely lost; and we can hardly know where we are drifting. If legislative members care a brass-farthing for the opinion of the people the latter learn to sit with their hands folded and mark the current of disaffection that alienates the people from the Government. Let us read honestly what people think and speak about the Government. We must confess that apathy, indifference and cynicism rule supreme in the kingdom of officials. It is below human dignity to curry favour in such a state of affairs. Good men repel at the attempt to offer words of connsel when they are likely to be derided in one way or another. We feel the force of this estrangement of feelings; that is a bad foundation for the civilization of India. The present policy of the Government is undoing the stupendous work of empire-building. The rule is that repression and imperialism are grand things to look at; but they mark a victory over men's physical movements. People stand aloof and await a return to the old policy of a sympathetic and kind government. Men do not like to be governed so much by laws and regulations but yield a willing heart to the dictates of a kind Government. Lord Elgin has brought to a triumphant issue the imperialism foreshadowed by Lord Dalhousie and put in motion by Lord Dufferein. The Indian Empire is now as vast as imagination and physical conformation can make it; but there is the utter loss of good feeling between the Government and the people. But the latter are loyal to the core and the English education has taught many an excellent lesson. That lesson brings us a ray of hope. We have great faith in righteous goodness of the English people. Our hopes center in loyalty and honest and constant work. The English papers also admit the sad fact of estrangement to which we advertize today. We wish to signalize the looming danger and request the Government to rule over people with kindness. Kindness begets kindlier feelings and secures success in all walks of life. The Government can *legalize* all their acts but they can not call forth the loyal support and moral influence of public opinion to sanctify those acts. We request the Government to give full credence to what we say and we hope that a solid change in the present policy will not be a distant object.

---

Sad times have also a lesson to teach. Our political movements have been paralized and we see in calm moments that unless we rise as a nation in matrial prosperity we cannot hope to survive the slow but fatal effects of poverty that is marching upon our heels. Technical education is the only saviour to annihilate poverty and to augment the material prosperity of a nation. Education in vogue is necessary as a preliminary step but we end where we ought to begin Technical education. Material wealth purchases independence, and self-respect and with this in hand we shall be the first object of honor in the eyes of our rulers. We value most liberal education but it is not wise to sacrifice technical education to the highest demands of the former. Let us now err rather in excess on the side of technical education. We have got the first alphabets of this branch but we wish the Government to give us an elaborate and eficient system of technical education. Sir A. Mackenzie has also expressed a similar opinion before his retirement:— He remarked.

"I want to remedy all this, not by abolishing high education, but by reforming its scope and direction. I would have the student of the future cease to be brought up on badly assimilated words and on high falutin rhetoric, and I would have him taught to observe and think, and educate himself in the way Herbert Spencer indicates as the great desideratum in all education. There is nothing new in this. I lay no claim to be a discoverer or original reformer. May I especially call attention to an admirable paper by the Hon. Mr. Crole, of Madras, in the Punjab University *Magazine* for December, 1897. That article should be reprinted in Calcutta. Many authorities have expressed similar views. Sir Henry Maine, for instance, pointed out years ago that the strict and sober tests of truth which modern science can alone supply is exactly the element that it wanted to broaden and brace the Oriental mind—exactly the tonic which its infirmities call for. The Oriental mind is only too prone to rest on authority and accept inaccuracies. Pupils trained on books, and books alone, are mere passive receipients of other people's ideas. They never learn the arts of observing facts and applying knowledge. The study of language never can. "Correct judgment" says Spencer, "with regard to surrounding objects, events, or consequences depends on our knowledge of the way in which surrounding phenomena depend on each other, *i. e.* on Science!" Science constantly appeals to, and develops the individual reason. It is no doubt the case that even in England people are only now waking up to the knowledge of a wise pedagogy, but they are waking up at last. The idea of development of faculty is being substituted for that of mere acquisition of knowledge. The mere cultivation of words and application of formulæ is being discredited. The ideal education is being recognised as one which multiplies the power of the eye to see, of the ear to hear, of the hand to execute; which puts a mind well stored with knowledge into active contact with faculties capable of translating it into action. While these truths are now very generally admitted in Europe, it is sad to know that up to date in India, though the University has taken a few faltering steps in the right direction, science hodls but a very secondary place in the curriculum of high education, while in the Middle and Primary schools hardly anything has been done for kindergarten and manual instruction. In the Central Provinces, where I had a freer hand than in conservative Bengal, I did something to introduce a sounder system. I made drawing which lies at the basis of all manual instruction, compulsory in all primary Schools, and I took steps for introducing the solid system of hard-and-eye training *pari pasu* with and as a part of the ordinary school course. Remember, this is not technical education. It is as a part of general education for all classes of boys like that these changes are to be defended and justified The technical instruction I provided for afterwards in the shape of agricultural classes and engineering chools."

---

## वऱ्हाड

हवामान-उन्हाळा प्रखर होत चालला आहे. हवा निरोगी आहे. पारा १०८ अंशा पर्यंत चढतो. अभ्रामुळें मनस्वी उकडतें. पाण्याची कमताई विशेष आहे.

रावबहादूर सिताराम विश्वनाथ पटवर्धन हे आपल्या कामाचा चार्ज रा. स. विष्णु मोरेश्वर महाजनी यांस देऊन आजपासून रजेवर गेले आहेत.

'देशमुख सभा' यंदा पुढील सोमवारीं जलम रेल्वे स्टेशनावर भरणार आहे.

खालील गृहस्थांस वऱ्हाडांत हायकोर्टें वकिलाचें काम करण्याची परवानगी मिळाली.

रा. रा.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

रामचंद्र विष्णु महाजनी.

गोविंद कृष्ण पर्वते.

यशवंत देशपांडे.

या शिवाय रा. रा. मोरो भिकाजी आगाशे यांस परवानगी देण्या विषयीं चौकशी चालू आहे.

---

NOTICE.

It is hereby published for general information that the assessment lists of the scavenging tax as per new rules are kept open for inspection at the Municipal Office during Office hours and that objections in writing if any to the same will be received as regards the valuation of houses within one month from the date of publication of this notice.

Dated Akola 15th April 1898

K. G. Damle
Secretary
Municipal Committee Akola

---

नोटीस

ह्या नोटीसीनें सर्वांस कळविण्यांत येते कीं भंगी पट्टीबद्दल नवीन नियम झाले आहेत त्या प्रमाणें भंगीपट्टीचा आकार करण्याकरितां घराचे उत्पन्नाची केलेली यादी कमेटीचे आफिसांत ठेविली आहे, आफीस उघडे असल्यावेळीं पाहतां येईल. घराचे उत्पन्नाबद्दल ज्या कोणा इसमास तक्रार करणें असेल तो त्यानें सदर्हू नोटीसीचे तारखे पासून एक महिन्याचे आंत कमिटीचे आफीसांत लेखी करावी. कळोव तारीख १९ माहे एप्रील सन १८९८ इसवी.

K. G. Damle.
सेक्रेटरी म्यु० क०
अकोले.

---

नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि० क्लास १९ मिसल नंबर $\frac{९}{१८९८}$

विद्यमान सिविल ज्यड्ज्य साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव—रामेश्वर आ० पा० करणार गगाबाई जवजे सुरजमल.

राहणार— केळीवेळी तालुके आकोट.

जिल्हा—आकोला यांस मयत सुरजमल बापाचे नांव गीरधारीलाल राहणार केळीवेळी तालुके आकोट जिल्हा अकोला याचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावे ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यानीं तारीख १८ माहे जून सन १८९८ इसवी रोजीं सकाळीं ७ वाजतां सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख १९ माहे एप्रील सन १८९८ इसवी.

Sk. Ismail
सिव्हील ज्यड्ज.

---

## वर्तमानसार

मि. मित्र नांवाचे एक बंगाली गृहस्थ निनाम हैद्राबादेस प्रगट होणाऱ्या डेक्कन पोस्ट नांवाच्या पत्राचे चालक आहेत. ते तेथलि हायकोर्टात वकिलीही करीत असता-त. यांनीं आपल्या पत्रांत हायकोर्टाच्या एका जज्जाच्या कांहीं कृत्या संबंधानें प्रति-कूळ टीका केली होती. त्यावरून न्यायमूर्तीस गुस्सा येऊन त्यांनीं असा ठराव काढिला कीं हायकोर्ट वकिलांनीं वकिली शिवाय इतर कोणताही धंदा करूं नये. अशा प्रकारचा ठराव इतर कोठेंही नसून तो हैद्राबादच्या न्यायाधिशांनीं केला असें पाहून मि. मित्र यांनीं मुख्यप्रधान यांजकडे तकरार केली. त्या तकरारीचा विचार होऊन, प्रधानांनीं हायकोर्टाचा ठराव अन्यायाचा आहे असें ठरवून रद्द केला. नेटिव संस्थानांत मुद्रण स्वातंत्र्याचा उपभोग क्वचितच घडतो, याचें कारण अंमलदारांचा करडेपणा हेंच होय अशी आमची समजूत आहे, व तिचें चांगलेंच प्रत्यंतर हैदराबादच्या प्रस्तुतच्या उदाहरणावरून येण्या सारखें आहे.

मावलपूरचे राय तेजनारायणसिंह बहादूर हे विलायतेस मरण पावले.

दिल्ली येथें, आर्य वैद्यकाचा प्रसार करणारी एक वैद्यसभा स्थापन झाली आहे.

लख्खीसराय पासून गयेपर्यंत जी नवी रेल्वे बांधली जात आहे ती येत्या जूनपर्यंत तयार होईल.

रंगून येथील सरकारी छापखान्याच्या हिशोबांत वीस हजार रुपयांचा घोंटाळा झाला असल्याचें कळतें.

सहाव्या बंगाल इन्फन्ट्रीच्या दोन कंपन्या प्लेगड्युटी करितां मीरतहून हरिद्वाराकडे रवाना झाल्या आहेत.

पाण्याच्या सपाटी खालीं राहणारे प्राणी मंद दृष्टीचे असतात, असा नवा शोध काढण्यांत आला आहे.

इंग्लंडांतील एकंदर रेल्वे कंपन्यांच्या नोकरांस तिकडील प्रजेकडून दरसाल तीन लक्ष पौंड इनामदाखल मिळतात. स. वि.

दरसाल जगांतील सर्व समुद्रांतून चौदा फूट उंचीचा पाण्याचा थर वाफेच्या रूपानें आकाशांत जातो, असें एका शोधकाचें ह्मणणें आहे.

प्रगल्भ विचार–जीवन हा प्रवास आहे व मृत्यू हें घरीं परत जाणें होय.

२. सुहास्य हा घरांतील सूर्य प्रकाश होय.

३. सारासार विचारहीन मित्राइतकें भयंकर दुसरें कोणीही माणूस नाहीं.

४. संसार यात्रा ही चढाई आहे, लढाई नाहीं, ह्मणून तींत पराजय व जय हीं दोन्ही असतात.

५. आपण गरिबा विषयीं हळहळतो हें खरें, परंतु मुख्य प्रश्न, आपणास त्याबद्दल कितपत खरी हळहळ वाटते हा होय. जितकी हळहळ वाटेल तितकी त्यांनवर दया दाखवा व त्यांच्या उपयोगी पडा. धा.वृ.

गोवें प्रांतांतील मीठ चीन देशांत पाठविण्याचा बेत तेथील मिठागरवाल्यांनीं केला आहे. व त्या कामासाठीं कमिटीचीही योजना झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे.

कुशायर व त्याच्या आसपासचे भागांत दुष्काळ पडल्याचें कळतें. शु. सु.

कित्येक मंडळींना आपलें नाक बाजवी पेक्षां फाजील मोठें असल्याबद्दल फार वाईट वाटतें. पण पुढील मजकूर वाचला, ह्मणजे त्यांना बरेंचसें समाधान होणार आहे मोठें नाक हें बुद्धिमत्तेचें लक्षण आहे. लांब व उंच नाकाचा मनुष्य मोठा दिलदार, चाणाक्ष, सुस्वभावी, धैर्यवान असा असतो, त्यांस संताप आला, तरी ते करवेल तितकी क्षमा करतात. ज्यांना आपलें नाक फार भेंडाडे ह्मणून वाईट वाटत असेल, त्यांना वरील वर्णन किती समाधान देणारें आहे! नाक मोठें ह्मणजे आपण वर सांगितल्याप्रमाणें उदारचरित, धृतिवान क्षमाशील असें आहों असें धरून चालण्यास तर कांहीं हरकत नाहीं!

प्रत्येक मनुष्यानें आपल्या मनाला विचारण्या सारखे किती तरी प्रश्न आहेत. पण एकाच्याही ते लक्ष्यांत आहेत कीं नाहींत याची वानवाच आहे. 'पोटाला कसें मिळेल?' हा प्रश्न मात्र ज्याच्या त्याच्या मनांत वारंवार येतो. परंतु ही त्यांची केवढी चूक झटली पाहिजे बरें? ज्यानें आपल्या बुध्दिचातुर्यानें ही संपूर्ण सृष्टी नानाविध, मौल्यवान व मनुष्यांच्या जीविताला अत्यंत उपयोगी अशा वस्तूंनीं ओतप्रोत भरून ठेविली आहे त्या जगत्पालक परमेश्वरानें सकळ प्राणिमात्रासाठीं सर्व कांहीं योजना केलेली आहे. तर तो उदरंभरणाचा प्रश्न आतां मुळींच राहिला नाहीं. बाकी प्रश्न येवढेच कीं, "मी कोण? हें जग काय आहे? माझी सदसत्कृत्यें कोण पाहतो? जगांत येऊन मी काय केलें पाहिजे? या संपूर्ण विशाल विश्वासाचा चालक कोण?" वगैरे प्रश्न जर प्रत्येकानें प्रतिदिवशीं आपल्या मनाला केले तर त्याच्या मद, मत्सर, दंभ, मोह, क्रोध आदिकरून दुष्ट राक्षसी मनोवृत्तींचा समूळ नाश होऊन जाईल.

पक्षी आपलीं घरटीं सजवतात, तीं आपल्या पिलांचें संरक्षण ज्या योगानें अधिक होईल अशा प्रकारें सजवतात, कीं तीं सुंदर दिसावींत अशा तऱ्हेनें सजवतात? या प्रश्नाचा बराच ऊहापोह कांहीं दिवसा पूर्वीं दोघां पक्षिशास्त्रज्ञांत चालला होता. प्रोफेसर आसाम्रे यांचे ह्मणणें कीं, आपलें घरटें सुंदर दिसावें हा हेतु पक्ष्यांच्या मनांत सुध्दां येत नसावा. कांहीं पाखरें झाडांवरील शेवाळ आणून त्यानें आपल्या घरव्याचें तोंड सजवितात. परंतु तसें सजविण्यांत हेतु हा कीं तें घरटें आहे असें आपल्या शत्रूंस कळूं नये. झाडांवर जसें इतर कोठें शेवाळ असतें, तसेंच येथेंही आहे असें वाटून त्यांनीं झडप वगैरे घालूं नये. डॉ० सी० सी. आबट यांनींही या संबंधांत कांहीं प्रयोग करून पाहिले आहेत. दोन पांखरें त्यांच्या घरा शेजारींच एका झाडावर रहात होतीं. तीं कोठून कोठून लांबून तरी नानाप्रकारचें तंतु, सुंत वगैरे जमवून आणीत. डाक्तर ॲबटनीं काय केलें, कीं त्यांनीं सहज दिसतील अशा ठिकाणीं पुष्कळ रंगाची लोंकर ठेविली. मबक रंगाच्या लोंकरी होत्या, त्या अशा रीतीनें ठेविल्या कीं, त्या पक्ष्यांचें चित्त तिकडे लवकर आकर्षावें. लोंकर पिंवळी, जांभळी, करडी, हिरवी आणि तांबडी अशी होती. तांबडी, पिंवळी हें रंग अगदीं स्पष्टपणें दिसावेत अशा बेतानें बरच ठेवले होते. पण त्या लोंकरीला त्या पाखरांनीं मुळीं सुध्दां चोंच लाविली नाहीं. सगळी करडी आणि हिरवी लोंकर होती ती त्यांनीं लांबविली. एकदां दुसरा जांभळीचा तंतु नेला. पण तांबडीला आणि पिंवळीला स्पर्श सुध्दां केला नाहीं. यावरून असा सिद्धांत काढल्याखेरीज रहावत नाहीं कीं, ज्या झाडावर ते घरटें असेल, त्या सालीचा रंग व त्यावरील शेवाळीचा रंग या दोहोंत खपून जाईल अशा रंगाचे तंतु वगैरे नेऊन पक्षी आपलीं घरटीं सजवितात. कां! तर तीं झाडाच्या वगैरे रंगांत लपून जाऊन आपल्या शत्रूंपासून सुरक्षित रहावीत. यावरून सौंदर्याकडे त्यांचें लक्ष नसतें हें उघड दिसतें.

ज्या वाईटाचा आपण मनापासून तिट्कारा करितों, त्याच वाईटापासून किती तरी चांगल्या उत्कृष्ट वस्तूंची उत्पत्ति परमेश्वरानें केलेली आहे. या संपूर्ण सृष्टीचें जर सूक्ष्म निरीक्षण केलें, तर त्या जगन्नियंत्या परमेश्वराच्या अगाध चातुर्या विषयीं आश्चर्य वाटल्यावांचून खास राहणार नाहीं. अगदीं यःकश्चित् चिखलापासून कमलाची उत्पत्ति आहे. संस्कृतांत त्याला पंकज ह्मणतात. मातींत सोनें व दुसऱ्या किंमिक मौल्यवान वस्तू उत्पन्न होतात. समुद्रांतील शिंपांच्या पोटीं मोतीं उत्पन्न होतात. किड्यांच्या पोटीं मौल्यवान रेशीम सापडतें. कस्तुरी हरिणा पासून मिळते. माशांच्या मोहळा पासून अत्यंत गोड असा मध मिळतो. तेव्हां हा सर्व चमत्कार काय आहे याचा तर्क आपल्या मानवी ज्ञानास अशक्य नव्हे काय? क०

सर्वे भविष्य—डिंडिगल येथील कनड स्वामी पिले नांवाच्या मद्रासी ज्योतिषानीं असें भीतिप्रद भविष्य केलें आहे कीं, नवंबर १८९९ पासून सन १९०३ च्या मे महिन्यापर्यंत हिंदुस्थानांत दुष्काळ प्लेग, धरणीकंप व ज्वालामुखीचे भडाके इत्यादि उपाधींनीं तीन हिसे लोकसंख्येचा संहार होईल. वरील मुदतींत अष्टग्रहीचा योग आला आहे. त्यानें हा परिणाम घडेल असें सदर ज्योतिष्यांचें ह्मणणें आहे. दुसऱ्या एका ज्योतिष्यांनींहि हे अष्टग्रहीचे अनिष्ट परिणाम कबूल केले आहेत. परंतु त्याची बाधा फक्त ५ महिनेच होईल. आणि त्यांतील २॥ दिवस कायते अतिशय नाशाचे जातील असें ह्मटलें आहे. मिळून काय? गेलेलीं वर्षे बरीं, अशीं वर्षे पुढें येणार हें ज्योतिषी सांगतात.

युद्ध सामुग्री— टर्की सरकारानें जर्मनींतून कोट्यावधी काडतुसें मागितलीं असून त्यासाठीं जर्मनींतील २ फॅक्टरीमध्यें रात्रंदिवस घणाघाई काम सुरू आहे, असें समजतें. यूरोपांत यंदां कांहीं तरी वाजल्या शिवाय बहुधा राहत नाहीं.

नाणेंकमिशन–हिंदुस्थानांतील टंकसाळी सुरू कराव्या कीं, सोन्याचें नाणें सुरू करावें इत्यादिकांचा विचार करण्यासाठीं ना० फौलर साहेबांचे अध्यक्षतेखालीं एक रायल कमिशन नेमण्यांत आल्याचें लंडनच्या तारेवरून समजतें.

नवीन ठराव—कलेक्टर, पोलिस कमिशनर, पोलिस सुपरिंटेंडेंट, मामलेदार आणि चीफ कानस्टेबल यापैकीं प्रत्येकानें स्थानिक पत्रास वर्गणीदार व्हावें व पत्रांची वर्गणी कंटीजन्सी मधून द्यावी असा एक नवीन ठराव आमच्या सरकारानें केल्याची बोलवा आहे. गोष्ट खरी असल्यास सरकारचा हेतु सहज सर्वांच्या लक्षांत येण्यासारखा आहे. स० शी०

दक्षिणवेल्स प्रांतांतल्या कोळशाचे खाणींत काम करणारे ९०,००० मजूर उद्योगधंदा नसल्यामुळें बेकार झाले आहेत!

मुंबई शहर सुधारण्याचा कायदा मुंबई सरकाराकडून गेल्या शनिवारच्या बैठकींत पास झाला त्यास हिंदुस्थानसरकारची मंजूरी मिळून, त्या कायद्या प्रमाणें लवकरच मुंबई शहराची सुधारणा सुरू होईल, असें दिसतें.

मुसलमानी यूनिव्हर्सिटी—परलोकवासी सर सय्यद अहंमदखान यांचे स्मणार्थ १० लाख रुपये वर्गणी गोळा करून त्यांच्या नांवानें अलीगड येथें युनिव्हार्सिटी मुसलमानी स्थापन करण्याचा विचार ठरला आहे.

दुष्काळ—स्पेनदेशांत हल्लीं मोठा दुष्काळ माजला असून तिकडे धान्याचे भाव फारच महाग झाले आहेत. इतकी महागाई तिकडे अलीकडे कधीं झाल्याचें कोणास आठवत नाहीं. सालामांका येथें दररोज रोज्याचे बाजारांत मोठा रक्तपातापर्यंत प्रसंग येतो असें वर्तमान आलें आहे.

इंग्लंडानें चीनसरकाराजवळ वी-हाई-वी हें बंदर जें हल्लीं जपान सरकारचे ताब्यांत आहे तें त्यांजकडून सुटल्यावर आपल्याला कांहीं दिवसपर्यंत द्यावें अशी मागणी केली आहे. रशियन सरकारानें आर्थर बंदर चीनजवळून २५ वर्षे पर्यंत मागून घेतलें आहे. याच प्रमाणें आतां सर्व यूरोपियन सरकार चीन जवळून एकेक बंदर मागुन घेऊन तेथें आपलें स्वामित्व राखीत जाणार असें दिसतें।

गणीती यंत्र–शिकागो येथील राहणारा हेन्रीगोल्डमन नांवाच्या एका कल्पकानें एक "ऑरथ मेशिन" ह्मणजे गणीती यंत्र तयार केलें असून त्यानें त्याबद्दलचें अनन्याधिकारपत्रक ( पेटंट ) यू स्टे सरकाराकडून मिळविलें आहे ह्या यंत्राचे योगानें वाटेल तितक्या आंकड्यांच्या बेरजा करतां येऊन त्यांतून एक किंवा अनेक रकमा वजा करितां येतात; आणि त्याच प्रमाणें वाटेल तितक्या आंकड्यांचे गुणाकार व भागाकारही ह्या यंत्राचे योगानें तावडतोब करण्यांत येतात! इतकेंच नव्हे; ह्या यंत्राचे योगानें उतरत्या व चढत्या भांजणीचीं उदाहरणेंही तावडतोब व नक्की सोडवितां येत असल्यामुळें वजनी, मापी, किंवा नाण्याचे संबंधाचे वाटेल तितक्या रकमांचे व आकड्यांचे एकंदर हिशेब अत्यल्पावकाशांत अतित्वरेनें करितां येतात! अशा प्रकारचे पूर्णतेस पोचलेले गणिती यंत्र आजपर्यंत निघालेलें नव्हतें आजपर्यंत बेरिज [ मिळवणी ] व गुणाकार येवढे करणारें यंत्र उपयोगांत होतें. पण त्या यंत्राची सुधारणा वर लिहिल्या प्रमाणें मि. हेन्रीगोल्ड्मन् यांजकडून पूर्णपणें झाली आहे हें पाहून मानवी बुद्धीच्या व कल्पकतेच्या संबंधानें कोणालाही विलक्षण आश्चर्य व धन्यता वाटल्या वांचून राहणार नाहीं. ज्ञा.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास ......................०४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........०१ ०६
दुसरे खेपेस .... .......०१

Annual in arrears 7 „ 1 Rs 5
Six monthly......... 3 ............... 8
Single copy ................................4 a
Advertisemen
Below 10 lines ......2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 25 APRIL 898 NO 16
वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख २५ माहे एप्रील सन १८९८ इ० अंक १६

नोटीस

ती. मातोश्री आजी बहिणाबाई जवजे नारोबा माळी राहणार अकोला अगरेवस हीस नोटीस देणार जानू व तानू वल्लद सोनाजी माळी राहणार अकोले नोटिशीनें असें कळवितो कीं, तूं आमची आजी आहेस. आमचा बाप व त्याचा ( सोनाजीचा ) चुलता हे सर्व आह्मी एकत्र शेतीचा धंदा करून होतो. त्यावेळेस सर्वांनीं मिळून मिळविलेली इस्टेट स्थावर व जंगम तुजपाशी आहे. अलिकडे घरामध्यें न जमल्या कारणानें केवळ चुली निराळ्या घालून भाकरी करून खातो आहो बापाची व बापाच्या बापाची व आह्मी एकत्र होतो तों वेळ पर्यंतची सर्व प्रकारची इस्टेट तुजजवळ आहे व ती आह्मी अद्याप पर्यंत केव्हांही वाटून घेतली नाहीं. आतां आह्मास असें समजतें कीं, सदहू जिनगी पैकीं मळा जवारीचा खंडी ५ चा गेल्या वर्षी तूं आपल्या मुलीस दिलास व आह्मा सर्वत्र समाईकांची जी जिनगी तुजपाशी आहे तीही तूं आपले लेकीस देण्याच्या इरादांत आहेस करितां या नोटिशीनें कळवितों कीं आमचे संमती शिवाय सदहू जिनगी पैकीं तूं जर कोणास कांहीं दिलेस तर त्याजबद्दल तुजला योग्य जबाबदार धरले जाईल. तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस. तर ही नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसाचे आंत आमचे सर्व जिनगीचा सारखी वाटणी करून द्यावी. न दिल्यास आह्मी रीती प्रमाणें काम चालवू. कळावे तारीख २१ माहे एप्रील सन१८९८ इसवी.

सही
जानु व तानु वल्लद सोनाजी
माळी राहणार अकोला

---

## जाहिरात.

सर्व लोकांस जानु व तानु वल्लद सोनाजी माळी राहणार अकोले हे असें कळवितात कीं आमची आजी बहिणाबाई जवजे नारोबा रहाणार अकोला हिजपाशी, आमचा बाप व आमच्या बापाचा बाप यांनीं व आह्मी एकत्र धंदा करून मिळविलेली स्थावर जंगम इस्टेट आहे आह्मी अद्याप पर्यंत बिलकुल विभक्त झालों नाहीं व वाटणी करून घेतली नाहीं. घरांत न जमल्यामुळें नांवाला मात्र भाकरी निराळी करून खातो. आतां आमचे आजीचे मनांत आमची जी सर्व जिनगी आहे ती आपले लेकीस देण्याचे आहे. तर त्या जिनगी पैकीं, तिचा जावई, लेक अगर कोणीही जर कांहीं गहाण खरेदी बक्षीस वगैरे आमचे संमती खेरिज आमचे आजीने दिले तरी सुद्धां घेऊं नये. घेतल्यास त्यास योग्य जबाब द्यावा लागेल. कळावें तारीख २१-४-९८ इसवी.

सही
जानु व तानु वल्लद सोनाजी
माळी रहाणार अकोला

---

नोटीस

खालील९ लोकांस मी असें कळवितों कीं "वैजनाथ नरसिंगदास" या नांवाचे दुकानशी विशेष करून आपली बरीच देवघेव आहे तर यापुढें आतां माझे संमती खेरीज त्या दुकानशी कोणचाही संबंध ठेवू नये कारण त्या दुकानांत माझा निम्मे हिस्सा आहे. या उपर जर आपण कांहीं कराल तर आपणाप व्यवस्थेशीर जबाबदार धरले जाईल कळावें तारीख १८।४।९८

नांवे

( १ ) उदेराम रूपराम ' वहिवाटदार शिवलाल कनीराम बडोदे तालुके भुसावळ
( २ ) गंगाराम चुनीलाल खेडगांव तालुके मलकापूर.
( ३ ) बापू वल्लद जानजी पाटील वाटपळसी तालुके जळगांव.
( ४ ). मन्नुसा रतनसा वाणी बडोदा. तालुके भुसावळ.
( ५ ) सखाराम वल्लद एडू भोंड्या बडोदे
( ६ ) राघू वल्लद गणू गुरव बडोदा.
( ७ ) रंगू वल्लद तुळसीराम सोनार बडोदे
( ८ ) सवाईराम रिखबदास खामगांव
( ९ ) शिवलाल गुलाबचंद वहीवाटदार कन्हयालाल जळगांव.

सही
मारवाडींत हेमराज ठाकुरदा
स राहणार बडोदे तालुके
भुसावळ

---

नोटीस

चिरंजीव रा. रा. बैजनाथ नरसिंगदास मारवाडी राहणार बडोदे तालुके भुसावळ जिल्हा खानदेश यास मी नोटीशीनें असे कळवितो कीं मी व तुझे वडील रा. बैजनाथ हे सख्खेबंधु "वैजनाथ नरसिंगदास" या नांवाची दुकान वडिलार्जित इस्टेटीवर सुरू केलेली आहे. तर ह्या दुकानांत माझा निम्मे हिस्सा आहे व आपण माझा हिस्सा देण्याचे कबूल करून आण्याच्या स्टापावर पावती ही मजकडून घेतलीत. व आतां माझा हिस्सा मला देत नाहीं. असे कपटाचें करणें रास्त नाहीं. तर या नोटिशीनें असें शेवटलें कळवितो कीं माझा अर्धा हिस्सा व्यवस्थेशीर ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आत देऊन कागदपत्र करून घ्यावेत व निकाल करून टाकावा. नाहीं तर रीतीप्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल. कळावे तारीख १८।४।९८। इसवी.

( सही ) मारवाडींत हेमराज ठाकुरदास
रहाणार बडोदें तालुके भुसावळ
दस्तुर खुद्द

---

## जाहिरात

सर्व लोकांस या जाहिरातीनें हेमराज ठाकुरदास राहणार बडोदें तालुकें भुसावळ असें जाहीर करतात कीं माझा वडील बंधु हेमराज बैजनाथ यांनीं "हेमराज बैजनाथ" या नांवाची दुकान वडिलार्जित भांडवलावर सुरूं केली. बैजनाथ व मी हेमराज यांचे साक्षात चिरंजीव. बैजनाथ हे वडील व मी लहान. सदहू सुरू केलेली दुकान अदमासें २५ वर्षें त्याच नांवावर चालून नंतर 'बैजनाथ नरसिंगदास' या नांवानें सुरू झाली. ती अद्याप पर्यंत चालू आहे. या दुकानांत माझा बरोबर अर्ध्या मालकीचा हिस्सा आहे. असें असून कपटानें अजिबात माझें नांव गाळून माझा निम्मा हिस्सा बरोबर करून देतो ह्मणून मजपासून एक आण्याच्या स्टांपावर पावती घेऊन या वेळ पावेतों माझा हिस्सा मजला मिळाला नाहीं. याजकरितां असें कळवितो कीं "बैजनाथ नरसंगदास" या नांवाचे दुकानाशीं माझ्या संमती शिवाय, देणघेणीचा वगैरे कोणचाही व्यवहार जो करील त्याजबद्दल तोच जबाबदार होईल. कळावें तारीख १८ माहे एप्रील सन १८९८ ई०

सही [ मारवाडींत]
हेमराज ठाकूरदास रहाणार बडोदें
ता. भुसावळ दस्तूर खुद्द.

---

नोटीस

नोटीस बेशमी तुकाराम वल्लद उदेभान मोरे राहणार खंडाळा तालुके बाळापूर यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी २॥ वर्षांची असतां तुझें माझें लग्न झालें असें ह्मणतात परंतु तूं होऊन अगर तुझे आईबापांनीं मजला तुझें घरीं कधींहि नेलें नाहीं माझे सावत्र बापानें मला तुझे घरीं एकदां आणून घातले असतां तूं व तुझी आई असे उभयतांनीं मजला रोज मारहाण करावी व खाण्या पिण्यास व वस्त्र प्रावरणहि बरोबर देऊं नये हें तुमचें निर्दय वर्तन माझे भावास समजल्यावरून तो मजला आपले घरीं घेऊन गेला. मजला वयांत येऊन ६।७ वर्षें झालीं तरी तुह्मी नेलें नाहीं मी होऊन एकवेळ तुमचे घरीं राहण्यास आलें असतां तुह्मी मजला अती क्रूरतेनें व निर्दयपणानें वागविलें व घरांतून काढूनही दिलें माझे भावास गरीबीमुळें मजला पोसवत नाहीं. लोकांचें कर्ज काढून मी आपला उदरनिर्वाह आज सहा वर्षे करीत आहे त्यामुळें मजला रुपये २८३॥ कर्ज आहे ते तुह्मी देत असल्यास व मजला चांगल्या रीतीनें वागवाल असा पंचासमक्ष लेखी करार लिहून देत असल्यास अजून मी तुमचे घरीं नांदण्यास तयार आहे करितां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सावकाराचें कर्ज व चांगल्या वागणुकी बद्दल लेखी करार देऊन मजला घेऊन जावें. तसे वरील मुदतींत न झाल्यास हीच तुमची फारकती असे समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमची मजवर कोणतेही प्रकारची मालकी राहणार नाहीं. कळावें तारीख २२।४।९८ इसवी.

सही
मुक्ती मर्द तुकाराम मोरे हल्लीं
वस्ती पाटसूळ तालुके अकोले
निशाणी बांगडी

---

वऱ्हाडसमाचार

---

मित्ती वैशाख शुद्ध ४ शके १८१९

---

कुंभकोण येथें गेल्या ८ वे तारखे पासून तीन दिवस मद्रास इलाख्याची प्रांतिक राजकीय सभा भरली होती. अध्यक्षस्थान मि० आडमस बारिस्टर यांनीं स्वीकारलें होतें. अध्यक्षांनीं ही सभा निरनिराळ्या ठिकाणीं भरविण्या संबंधानें अनुकूल अभिप्राय दर्शवून सांगितलें कीं मुख्य सभेच्या स्थानिक उपसंस्था शहरोशहरीं पाहिजेत आणि त्यामध्यें नेहमी उपयुक्त चळवळ चालू पाहिजे. लोकांमध्यें निद्रितावस्था मोठी आहे या गोष्टी संबंधानें त्यांनीं खेद प्रदर्शित केला आणि यंदाची राष्ट्रीय सभा गेल्या तेरा सभा पेक्षां चांगली होईल अशी व्यवस्था राखण्याचें काम मद्रास इलाख्यावर सर्व राष्ट्रानें सोंपविलें आहे तर तें उत्तम प्रकारें बजावण्या विषयीं मोठी आस्था बाळगा ह्मणून त्यानीं कळकळीनें उपदेश केला. मद्रास इलाख्यांत येणा राष्ट्रीय सभें संबंधानें चळवळ आतां पासूनच सुरू आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

---

कुंभकोन येथें मद्रासची प्रांतिक सभा भरली होती तेथें मि. एस. कृष्णस्वामी अ-

ध्यर, हेड मास्तर यांनीं एक सूचना अशी केली कीं सध्यां औद्योगिक शिक्षण देण्यांत येतें तें अगदीं अपूर्ते व असमाधानकारक आहे; आणि ह्मणूनच लोकांची दरिद्रावस्था व मूळच्या उद्योगधंद्याचा ऱ्हास या गोष्टी लक्ष्यांत आणून सरकारानें औद्योगिक शिक्षण उच्च प्रकारचें देण्या विषयीं योजना करावी व या कामाला खर्च अधीक लागला तरी त्या बद्दल कांकूं करूं नये. हा विषय राजकीय स्वरूपाचा नाहीं पण राजकीय सुधारणा इतक्या घोटाळ्यांत पडल्या आहेत कीं औद्योगिक शिक्षणाच्या प्रभावानें इंडियाची सांपत्तिक स्थिती सुधारल्या शिवाय कोणत्याच दिशेनें आमच्या राष्ट्राची प्रगती होणार नाहीं. राष्ट्रीय संपत्ति हीच राष्ट्राची उन्नती प्रचलित करिते आणि त्याच संपत्तीचा अभाव असला ह्मणजे सर्व राष्ट्रीय सुधारणा लटक्या आहेत. इंडियांत कलाकौशल्य उत्तम दशेला पोंचलें होतें पण इंग्लंडाशीं संबंध जुळल्या दिवसा पासून इंडियाचा संपत्तिवर्धक व्यापार ठार बुडाला आणि सर्व व्यापार परिणामीं विलायतवाल्यांसच अत्यंत अनुकूळ होत चालला. इंडियाच्या दारिद्रावस्थे विषयीं ज्यांनीं योग्य मनन केलें आहे त्यांस भावी स्थिती संबधानें मोठी निराशा वाटते. मि. वरदाचारी या विषयावर बोलतांना ह्मणाले कीं हा देश सांपत्तिक वैभवाला कधीं काळीं चढेल अशी आशा देखील विद्यमान गोष्टीं वरून वाटत नाहीं. या देशाचा शेती इतकी नामी होती. सर्व लोकांचा मूळ आधारस्तंभ ह्मणजे शेतीच होती. परंतु सध्यां काळ असा आला आहे कीं शेतीवर लोकांचा निभाव लागत नाहीं. जमिनीची सुपीकता कमी कमी होत चालली, सारा फार वाढला आणि शेतीची ओबड धोबड आऊतें पूर्वींचीं तशींच चालूं असून यांत सुधारणा काडीमात्र नाहीं. या तिन्ही गोष्टी शेतीचा कामधंदा चांगलासा लाभकारक करीत नाहींत. ब्रिटिश राज्यांत सरकारी चाकरी ह्मणजे मोठ्या चढाओढीची बाब आहे पण सरकारी चाकऱ्या पुष्कळशा नसून त्यांची संख्या गरजे प्रमाणें वाढत नाहीं आणि सुशिक्षित लोक जसे पुष्कळ होत आहेत तशा त्यांस चाकऱ्या मिळत नाहींत. इंडियन लोकांचे विचार व रहाटी हीं घरीं बसण्याचीं आहेत आणि त्यामुळें देशान्तरावर आमचे लोक व्यापारधंदा कारितील अशी मोठीशी आशा नाहीं. आमच्या देशांत प्राचीन काळीं कलाकौशल्य दांडगें होतें व व्यापार मोठा होता; पण सध्यांच्या काळीं व सांप्रतच्या सुधारणेबरोबर त्यांचा टिकाव लागत नाहीं. आमचें पूर्वकालीन सांपत्तिक वैभव लयास गेलें आणि इतर राष्ट्रा बरोबर सामना करण्या इतका या राष्ट्रांत जीवच राहिला नाहीं. फ्रान्स, जर्मनी, अमेरिका व इंग्लंड येथील लोकांस पाश्चिमात्य विद्या शास्त्रीय शोध, व यांत्रिक कला यांनीं श्रीमान केलें, पण त्या गोष्टी आमच्या देशचे उद्योग धंदे वाढण्याला, व्यापार वृद्धींगत होण्याला व शेती सुधारण्याला अवश्य पाहिजे आहेत. आमच्या शिक्षणांत त्या गोष्टी पैदशा शिकविल्या जात नाहींत. सांपतचें शिक्षण ह्मणजे फक्त वाङ्मयाचा एक भाग आहे. यो वाङ्मयानें सुखवस्तु लोकांस मोठे अप्रतिम लाभ होत आहेत पण सर्व साधारण स्थितीच्या लोकांस या वाङ्मयानें कांहीं उपयोग होत नाहीं व त्यांस शिक्षण पोटाच्या धंद्या संबंधानें पाहिजे असतें. सरकारी चाकरी, वकिली, वैद्यकी किंवा इंजिनिअरी शिकविणारी विद्या पुरी नाहीं. मोठ्या जनसमूहास हस्त कौशल्याचें काम करण्यास, यंत्रें चालविण्यास व अशाच गोष्टी करण्यास शिकविलें पाहिजे. औद्योगिक शिक्षण वरिष्ठ प्रतीचें असून इतर राष्ट्रांतल्या प्रमाणें सुलभ व बहुव्यापक झालें पाहिजे. औद्योगिक शिक्षण देणें सरकारचें कर्तव्य आहे. हा देश संपत्तिमान, यांत्रिक कारखान्यांनीं परिपूर्ण व व्यापारांत ओतप्रोत निमग्न होईल तेव्हां औद्योगिक शिक्षण चांगलें उपयोगीं पडेल व ते तशा प्रकारचे देता येईल. अशा प्रकारची समजूत चुकीची आहे. आपला अनुभव असा आहे कीं औद्योगिक शिक्षणाचा प्रसार झाला ह्मणजे त्याच्या अनुषंगानें संपत्ति, यंत्रालयें व व्यापार हीं आपेआप फलद्रूप होतात. सरकारापाशीं विनंती इतकीच कीं औद्योगिक शिक्षण या देशांत फैलवा ह्मणजे इंडियन लोकांस उदरनिर्वाहाच्या सोयी सहजीं उपलब्ध होतील व कांहीं कालानें तरी इंडिया राष्ट्र आपल्या पूर्व वैभवाला पोचून इतर राष्ट्रामध्यें अग्रस्थान पावेल.

---

*दामोदर हरी चाफेकराला गेल्या सोमवारीं सकाळीं ७॥ वाजतां फांशीं दिलें आणि लेफ्टेनंट एअर्स्ट व मि. ऱ्यांड यांच्या खूनांचा ग्रंथ आटोपला! या खूनाचो शहानिशा अखेर हायकोर्टांत झाली आणि त्यामुळें मुंबई सरकारच्या राज्याकाराला तेजी आली. खून पत्यांत येऊन अपराध्याला शिक्षा झाली ही मोठी समाधानीची गोष्ट होय. आतां वीस किंवा पन्नास हजार रुपयांचें बक्षीस ज्याला मिळेल त्याचें आह्मी अभिनंदन करून या विषयाचा निरोप घेऊं. एकंदर खूनाच्या प्रकारा वरून पाहतां त्यांत राजकीय प्रकार कांहीं नाहीं अशी आतां सरकारची ही खात्री होऊन चुकलीच पाहिजे. जसे गोम्या किंवा सोम्या यांचे खून इंडियांत होतात तसेच किंवा तशाच प्रकारचे खून एअर्स्ट व ऱ्यांड या दोन अधिकाऱ्यांचे झाले. या दोन साहेबापाशीं सरकारची सत्ता होती पण हा विशेष लक्ष्यांत न घेतां चाफेकराच्या स्वभावानें अखेर तीन माणसें बळी घेतलीं. साधारण परिस्थितींतल्या मानवी स्वभावापेक्षां चाफेकराचा स्वभाव अमानुष होय आणि ह्मणूनच सर्व गोष्टी शोकपर्यवसायी झाल्या!

चाफेकरानें खरोखर खून केले किंवा तो निरपराधी असतांना फांशी गेला या प्रश्नाचा खल करण्यांत आतां कांहीं हांशील नाहीं. असल्या निरर्थक चर्चे पासून जगाचा, सरकारचा किंवा रयतेचा कोणाचाच फायदा नाहीं. विचारापासून वृथा ताप किंवा शीण होणार आहे. पुष्कळ चांगल्या निष्पक्षपाती लोकांच्या मनांत अद्याप शंका जागृत आहेत पण त्यांनीं त्यांचा शेवटचा निरोप घेतला पाहिजे. शंकेला वास्तविक स्थळ आहे असें मानलें तरी या चाफेकराच्या खटल्या पासून एक बडा शिकण्या सारखा आहे, जो मनुष्य आपल्या खोट्या कबूली जबाबांनीं सरकाराला फसवूं पाहतो तो कबूली जबाबातल्या अपराधाची शिक्षा अवश्यपणें पावतो.

---

√ ले० एयर्स्ट व मि रँड यांच्या खुनांच्या इतिहासाची समाप्ती झाली पण त्या वेळच्या वादळांत सांपडलेले बिचारे सरदार नातू अद्याप बंदिवासांतच आहेत. हे उभयतां बंधु तुरुंगांत कालक्षेप करीत आहेत वाहिमानें त्यांस कैदेंत टाकलें, पण त्यांची चौकशी नाहीं आणि त्यांस किती काळ या शिक्षेखालीं काढावा लागणार आहे याचाही नेम नाहीं; आणि न्याया शिवाय तुरुंगवास दिला जात नाहीं अशी कीर्ति आहे पण त्या कीर्तीला कलंक या सरदार नातूंच्या कैदेनें लागला आहे. सरदार बळवंत रामचंद्र नातू यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनीं कामन्स सभेला एक हृदयद्रावक अर्ज केला आहे. सन १८९७ च्या जुलै २८ तारखेला सरदार बळवंतराव व हरिपंत तात्य यांस सरकारी अटकेंत ठेवण्यांत आलें आणि त्या बरोबर लागलीच मुंबई सरकारनें सर्व स्थावर जंगम इस्टेट जप्त केली. हें खानदानी कुटुंब उघडें पडून अनाथ झालें पण पुढें दैव योगानें सरकारांतून थोडी नेमणूक पोटापाण्यासाठीं करण्यांत आली. या नेमणुकीपैकी पैकीं देखील अद्याप पै मिळाली नाहीं. याला कारण पुण्याचे कलेक्टर व दुसरे दीर श्रीमंत सदाशिवराव यांच्यामध्यें कांहीं लढा पडल्याचें झालें. पण परिणाम असाच झाला कीं सर्व कुटुंबांतलीं माणसें अन्नवस्त्रासाठीं पराधीन झालीं. सरदार नातूंच्या घराण्याचा लौकिकाला व कूळशीलाला योग्य अशा स्थितींत दिवस कढण्या इतकी देखील ही कागदी नेमणूक नाहीं. अर्जदारीण लक्ष्मीबाई कामन्स सभेला विनंतीनें कळवितात कीं सरकारांतून उभयता सरदार नातूंच्या अटके संबंधानें कांहींच खुलासा होत नाहीं, उडवाउडवीचीं उत्तरें सांगण्यांत येतात, उभयतां बंधूस अमदावादेस व ठाण्यास ठेविल्यामुळें त्यांच बोलणेंचालणें नाहीं त्यांची भेट आप्तमित्रांस घेता येत नाहीं आणि सुटकेचा मार्ग शोधण्यास सुध्दां त्यांस परवानगी नाहीं. अशा आंधळ्या कारभारामुळें सर्व बाजूंनीं निरुपाय झाला आहे. श्रीमती सौभाग्यवती लक्ष्मीबाई कामन्स सभेला प्रार्थना करितात कीं स्वतांवर असा प्रसंग आल्यास तुमच्या बायकापोरांची स्थिती कशी होईल हें कल्पनेनेंच उमजा, ब्रिटिश राज्यांतल्या नांवाजलेल्या सुरक्षितपणाचा उपभोग घेत असतांना असा अकस्मात् सरकारचा घाला पडला त्यामुळें सर्व बुद्धि नष्ट झाल्या व काय करावे हेंच कळेना. सरदार नातूंच्या वृद्ध मातोश्री या पराकाष्ठेच्या दुःखानें विव्हळ होऊन स्वर्गस्थ झाल्य आणि सध्यां त्यांच्या पत्नीला व अल्पवयी मुलीला कोणी त्राता किंवा वाली उरला नाहीं!

नातूंचें घराणें जुनें व प्रसिद्ध आहे. पेशवाई जाऊन इंग्रजी राज्य आलें त्या वेळीं या घराण्यानें सरकारची मोठी कामगिरी बजावली आहे, या घराण्याच्या राजनिष्ठेबद्दल सरकारची पक्की खात्री आहे आणि उभयतां सरदार नातूंनीं आपल्या कृतीनें किंवा वाचेनें सरकारशी द्रोह काडीमात्र केलेला नाहीं असें असून देखील जर दुर्दैवाचा विलास या घराण्याला सोडणार नाहीं तर निदान धर्मशास्त्राच्या आज्ञेप्रमाणें मलाही पती समागमें कैदेंत राहण्याची परवानगी द्यावी अशी निराशेची प्रार्थना श्रीमती लक्ष्मीबाई यांची आहे. जगांत अशा प्रकारें जगण्यापेक्षां मरण किती तरी बरें असें त्या कुलीन बाईला वाटत आहे. परमेश्वर तिच्या भाकेला ऐको व कामन्स सभा सरदार नातूंस बंधमुक्त करो!

---

एक 'चाणाक्ष' आह्मास विचारतो कीं लेफ्टनंट एअर्स्ट व मि. ऱ्यांड यांच्या पत्नीस सरकारांतून कांहीं पेनशन जन्मभर देण्याचा ठराव झाला आहे त्या प्रमाणें सिन्नर येथील दंग्यांत मरण पावलेल्या हास्पिटल असिस्टंट व मुनसिपल कमिशनर यांच्या बायकांस पेनशन देण्या विषयीं सरकारी ठराव झाला आहे किंवा तसा ठराव नसल्यास पेनशन देण्याचा विचार सरकार करणार आहे किंवा नाहीं. हा प्रश्न खरोखर विचार करण्या सारखा आहे. सरकारची चाकरी बजावीत असतांना जर एखाद्याचा देह खर्ची पडला तर त्याच्या पश्चात् त्याच्या बायकामुलांस पेनशन देणें सरकार धर्मास मोठ्या मोठें भूषणावह आहे. किंबहुना ही गोष्ट सरकारचें कर्तव्यही आहे. सिन्नरच्या दंग्यांत मरण पावलेल्या गृहस्थांच्या बायकामुलांस पेनशन देण्या विषयीं अद्यापपर्यंत कोठेंच बोलवा नाहीं. या बाबदींत कांहीं योग्य विचार होईल काय?

---

नामदार पंडित विश्वंभरनाथ यांनीं एक महत्वाची सूचना कायदे कौन्सिलांत आणिली आहे ते ह्मणतात कीं सरकारी मोठमोठ्या हुद्यांच्या जाग्याचे पगार पुष्कळ वर्षा पूर्वींच ठरलेले आहेत; आणि ते पगार इतर राष्ट्रांतील पगारांच्या मानानें फार मोठ आहेत. निदान या देशाच्या सांप्रत स्थितीला पूर्वींच्या भारी पगाराचे अधिकारी नकोत. हे पगार भारी असूनही त्या त्या अधिकाऱ्यांची पीरपीर असते कीं हे पगार फार वर्षापूर्वीं ठरले होते पण आतां हुंडणावळीच्या भावानें या पगाराची सोन्यामध्यें किंमत पुष्कळ कमी पडते तेव्हा हुंडणावळीपी मनोती पाहिजे आणि अवान्तरही बाबी अधीक पाहिजेत. हा युक्तिवाद चुकीचा आहे. असें प्रतिपादन पंडित विश्वंभरनाथ हे करीत असतांना ते बोलले कीं सध्यां या देशांत राहण्याच्या सोयी पुष्कळ सुलभ व स्वस्त झाल्या. आहेत विलायतचा प्रवास फार जलदी व थोड्या खर्चांत होऊं शकतो आणि इंडियन सिव्हील सर्व्हंटास इतरापेक्षां पगार फार भारी मिळतो तेव्हां जुन्या पगारांच्या आकड्यांत दुरुस्ती करावी आणि पगार योग्य प्रकारें कमी करावे ह्मणजे देशाचा फायदा होऊन नवीन होणाऱ्या हुद्देदारांस हुंडणावळीची ओरड करण्याचें प्रयोजन राहणार नाहीं.

वऱ्हाड प्रांताच्या राज्यकारभारांत देखील ही पगारा संबंधी सुधारणा अवश्य झाली पाहिजे. वऱ्हाडचा कारभार फार खर्चीच

आहे प्रजेवर करांचा बोजा मोठा पडतो आणि निजाम सरकारचेंही बरेंच नुकसान होतें. रेसिडेंट, कमिशनर, जुडिशिअल कमिशनर, सेशेन जज्ज, डिपुटी कमिशनर, सानिटरी कमिशनर, सिव्हील सर्जन, इत्यादि पुष्कळ अधिकारी या लहान प्रांताला नकोत आणि त्याशिवाय त्यांचे पगार त्यांच्या उपयुक्ततेच्या मानानें अती दांडगे आहेत. त्यांच्या पगाराच्या थैल्या उचलण्याला देखील हमाल लागतात. उधळपट्टीच्या कारभाराला कांहीं प्रतिबंध होईल तर फार बरें !

---

मुनसिपालिटी ही स्थानिक संस्था आहे पण तिच्या उपयोगाच्या मानानें तिच्या कराचा बोजा मनस्वी वाढला आहे. हल्लीं आकोला मुनसिपालिटींत नवे कर बसविले आहेत. आणि त्यांचा दडपशा गरीब लोकांस मोठा दुस्सह होण्याची भिती आहे. भंगीपट्टी, घरपटी, गाडीपट्टी, घोडपट्टी इत्यादि पट्यांनीं सर्व लोकांस भंडावून सोडलें आहे. एखाद्यापाशीं घर मोठें असलें ह्मणजे त्याच्या वर या कराचा बोजा बसलाच, आणि त्याचें उत्पन्न कितीही कमी असलें किंवा बिलकूल नसलें तरी मुनसिपालिटीस त्या गोष्टीची गरज नाहीं. टोल फंड बंद होईल खरा पण या नवीन करांनीं गरीब लोक अगदीं चुरडले जाणार आहेत. मुनसिपालिटी लोकसंस्था आहे पण तिच्या उत्पन्नाच्या बाबी सरकारानें बंद कराव्या आणि खर्च भागविण्या साठीं वरील प्रकारचे कर बसविण्यांत यावे हा मोठी शोचनीय गोष्ट होय. सरकार आमच्या कडून जमिनीचा सारा अधिकाधीक घेतें आणि त्यांपैकीं एक कवडी देखील मुनसिपाल संस्थास देत नाहीं. उलटें मुनसिपालिटीचें उत्पन्न हळू हळू कमी करण्यांत येत आहे. सरकारच्या या पद्धतीनें लोक नाराज होत आहेत. त्यांचे उत्पन्नाचे मार्ग संवृत चाल्ले, उत्तरोत्तर भिकारपणानें त्यांचा ऱ्हास होत चालला आणि अशा विपत्काळीं नवीन करांचा बोजा लोकांवर लादण्यांत आला आहे. कुरकुर करण्यांत हाशिल नाहीं आणि ज्याना आकोल्यास राहणें आहे त्यांनीं मुकाट्यानें नवीन कर योग्य वेळीं दिलेच पाहिजेत. हा गांव सोडण्याला लोक तयार नाहींत तोंपर्यंत या स्थितीनें लोकांची दरिद्रावस्था मात्र दुणावणार आहे.

---

## The Berar Samachar

MONDAY, APRIL 25 1898.

The present time is most critical in the history of the Local self-Government in India. The Anglo-Indians are delighted in condemning it even in the Viceregal Council. However it is the most favorite scheme with the people. Lord Ripon founded this system to the greatest good of the nation. He was the first Viceroy to recognize the sure and unmistakable symptoms of a national awakening. He realized the blessed effects of the liberal educational policy of the Government. Lord Macaulay had prophesied noble cravings after Western systems of thought and government and Lord Ripon saw the first beginnings of the new life that the western education introduced into India. There was ample material in the Native genius trained in the excellent traditions of the British history and the august Viceroy was the foremost champion to utilize the developed fund of energy, intellect and ability available in the educated Indians. People naturally came forward to claim a share in the administration of their country and Lord Ripon admitted the justice of their claim and hit upon an excellent plain to augment the great possibliities of a *native* administration of India. He established Municipal boards and local boards as a prelimary school for the educated natives to learn the concrete lessons of politics. Local represention was introduced and people have done their best to appreciate the right to vote. Election has become the rule of the day though nominatiion is the wedge of the Government to thrust their own members to control the working of Municipal and local bodies. Election and nomination worked very well for some time and effected a valuable compromise between the popular and the Governmental sides of all sorts of questions. The Government have however retained a firm grasp upon the management of boards and municipalities. With the departure of Lord Ripon the policy of giving the people a *living* representation was upset and a retrograde policy has taken the front position to undo the work of the past.

The Government have, through their official members, maintained supremacy in all matters. People are consulted on almost all occasions to secure a majority of vote in favour of whatever they propose to do. The law itself strengthens the hands of the Government and has vested all powers *in tact* in the government. The voice of the people is not courted at all. The strong element of opposition is from the class of pleaders who act as members in these institutions. To silence this opposition a grand effort is now being made to discredit the elective system as an uncongenial element for India. Mr. F. S. Bullock has done us an eminent dis-service in this connection. He supports dogmatically in his last annual reports or local boards and municipalities a most destructive principle. He wishes to substitute nomination for election. The danger is that his words are echoed in an authoritative manner by the Resident. The imperialism or rather the policy of repression will of course kill election in the bud if a bold front be not presented in time. It is high time for us to foresee the danger that hangs over our head. We wish to hoist up the danger-signal and if people rise up in right earnestness we think we shall have done our duty.

---

The last Friday numer of the Pioneer has an able and learned article on the subject of 'over—centralization' in the administration of India. Centralization will always remain in public affairs to a considerable degree. The editor further proceeds to point out, in the following passage, when and where this centralization errs on the side of an evil:—

"But there are two kinds of centralisation, the one well-pruned and healthy, the other rank and overgrown, and it is the misfortune of our Government and its besetting pitfall that only by great care is the former restrained from developing into the latter. A healthy centralisation we would describe as a general control over main principles, combined with a complete dissociation from minor details; and we regard that centralisation as unhealthy, where the central authority, in eagerness or indifference, by drift or of set purpose, expatiates into the direction of details and endeavour in a word to codify the conduct of multiplex and ever-varying affairs. The strongest evidence of the unhealthiness of the present system—which is the subject of common complaint—will perhaps be found in the consummation and perfection of that system, in the voluminous expansive manuals of orders in every department of Government; so voluminous that the central authorities themselves are not infrequently compelled to disregard their own instructions, or to choose between their own conflicting orders."

The Pioneer takes to task the Under-Secretaries of local Governments for their critical acumen. Here is an eloquent description as to how these officers gain supremacy over district officers:—

"The system of annual reports plays into their hands. Every year voluminous reports with reams of statistics come up from the various department, and in accordance with a bureaucratic tradition it is necessary to give an explanation or account, which must at least be plausible, of every variation and discrepancy and unexpected event. The result is a mass of hasty and isolated generalisations, often of a very perilous character, which are crowned in the end by ill-considered action. Moreover, the interminable process of comparison itself produces an attitude of mind that regards uniformity as a primary virtue; and in this belief centralisation exults and takes an even wider range. The temptations to uniformity are also abetted by the strong intellectual atmosphere which the processes of desk work inevitably engender; for it is scarcely possible perpetually to exercise one's mind on paper without giving precedence, in the formation of opinion to the purely intellectual view of any question. Especially is this true of under—secretaries, who are usually young men fresh from academic centres and intellectual despotism, with minds not yet mellowed by any wide experience of practical affairs."

---

## वऱ्हाड

हवामान—उष्मा मनस्वी होतो. अभ्रें वारंवार आल्यामुळें अतिशय गुदमरतें. थोडा पाऊसही मध्यंतरीं पडला पण त्यानें उष्णता विशेष वाढली. उन्हाळ्याचीं दुखणीं पुष्कळ झालीं आहेत.

मि. ए. सी. करी असि० कमिशनर उमरावती यांस दुसरे वर्ग माजिस्ट्रेटीचा अधिकार देण्यांत आला आहे.

गेल्या मार्च महिन्यांतील फारेस्ट खात्याच्या परीक्षेंत खालील अधिकारी पसार झाले:—

| मि. | हायर |
|---|---|
| केनी असि. कानसरव्हेटर | प्रोसिजर अकौंट व हिंदुस्थानी |
| पीर्क एक्स्ट्रा असि. कानसरव्हेटर | हिंदुस्थानी |

मि ए. इलियट हे विलायतेस जाण्या साठीं गेल्या बुधवारा पासून रजेवर गेले. परवाच्या आगबोटीनें तें मुंबई बंदराहून रवाना झाले.

आज पासून आकोल्यास सेशन कचेरी भरणार आहे.

---

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८१ रुपये |
| जवारी | ४० पासून ४२ रु० |
| गहूं ( कांठे ) | १०० रु० |
| ,,( बनशी | ११० रु० |
| चणे | ६५ रु० |
| तेल | ४।- रु० मण |
| तूप | ८।।।= मण |
| मीठ | ३।।। मणं |
| सोंनें | २४ तोळा |
| चांदी | ८० |
| कपाशी | ३४ |
| रुई | ४४ |

---

नोटीस

नोटीस बेशमी कस्तुरचंद गंगाधर व धनसूकदास बालकिसन तेजमल सुरजमल वल्लद कस्तुरचंद मारवाडी दुकान सग्रामपूर तालुके जळगांव जिल्हा आकोला. यासी मी नोटीस लिहून देणार मनरूप आग्याराम मयत वारीसपुत्र फतेलाल आग्याराम अ० पा० क० आई रुखमाई मर्द आग्याराम मारवाडी राहाणार सग्रांमपूर नोटीस देते ऐसाजे तुमची व आमची शराकतींत सावकारी दुकान आहे. त्या दुकानांत दहा आण्याचा हिस्सा तुमचा ह्मणजे सालीम उभयतांचा आहे व सहा आण्याचा माझा आहे. दुकान संबंधी तुमचे नावे आह्मी जनरल मुखत्यारपत्र दिलें आहे. परंतु तुमचे व आमचे बनत नाहीं तुमचेवर आमचा भरवसा नाहीं. दुकानांतील पैश्याची हलचल होत असून मजला कांहींच माझे हिशाची देत नाहीं. जी रकम दुकानांत भांडवल आहे ती माझीच सर्व आहे तुमचे त्याच्यांत कांहीं नाहीं. ही नोटीस तुह्मास पावले दिवसा पासून तुमचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे. कळावे तारीख १० माहे एप्रील सन १८९८ इसवी.

सही

फतेलाल अग्याराम अज्ञान पालन करणार आई रुखमाई मर्द अग्याराम दस्तुर खुद्द.

---

## जाहिरात

मी खालीं सही करणार सर्व लोकांस जाहीर करिते कीं कस्तुरचंद गंगाधर व धनसूकदास बालकीसन, तेजमल, सुरजमल व० कस्तूरचंद यांची व माझी शराकतीची सावकारी दुकान आहे. त्या संबंधीं मी त्यांना जनरल मुकत्यारपत्र दिलें आहे त्यांचे व माझे बनत नसल्या मुळें सदरहू मुकत्यारपत्र रद्द करण्यांत आलें आहे करितां सर्व लोकांस जाहीर केलें आहे कळावें तारीख १० माहे एप्रील सन १८९८ इ०

सही

फत्तेलाल अग्याराम अज्ञान पालन करणार आई रुखमाबाई मर्द अग्याराम दस्तूर खुद्द.

---

## वर्तमानसार

हायकोर्टाचा ठराव—ठाणें येथील एका दुकानदारानें फार वर्षापूर्वी आपल्या दुकानापुढील गटारावर फाड्या टाकून जिनसपानस मांडण्यास जागा केली होती. मुद्दस्तां प्लेगच्या वेळीं गटार साफ करण्या साठीं ह्मणून त्याच्या फाड्या काढण्यांत आल्या होत्या. परंतु प्लेग गेल्यावर सदर दुकानदारानें पुनः त्या गटारावर फाड्या घालून पूर्ववत जागा केली. ह्मणून म्युनिसिपालिटीनें गटार अडविल्याबद्दल त्याजवर खटला केला व त्याला माजि० नें ५ रुपये दंड केला. ह्या कामांत मुंबई हायकोर्टाकडे अपील होऊन त्यांत निकाल झाला कीं, सदर दुकानदारानें गटारावर फाड्या घालण्याचें काम आज नवीन केलें आहे असें नाहीं सन १८७३ म्युनिसिपल आक्ट होण्यापूर्वीच त्यानें तें काम केलेलें होतें. ह्मणून थोडे दिवस काढलेल्या फाड्या पुनः घालण्यास त्याला म्युनिसिपालिटीच्या परवानगीची जरूरच नव्हती. त्याला केलेला दंड गैरशिस्त आहे. सबब तो रद्द आहे.

कुत्र्याचें विष—एका प्रसिद्ध डॉक्टरचें ह्मणणें आहे कीं सर्वच कुत्रे विषारी असतात असें नाहीं. ज्याच्या चाऱ्ही पायांचीं नखें २० भरतात, तें कुत्रें चावलें तर विष बाधतें पण ज्याच्या पायांचीं नखें अठरा भरतात तें कुत्रें चावलें तरी विषबाधा होत नाहीं. अनुभविकांनीं अनुभव कळवावा. क. त.

आरबी समुद्रांत वृष्टि व तुफान होण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

ब्रह्मदेशांत शास्वीन येथें ४ तारखेस एक मोठा धरणीकंपाचा धक्का बसला.

चीनच्या प्रधान मंडळानें रशियाकडून लांच घेतली आहे, व मुख्य प्रधान ली-हुंग-चंग यानें १९ लक्ष टील लांच घेतली ह्मणून रशियाच्या मागण्या बराबर कबूल होत आहेत; सबब त्या संबंधानें चौकशी करावी, असें चीन मधील मुख्य न्यायाधिशाचें ह्मणणें आहे. स० वि०

गुलबर्गा समाचार कर्ते पुढील एक गंमत कळवितात. ते ह्मणतात कीं, एका तालुकदार साहेबांनीं एका धनगराचें बकरें पोटांत घातल्याबद्दल त्यास पैसे देण्याकरितां कांहीं रुपेय व कांहीं आणे तहशिलदारांस दिले. तहशीलदारानीं निमे रुपये ठेवून घेऊन बाकीचे रुपये व वरील आणे धनगरास पोंचविण्या करितां आल्या कारकुनाजवळ दिले. कारकुनानें रुपये स्वाहा करून वरील आणे गांवकराकडे दिले व शेवटीं गांवकरांनीं तेवढे पैसे गट्ट केले आणि धनगराचे नांवची रिसीट तयार करून कारकुनास दिली !! असे खाबू असले ह्मणजे रयत मोठी खुष राहील !!

आस्ट्रेलियांतील हरक्ष्ले झोपानिक नांवाच्या एका शाळामास्तरानें पाहिजे त्या ठिकाणचा देखावा कितीही अंतरावरून विजेच्या तारायंत्रानें जशाचा तसा दिसण्याची युक्ती काढली असून तिचा सर्व हक्क त्यानें प्यारिस येथें १९०० सालीं भरणाऱ्या प्रचंड प्रदर्शनाचे चालकांना भारी किंमतीला विकून टाकिला आहे.

जगावर जितकीं वर्तमानपत्रें आहेत त्या सर्वांत चमत्कारिक वर्तमानपत्र अथेन्स शहरांत प्रसिद्ध होतें. तें सर्व पत्र तर कविताबद्ध असतेंच, पण त्यांत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती ही काव्यबद्धच असतात. वा. वृ.

दैविक चमत्कार—कनोळी पाशीं एक मैलावर भागोळेजवळ खोडाळमातेचे मंदिर आहे. मंदिर चुनेगच्ची असून त्यावर असलेल्या छपरावर जवळच्या एका पिंपळाची पारंबी लोंबत आली आहे आज तीन दिवस सदर्हू मंदिराचें छप्पर क्षणोक्षणीं डोल्याच्या धुमश्चा प्रमाणें हालल्याचा भास होतो,—नव्हे—खरेंच हालतें. त्याबरोबर जवळचा पिंपळाचा वृक्षही हालतो. शिवाय वरून रक्तासारखे लाल थेंबही मधून मधून पडतात. ह्या प्रमाणें फक्त छपरच हालतें. खालचा भाग स्थीर आहे. हा चमत्कार पहाण्यासाठीं लोकांच्या झुंडीच्याझुंडी जमत आहेत. परंतु कोणचाही तर्क चालत नाहीं. तेथील वहिवाटदार साहेब, माडव्याचे ठाणेदार, जप्तीदार, वगैरे प्रमुख मंडळी हा चमत्कार पहाण्यास बरेच वेळां आली त्यांनाही सदरहू चमत्काराचा आचंबा वाटत आहे. आणि आतां नांदोदचे महाराजही येणार असल्याचें स. वि. वरून कळतें

हेडमास्तरांची चेष्टा—गुजरार्थेतील एका इंग्रेजी शाळेंतील व्रात्य पोरांनीं एप्रीलफूल ह्मणजे इंग्रजी शिमग्याचे मस्करीचा मासला आपल्या हेडमास्तरास दाखविला ! मास्तर साहेब सुटींत बाहेरगांवी गेले होते. त्यांला एका असि० मास्तराचे नांवानें पोरांनीं अशी तार पाठविली कीं, शाळेंत मोठा दंगा होऊन दोन विद्यार्थी जखमी झाले आहेत ही तार पोंचताच हेडमास्तरांची तारांबळ उडून घाई घाईनें ते निघून आले व अधिकाऱ्यांस ही लागलीच वर्दी देऊन ज्या मास्तराचे नांवें तार गेली होती त्याजकडे प्रथम गेले. त्याला विचारितां दंगाधोपा कांहींएक झालेला नाहीं व आपण तार केलेली नाहीं असें ह्मणून त्यानें कानावर हात ठेविले. हेडमास्तरांस ह्याची चुटपुट लागल्यामुळें त्यांणीं सर्व मुलें शाळेंत जमवून व तारमास्तराला बलावून आणून कोणत्या पोरानें तार केली त्याला उमगून काढण्याचा प्रयत्न केला, परंतु कांहीं एक उमगलें नाहीं. हेडमास्तर मनांतल्यामनांत जळफळत तूर्त स्वस्थ राहिले आहेत! मुलांची भिडता वाटली नाहीं कांहीं? स. शो.

सरदार किचेनर हे आपल्या फौजेसह वाडीहालफा येथें जाऊन दाखल झाले आहेत.

मि. ग्ल्याडस्टन यांची प्रकृती बरीच सुधारल्याचें समजतें. आनंद वाटतो.

अमेरिकन सरकारानें अमेरिकन अटलांटिक लाईनसच्या चार बोटी लष्कर घेऊन जाण्या करतां मागविल्या आहेत.

अमेरिकन सरकारच्या आठ पायदळ पलटणींना न्यू ऑर्लियाकडे, सात पलटणींना मोबिलीकडे व आणखी सात पलटणींना टंपाकडे जाण्या हुकूम झाला आहे.

तारीख १८ माहे एप्रील सन १८९८ रोजीं सकाळीं ६—४० वाजतां दामोदर चापेकर यांस यरवडा तुरुगांत फांशी देण्यांत आलें फांशीचे वेळीं त्यानें आपल्या जवळ गीतेची पोथी घेऊनें एक सारखा 'नारायण' नामाचा जप चालविला होता. बिचाऱ्याच्या आत्म्यास शांति मिळो. गुराखी

निझामच्या राज्यांत मजलमी दक्कन नाचें एक वर्तमानपत्र निघत होतें. अजमुदीन नावाचा एक माणूस त्याचा कर्ता होता, त्याणें व दिवाणांचा माजी प्रायव्हेट सेक्रेटरी अबदुल्ला अतिम यांनीं त्या वर्तमानपत्रांत निझामसरकारच्या व इंग्रजसरकारच्या विरुद्ध कांहीं बाणेरडा व राजद्रोहसूचक असा लेख प्रसिद्ध केला, त्यावरून निझामसरकारानें नुकताच एक ठराव केला असून त्यांत त्या दोघास आपल्या राज्यांतून निघून जाण्याचा हुकूम केला आहे. या हुकमाच्या विरुद्ध ते या राज्यांत आढळल्यास निझामाच्या कामदारानी त्यास पकडून त्याच्यावर निझामसरकारचा हुकूम तोडल्याचा खटला करावा असेंही फर्माविलें आहे. थोड्या दिवसांपूर्वीं मुंबईहून ज्या एका मुसलमान पत्रकर्त्यास मुंबईसरकारानें सक्तीनें निझामाच्या राज्यांत घालवून दिलें तोच हा अजमुदीन आहे असे सांगतात. तोच असेल तर त्याणें आतां जावें कोठें हा एक प्रश्नच आहे. तो निझामाची प्रजा असल्यामुळें मुंबईसरकारानें त्यास आपल्या हद्दींतून घालवून दिलें व आता निझामानेही आपल्या राज्यांत राहाण्याची मनाई केली.

इजिप्तच्या गादीवर हल्लीं जरी एक राजा आहे तरी ती राज्यव्यवस्था बहुत्येक इंग्रजी तंत्रानेच चालू आहे हें प्रसिद्धच आहे. त्या राज्यांत व आसपास आज कित्येक दिवसांपासून दरवेशी लोकांचा मोठा दंगा चालू आहे. या दंगेखोराचा उस्मान डिगमा हा मुख्य आहे या पुढाऱ्याच्या फौजेशी इजिप्तच्या फौजेची व इंग्रजी फौजेची एक मोठी लढाई झाली. या लढाईत दरवेशी लोकांचें फार मोठें नुकसान झालें. त्यांतला एक पुढारी अमीर महंमद यास कैद केलें, इंग्रजाचे २ हपीसर ठार झाले व १४ जखमी झाले. तसेंच १० शिपाई ठार होऊन ९ जखमी झाले. या शिवाय इजिप्तचे ५१ मेले व १४ हपीसर व ३१९ शिपायी घायाळ झाले. यांत शत्रूचें फार नुकसान झालें. अमीर महमदच्या फौजेपैकीं जे मेले त्यांतच २००० प्रेतें सापडलीं आणि त्याशिवाय आणखी १००० तरी ठार झाले असावे. सगळ्यांचा पुढारी उसमान डिगमा हा लढाईच्या आरंभींच पळून गेला, आणि त्याचे दुसरे बहुत्येक आफीसर ठार झाले. इजिप्त फौजेंतले जे १४ हपीसर घायाळ झाले ते सर्व तिकडचे नेटिवच होते. अ०

मि. विलीयम येट्स नामक विद्वानानें 'टाइम्स आफ इंडिया' पत्रांत एक महत्वाचें पत्र प्रसिद्ध केलें आहे, त्या पत्रांत ह्मटलें आहे कीं, 'गेल्या दोन वर्षांत मुंबई शहराची स्थिती कशी झाली व ज्या गोष्टी घडल्या त्यांची आपण तपासणी करूं. तसेंच इ. स. १८९० साला नंतर आपला लहान ग्रह जो पृथ्वी तो कोणत्या स्थितींत आला आहे हें पण पहावयाचें आहे. ज्वालामुखी उत्पन्न झाल्या, भूकंप झाले, समुद्र व जमीन यांच्या वर नाना प्रकारचीं तुफाने झालीं. इतकेंच नव्हे तर सर्वांत मोठा बनाव हा बनला कीं विद्युत्साहाय्यावाचून चोवीस तासापर्यंत ताराचा व्यवहार चालू राहिला. हे सर्व बनाव इ. स. १८९३ सालीं घडले. दर चाळीस वर्षांनीं संकटें आपल्या पृथ्वीवर येत असतात सूर्य, शनि व शुक्र यांचा सामागम होतांच जी आपली पृथ्वी पूर्वोक्त तीन ग्रहापेक्षां लहान आहे. तिजवर त्या तीन ग्रहांचा अनिष्ट परिणाम घडतो. सूर्याचा हा धर्म आहे कीं, त्याच्या आकर्षणांत येणारे पदार्थ थोड्यां अथवा फार प्रमाणानें जाळून टाकणें शुक्राच्या योगानें ज्वालामुखी व भूकंप यांचा उद्भव होतो. शनि प्राणिमात्राचा संहार करून टाकितो. हाच प्रकार इ. स. १८९० सालीं कांहीं अंशानें घडला होता कीं जो १८९२ पर्यंत चालूच होता; व त्याबरूनच हल्लीं जी संकटाची वृष्टी चालला आहे ती इ. स. १९०२ पर्यंत चालू राहील असें अनुमान निघूं शकतें या तीन ग्रहांच्या योगानें मनुष्य प्राण्यास जें दुःख सोसावें लागतें, त्यामुळें बाप व मुलगा, आई व मुलगी यांच्यांत तंटे उत्पन्न होतात. तसेंच राजा व प्रजा यांच्यांतही बेबनाव उत्पन्न झाल्या वाचून रहात नाहीं.' अ०

एका व्हेल माशाच्या जिभेपासून एक टन ( २८ मण ) तेल काढण्यांत येतें !

सुकलेलीं फुलें—केप कॉलनी येथून दर वर्षी १० हजार पौंड किंमतीचीं सुकलेलीं फुलें बाहेर देशी पाठविण्यांत येतात.

हिरे हे खाणींतून मातीच्या थरांतून उकरून काढले जात नाहींत ते खडकाळ भागांत असलेले असतात तेथून ते काढण्यात येतात. आणि नंतर त्याजवर शाणघर्षणप्रयोग होऊन त्यांच्या किंमती ठरविल्या जातात.

न्यूस्कॉट्लंड यार्ड येथील पोलिस आफिस इतकें मोठें आहे कीं, तेवढें मोठें आफिस अवघ्या पृथ्वीवर दुसरीकडे कोठेंही नाहीं. वरील आफिसांत ३००० पोलिस अधिकारी एककालीं बसूं शकतात !

अफूचें पीक—यंदां बिहार प्रांतांतील अफूचें पीक फारच दांडगे आले असल्यामुळें सरकारचें उत्पन्न फार वाढणार आहे. सरकारचाही हात फार ओढघात झाला असल्यामुळें हे जास्त होणारें उत्पन्न त्याला फार फायदेशीर होईल हें उघड आहे.

कस्तुरीच्या वासाची मशीद!—कुस्तुंतुनिया ह्या राजधानीचे नगरांत साधु सोफिया याची एक मशीद एक हजार वर्षांपूर्वीं बांधण्यांत आली आहे. त्या मशिदीला जो चुना लावला त्यांत कस्तूरी मळली होती. ह्यामुळें अजून त्या मशिदींत गेल्यास तेथें कस्तुरीचा घमघमाट सुटलेला आपल्या अनुभवास येतो!

बेवारसी ठेव—इंग्लंडच्या ब्यांकेंत ६५,४३,०१७ पौंन्ड ( सुमारे १० कोट रुपेय ) रकमेच्या ठेवी बेवारसी पडलेल्या आहेत. त्याचे बद्दल गेल्या ३० वर्षांत कोणीही विचारपूस करण्यास आलें नाहीं व त्या कोणाच्या आहेत तें समजत नाहीं. अर्थात् ती सर्व सरकारची धन होणार हें उघड आहे.

जर्मनींतल्या सरकारी शाळांमध्यें चांगलीं बुद्धिमान् मुलें कोणतीं आणि मतिमंद व बुध्दिहीन मुलें कोणतीं ह्याची परीक्षा वैद्यकीय लोकांकडून करवून त्यांना वेगवेगळ्या वर्गांत शिकवितात. बुद्धिहीन व बुद्धिवान अशा मुलांना एका ठिकाणीं शिकूं व राहूं देत नाहींत. व तेणेकरून त्या व्यवस्थेचे परिणाम फार चांगले व संतोषकारक अनुभवास येतात, असें सांगतात. ज्ञा० च०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.